# आमचं विद्यापीठ

लेखन - संपादन :
अतुल कुलकर्णी



दिनकर रायकर | कुमार केतकर | मधुकर भावे | व्यंकटेश केसरी | प्रशांत दळवी
अजय अंबेकर | चक्रधर दळवी | नंदकिशोर पाटील | श्रध्दा बेलसरे | राजा माने
विजय बाविस्कर | सुधीर महाजन | इम्तियाज जलील | सुजाता आनंदन्
विलास तोकले | विवेक रानडे | लखीचंद जैन | मोहन राठोड

# आमचं विद्यापीठ

लेखन / संपादन

**अतुल कुलकर्णी**

प्रकाशक

**रेखा प्रकाशन, मुंबई**

**'आमचं विद्यापीठ'**

लेखन / संपादन : **अतुल कुलकर्णी**

फ्लॅट नं. ६०१, सहवास श्री सोसायटी,
लेन नंबर ७, कोरेगाव पार्क,
पुणे - ४११ ००१.
kkatul@gmail.com
दूरध्वनी :
९८६७५ २१०२२

© त्या त्या लेखकांच्या पूर्वपरवानगीने.

**पहिली आवृत्ती :**
दि. १५ फेब्रुवारी २०१५

मुखपृष्ठ :
**विवेक रानडे**
(प्रसिद्ध ग्राफिक डिझायनर, नागपूर)

अक्षरलेखन, मांडणी, सजावट :
**अच्युत पालव**
(प्रख्यात सुलेखनकार, मुंबई)

अक्षरजुळणी / मुद्रितशोधन :
**चंद्रकांत गुळुंबे / सत्यवान ताठरे**

किंमत :
२०० रुपये

**प्रकाशक :**
**रेखा प्रकाशन,**
४१, करेलवाडी,
ठाकूरद्वार,
मुंबई - ४०० ००२
दूरध्वनी :
०२२-२२०५ ४५५१

**मुद्रक :**
**जयंत प्रिंटरी,**
मुरलीधर कम्पाउंड,
जे. एस. एस. रोड,
ठाकूरद्वार, मुंबई - ४०० ००२
दूरध्वनी :
०२२-४३६६ ७१७१

## सहभाग

- दिनकर रायकर
- कुमार केतकर
- मधुकर भावे
- व्यंकटेश केसरी
- प्रशांत दळवी
- अजय अंबेकर
- चक्रधर दळवी
- नंदकिशोर पाटील
- श्रद्धा बेलसरे
- राजा माने
- विजय बाविस्कर
- सुधीर महाजन
- इम्तियाज जलील
- सुजाताआनंदन
- विलास तोकले
- विवेक रानडे
- लखीचंद जैन
- मोहन राठोड

शब्दांच्या सामर्थ्याने
सत्याचा शोध घेणाऱ्या
पत्रकारांना हे पुस्तक अर्पण...

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रस्तावना | कुमार केतकर | ११ |
| २) | पुस्तकामागची भूमिका | अतुल कुलकर्णी | १८ |
| ३) | निष्णात पत्रकार, संपादक | दिनकर रायकर | २७ |
| ४) | माझं विद्यापीठ | अतुल कुलकर्णी | ३२ |
| ५) | पीआयएल आणि लोकमत | अतुल कुलकर्णी | ५४ |
| ६) | व्यक्तिमत्त्व असणारा पत्रकार | व्यंकटेश केसरी | ५९ |
| ७) | लव्हेबल एलिमेंटवाला संपादक | प्रशांत दळवी | ६३ |
| ८) | शो मस्ट गो ऑन शिकवणारा संपादक | चक्रधर दळवी | ६८ |
| ९) | संपादकांचे संपादक | नंदकिशोर पाटील | ७२ |
| १०) | अंतर्बाह्य संपादक | अजय अंबेकर | ७९ |
| ११) | आमचा ऊर्जास्रोत | सुधीर महाजन | ८३ |
| १२) | मशीनपासून लेखणीपर्यंत | श्रद्धा बेलसरे | ८६ |
| १३) | मॅन ऑफ न्यूज | विजय बाविस्कर | ८९ |
| १४) | माझ्यासाठी व्यासपीठ आणि विद्यापीठही ! | लखीचंद जैन | ९२ |
| १५) | आज मी जो काही आहे तो... | इम्तियाज जलील | ९५ |
| १६) | टू सर विथ लव्ह... ! | विलास तोकले | ९७ |
| १७) | त्यांनी जगण्याला अर्थ बहाल केला ! | राजा माने | ९९ |
| १८) | तांड्यावरच्या मुलाला पत्रकार केले ! | मोहन राठोड | १०२ |
| १९) | मिनीटकाटाही महत्त्वाचा असतो | विवेक रानडे | १०७ |
| २०) | डिझाइनिंगपासून सर्व काही ! | सुजाता आनंदन् | १११ |
| २१) | राजेंद्रबाबू असे जवळून पाहिले ! | मधुकर भावे | ११४ |
| २२) | राजेंद्र दर्डा यांची विशेष मुलाखत | अतुल कुलकर्णी | ११८ |
| २३) | हातच्या काकणाला आरसा कशाला ? | अतुल कुलकर्णी | १२९ |
| २४) | 'व्हायब्रंट विग्नेट'च्या निमित्ताने... | शोभा डे | १३२ |
| २५) | 'झुंबर'च्या निमित्ताने... | अनंत काणेकर, भाऊ समर्थ | १३३ |

# प्रस्तावना

■ कुमार केतकर

*(ज्येष्ठ पत्रकार आणि सल्लागार संपादक, 'मी मराठी' वृत्तवाहिनी)*

एक दिवस आकस्मिकपणे मला अतुल कुलकर्णीचा फोन आला. मी विचारले, ''एकदम काय?'' तो म्हणाला, ''भेटल्यावरच सांगतो.'' त्यानुसार भेटलो. त्याच्या डोक्यात असणारी पुस्तकाची कल्पना त्याने सांगितली. त्यातून 'राजेंद्र दर्डा' ही एक व्यक्ती नसून पत्रकारितेचे विद्यापीठ आहे, असे त्याला आणि त्याच्या सहकाऱ्यांना वाटत असल्याचे आणि त्याविषयीचे पुस्तक करीत असल्याचे तो म्हणाला. माझाही 'लोकमत' समूहाशी आणि राजेंद्रबाबूंशी बऱ्यापैकी घनिष्ठ संबंध होता, म्हणून त्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची त्याने विनंती केली. पुस्तक हा 'गौरव ग्रंथ' नव्हे वा 'लोकमत'चा अर्वाचीन इतिहासही नाही! राजेंद्रबाबूंना तर या पुस्तकासंबंधी कल्पनाही नाही. पुस्तकातील लेख वाचून मी ठरवावे, असे त्याने म्हटले.

त्याने दिलेल्या संहितेतील सर्व आठवणीवजा लेख मी वाचले. हा प्रकारच आगळा आहे, हे लक्षात आले. हे राजेंद्रबाबूंचे चरित्र नाही, दर्डा कुटुंबाचा दस्तावेज नाही, 'लोकमत'चे 'पब्लिक रिलेशन' नाही आणि तरीही पुस्तक

त्यांच्याविषयीचे आहे. अशा ग्रंथाला प्रस्तावना म्हणजे नाजूक आणि जिकिरीचेसुद्धा. राजेंद्रभाऊंचा आणि माझा घनिष्ठ परिचय असला तरी ते माझे मित्र नव्हते, माझे शेजार-पाजारीही नव्हते, त्यांचा व्यक्तिगत जीवन परिचय मला नव्हता; माझा संबंध आला तोच 'प्रोफेशनल' स्वरूपाचा.

त्यानुसार माझी प्रस्तावनाही आठवणवजा लेख अशाच स्वरूपाची झाली. दिनकर रायकर माझे सुमारे ४० वर्षे पत्रकार मित्र / सहकारी. त्यामुळे आमच्या अनेक आठवणी एकाच काळातल्या, एकाच वातावरणातल्या. याउलट अतुलच्या आठवणी. अतुल जेव्हा राजेंद्रभाऊंना प्रथम भेटला, साधारण त्याच सुमारास माझी आणि त्यांची भेट झाली.

पण आमच्या वयात सुमारे २० वर्षांचे अंतर! त्यात तंत्रज्ञानाचे वय ४० वर्षांनी वाढलेले. आता तर तंत्रज्ञानाचे वय अगदी ज्येष्ठ पत्रकारापेक्षाही कितीतरी जास्त आहे. माझ्या आणि रायकरांच्या पिढीला खिळे जुळवून 'कम्पोज' केलेले वाचण्याची सवय. आम्ही न्यूज प्रिंटवरची कॉपी अगदी उलटी अक्षरे वाचून 'एडिट' करू शकत होतो.

पुढे संगणक आल्यावर आणि आता इंटरनेट, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप आल्यावर क्रांती झाली. अगदी आमच्या डोळ्यांसमोर राजेंद्रबाबूंच्या नेतृत्वाखाली 'लोकमत' एकदम 'टेक्नोसॅव्ही' झाला. त्यांचा सराव टेक्नॉलॉजीशी किती होता हे मी स्वतः अनुभवले आहे.

आताचे आव्हान आहे 'टेक्नॉलॉजी आणि कन्टेन्ट' यांच्यात सुसंस्कृत समन्वय साधण्याचे. 'टेक्नॉलॉजी' नव्हे तर 'कन्टेन्ट', म्हणजेच तंत्रज्ञान नव्हे तर आशय हाच पत्रकारितेचा आत्मा असला पाहिजे, असे मला वाटते. नेमका तोच दृष्टिकोन राजनभाऊंचा आहे, म्हणूनच मी प्रस्तावना लिहिण्याची जबाबदारी मान्य केली.

### 'बालभारती'ची आठवण

बरोबर ३० वर्षांपूर्वी 'बालभारती' या महाराष्ट्र शासनाच्या पाठ्यपुस्तक मंडळाने एक पुस्तक प्रकल्प हाती घेतला होता. त्याचे निमित्त होते इंडियन नॅशनल काँग्रेसच्या स्थापना शताब्दीचे. महाराष्ट्राचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, असा त्या ग्रंथाचा केंद्रबिंदू असावा असे 'बालभारती'च्या समितीने ठरविले होते. देशाच्या एकूण स्वातंत्र्य आंदोलनाच्या मुख्य पटलावर मराठी माणसाचा ठसा किती व कसा प्रभावी होता, हे त्यातून दिसावे अशी समितीची अपेक्षा होती. हे पुस्तक केवळ विद्यार्थ्यांसाठी नव्हे, तर शिक्षकांसाठी आणि एकूणच सर्व वाचकवर्गासाठी

लिहिले जावे, असे त्यांचे मत होते.

हे पुस्तक मी लिहावे, असे त्यांनी आग्रहपूर्वक सुचवले. समितीचे अध्यक्ष होते माजी शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी. तेच नव्हे, तर त्यांचे कुटुंबच स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेले होते. शिवाय 'बालभारती'ची स्थापनाही त्यांच्याच कारकीर्दीत झाली होती. त्या काळी त्यांचे सहकारी होते शिक्षक चळवळीतील एक ज्येष्ठ नेते (आणि लाल निशाण पक्षाचे ज्येष्ठ सदस्य) भाऊ फाटक. भाऊ हे माझे चेंबूर हायस्कूलमधील शिक्षक. 'बालभारती'मधील एक शिक्षण अधिकारी श्रीमती शकुंतला अहिरे यांच्याकडे हा प्रकल्प सोपविला होता. पुणे विद्यापीठातील एक प्राध्यापक अरविंद देशपांडे. इतिहास आणि सामाजिक चळवळी व विचारसरणीविषयक त्यांचा मोठा व्यासंग होता.

**'बालभारती' समितीच्या निमित्ताने पहिली ओळख**

समितीने माझे नाव सुचवून मला विनंती केली, तेव्हा मी त्यांना म्हटले की मी इतिहासकार नाही. मला इतिहासाची आवड आहे, पण मी इतिहास संशोधन, लेखन वगैरे काही केलेले नाही. त्यामुळे हे लेखन अन्य कुणीतरी करावे. मी तेव्हा 'इकॉनॉमिक टाइम्स' या टाइम्स वृत्तसमूहातील अर्थविषयक दैनिकात वार्ताहर होतो. वार्ताहर या नात्याने माझी महाराष्ट्रभर भटकंती होत असे.

'बालभारती'च्या समितीने मला सांगितले की, हे पुस्तक जरा वेगळ्या स्वरूपाचे करण्याचा त्यांचा इरादा आहे. चौधरी यांनी मला नव्या स्वरूपाची कल्पना दिली. ते म्हणाले की, स्वातंत्र्यचळवळीत तरुण वा प्रौढ असलेली अनेक माणसे आता वृद्ध झाली आहेत. ते 'इतिहास' जगले आहेत. त्यांनी इतिहास घडविला आहे. हे लोक फक्त काँग्रेसचे नाहीत तर कम्युनिस्ट आहेत, समाजवादी आहेत; अगदी हिंदू महासभेचेही आहेत. त्याचप्रमाणे काही ज्येष्ठ पत्रकार, लेखक, व्यासंगी संशोधकही आहेत, ज्यांनी स्वातंत्र्यलढा जवळून पाहिला आहे आणि त्यांच्याकडे अनेक नेत्यांबद्दलच्या आठवणी आहेत. त्यांच्यापैकी जितक्यांना भेटून वा त्यांच्याकडील नोंदी मिळवून तसेच तत्कालीन वृत्तपत्रे डोळ्यांखाली घालून जे प्रकाशित-अप्रकाशित वा दुर्मीळ साहित्य, मुलाखती जमविता येतील, त्या एकत्र करून हा ग्रंथ लिहायचा आहे. 'तुम्ही पत्रकार आहात, ही तर त्यामुळे विशेष जमेची बाजू आहे.' प्रा. अरविंद देशपांडे आणि भाऊ फाटक यांनीही चौधरी यांच्या सूचनेला दुजोरा दिला. श्रीमती शकुंतला अहिरेंनी तर पुस्तकासाठीची नेपथ्यरचनाच तयार केली होती. कुणाच्या मुलाखती ध्वनिफितीवर घ्यायच्या,

कुठून दुर्मीळ पत्रव्यवहार प्राप्त करायचा, त्या काळातील वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तके कशी मिळवायची याचा आराखडा त्यांच्याकडे होता.

त्या नावांचा विचार करताना समितीने विदर्भ, मराठवाडा, कोकण, मुंबई, पश्चिम, दक्षिण, उत्तर महाराष्ट्र अशा सर्व भागांतील स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलाखती घ्यायच्या होत्या. विदर्भातील जी नावे आम्ही काढली त्यात चंद्रशेखर धर्माधिकारींपासून वसंत साठेंपर्यंत आणि जवाहरलाल दर्डांपासून वर्ध्याच्या विनोबांच्या आश्रमातील अनेक जण होते. जवाहरलाल यांची मुलाखत नागपूरला घेऊन मी औरंगाबादला आलो ते गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव, भगवानराव देशपांडे यांच्या मुलाखती घ्यायला. अर्थातच, त्या मुलाखतींचा संदर्भ हैदराबाद मुक्ती संग्रामाशीही होता. औरंगाबादचे एक जानेमाने पत्रकार आणि त्या परिसराचा चालता-बोलता माहितीकोश म्हणजे बाबा दळवी. त्यांना भेटायला मी 'लोकमत'च्या औरंगाबादच्या कचेरीत गेलो. त्यांनीच माझी तेथे राजेंद्र दर्डांशी ओळख करून दिली. विशेष योगायोगाची गोष्ट ही, की खुद्द राजेंद्रबाबूच 'बालभारती'च्या सर्वोच्च समितीवर म्हणजे नियामक मंडळावरती होते. त्यांच्याकडे मुद्रणाविषयीची जबाबदारी 'बालभारती'ने दिली होती. मी त्याच वेळेला 'कथा स्वातंत्र्याची' या पुस्तकाचे लेखन करीत होतो, ज्याचा संदर्भ वरती आलाच आहे.

### विषयांची बारकाईने माहिती असणारे राजनभाऊ

'राजनभाऊ' तेव्हा 'लोकमत'च्या कार्यालयात एका मोक्याच्या जागी बसले होते आणि त्यांच्या पुढ्यात वृत्तपत्रीय स्तंभांच्या काही गॅलीज होत्या. तरुण, तरतरीत, गोरागोमटा आणि कामात मग्न, ही माझ्या मनात त्यांची उमटलेली पहिली प्रतिमा. बाबांनी माझी ओळख करून दिली, पुस्तक-प्रकल्पाच्या संबंधात नव्हे, तर 'इकॉनॉमिक टाइम्स'चा वार्ताहर म्हणून. ते 'इकॉनॉमिक टाइम्स' बारकाईने वाचत असावेत. त्या वेळेस 'एकाधिकार कापूस खरेदी'बद्दलच्या धोरणाची चर्चा होत होती.

राजनभाऊंनी नेमके मुद्दे उपस्थित करून त्या धोरणावर माझ्याशी चर्चा सुरू केली. 'इकॉनॉमिक टाइम्स'मध्ये मी महाराष्ट्रातील कापसापासून उसापर्यंत आणि सहकारी चळवळीपासून दुष्काळापर्यंत सर्व कृषीविषयक प्रश्नांवर रिपोर्टिंग करीत असे. त्यामुळे आमची चर्चा खूपच चांगली झाली. पण मला लक्षात आलेली गोष्ट म्हणजे त्यांना त्या विषयांची बारकाईने माहिती होती. माझ्यापेक्षा ते आठ-दहा वर्षांनी लहान होते आणि तरीही त्यांचा आवाका मोठा होता. विशेष

म्हणजे ते माझ्याशी 'वार्ताहर-पत्रकार' या नात्यानेच बोलत होते, त्या वृत्तपत्राचे 'मालक' म्हणून नव्हे. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे बाबा दळवींखेरीज इतर उपसंपादक आणि अन्य ज्युनिअर स्टाफही आमच्या गप्पा सुरू असताना येत होता. काही जणांना ते 'नंतर बाबांना विचारा' असे सांगत, तर काहींना तिथल्या तिथेच बाबांशी बोलून त्यांचे स्वतःचे मतही सांगत. म्हणजे अगदी कोणता फोटो वापरावा येथपासून एखादी बातमी पेज वनला घ्यावी की आत, याबद्दलही निर्णय देत. ज्याला 'हॅण्डऑन' न्यूज एडिटर म्हणता येईल, असा त्यांचा एकूण कारभार दिसत होता. स्टाफलाही खुद्द मालक 'न्यूज एडिटर'च्या खुर्चीत बसलेत, असे वाटत नव्हते.

सुमारे ४०-५० मिनिटांनंतर अगदी शेवटी मी 'बालभारती'च्या प्रकल्पाविषयी त्यांना सांगितले. त्यांना ते माहीत होते, पण मी जवाहरलाल दर्डा यांना भेटल्याचे माहीत नव्हते. मग त्यांनी त्यांच्याबद्दलच्या काही आठवणी सांगितल्या आणि 'लोकमत' १९७१मध्ये सुरू करताना त्यामागची प्रेरणा, भावना, मूल्य आणि विचार हा काँग्रेसप्रणीत स्वातंत्र्यचळवळीचाच कसा आहे, हेही सांगितले. ही त्यांची आणि माझी पहिली भेट, जी अगदी मला काल घडल्यासारखी आठवते.

त्यानंतर माझ्या तुरळक भेटी झाल्या, त्या मी 'महाराष्ट्र टाइम्स'चा संपादक असताना. माझे अग्रलेख, लेख, पुरवण्यांमधील नवे प्रयोग, माझ्या पुढाकाराने सुरू झालेल्या काही योजना वा कल्पना यावर त्यांची नजर होती आणि भेटलो की त्याबद्दल ते आवर्जून बोलत. पण माझ्या पहिल्या भेटीत आणि या भेटींमध्ये एक सहज न जाणवणारा लहानसा पण ठळक फरक होता. त्या वेळेस मी वार्ताहर होतो आणि आता एका प्रतिष्ठित दैनिकाचा मुख्य संपादक! त्या पदाबद्दलचा (आणि गोविंद तळवलकर यांच्यानंतर मी सूत्रे हाती घेतल्यामुळे असलेल्या दबदब्याचा!) आदरभाव त्यांच्या वागण्यात जाणवत असे.

कधी अग्रलेख 'जोरदार' झाल्याबद्दल तर कधी पहिल्या पानावरची बातमी काहीशी अवास्तव वाटल्याबद्दल ते मला 'मटा'मध्ये फोन करीत. पण त्या संभाषणाला त्यांची 'पत्रकारीवृत्ती' आणि या व्यवसायाबद्दल असलेली 'कमिटमेंट' दिसत असे. आपण जवाहरलाल दर्डांचे कुणी आहोत वा मालक आहोत, असा आविर्भाव त्या संभाषणात कधीही नसे. 'मटा' सोडल्यानंतर मी काही महिन्यांसाठी अमेरिकेला 'व्हिजिटिंग फॅकल्टी' म्हणून गेलो होतो. त्याच वर्षी अमेरिकेच्या 'वर्ल्ड ट्रेड सेंटर' आणि 'पेण्टॅगॉन'वर दहशतवादी हल्ले झाले होते. त्याबद्दल 'मटा'मध्ये व अन्यत्र माझे लेख आले आणि अनेक ठिकाणी भाषणेही झाली. सुमारे १३-१४ वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. त्यांनी माझे एक भाषण यवतमाळलाही ठेवले होते.

### 'लोकमत'मुळे महाराष्ट्राचा 'डीएनए' समजला

साधारणपणे तेव्हापासून ते व विजयबाबू मला 'लोकमत' समूहाचे 'एडिटर इन चीफ' म्हणून येण्याची गळ घालत होते. पण मी कुठेच तसा जाण्याचा विचार करीत नव्हतो. कारण अमेरिकेतील माझी 'प्राध्यापकी' अजून दोन वर्षे चालणार होती. (दर वर्षातून जास्तीत जास्त तीन महिने). एखादे समाजशास्त्रीय-राजकीय पुस्तक लिहायचा माझा विचार होता. ('बालभारती'ने १९८५ मध्ये प्रसिद्ध केलेले 'कथा स्वातंत्र्याची' हे पुस्तक चांगलेच गाजले होते.) म्हणून मी राजनभाऊ व विजयबाबूंची विनंती अव्हेरत होतो. पण अखेरीस त्या दोघांनी डॉ. रफीक झकेरिया (ज्यांच्याशी माझे चांगले संबंध होते.) यांच्या मध्यस्थीने मला अतिशय आग्रहपूर्वक विनंती केली आणि त्या बैठकीत मी ती 'ऑफर' मान्य करुन टाकली...

१ जानेवारी २००२ रोजी मी 'लोकमत'मध्ये 'एडिटर इन चीफ' म्हणून रुजू झालो. लवकरच माझ्याकडे 'लोकमत टाइम्स'ची सूत्रेही सोपविण्यात आली. 'लोकमत'मध्ये आल्यानंतर मी अक्षरशः पायाला भिंगरी लागल्यासारखा महाराष्ट्रभर फिरलो. मराठवाडा तर मी पिंजून काढला. त्यांच्या सर्व आवृत्त्यांना भेट दिली. निरनिराळ्या गावांमधील 'स्ट्रिंजर्स'ना भेटलो. त्याचप्रमाणे उत्तर महाराष्ट्रातही जळगाव, धुळे, नाशिक असा आठ-दहा दिवसांचा दौरा काढून सर्व स्थानिक संपादकांबरोबर सविस्तर चर्चा केल्या. दर्डांच्या नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती या प्रदेशातही ठिकठिकाणी गेलो. 'मटा'मुळे पुणे-मुंबई-कोल्हापूर-सांगली-सातारा हे तर माझ्या पायाखालचे प्रदेश होते. परंतु एक निश्चितपणे म्हणता येईल, की 'लोकमत'ने मला दाखविलेला महाराष्ट्र वेगळा होता. खऱ्या अर्थाने तळागाळात 'लोकमत' पोचला होता. प्रतिष्ठित-अभिजन वर्गाला अजूनही हा महाराष्ट्र माहीत नाही. मला 'लोकमत'मुळे महाराष्ट्राची खरी 'कॅरॅक्टर'– महाराष्ट्राचा 'डीएनए' समजला.

### 'लोकमत'मुळे वृत्तपत्र व्यवसायाची नवी ओळख झाली !

महाराष्ट्रात फिरणारा संपादक म्हणून लोक मलाही नव्याने ओळखू लागले. वातानुकूलित केबिनमध्ये बसून नव्हे, तर थेट लोकांमध्ये जाऊन त्यांच्या जीवनाचे, समस्यांचे प्रतिबिंब 'लोकमत'मध्ये प्रकट व्हावे, ही जवाहरलाल दर्डांची इच्छा व कल्पना मला प्रत्यक्षात आणण्याची संधी मिळाली. पण जवाहरलाल दर्डा दिवंगत होऊन तेव्हा चार-पाच वर्षे झाली होती. त्यांचे

‘लोकमत’ हे मिशन त्याच दृष्टीने चालवले जावे, ही त्यांची इच्छा माझ्यापर्यंत पोचवली ती राजनभाऊ आणि विजयबाबूंनी.

माझे दौरे झाले की आमची एक ‘ब्रेन स्टॉर्मिंग मीटिंग’ होत असे. राजेंद्र दर्डा त्या बैठकांमध्ये महाराष्ट्राचा माझा रिपोर्ट काळजीपूर्वक ऐकत. आमदार व मंत्री म्हणून त्यांच्याकडेही त्यांची निरीक्षणे असत. त्या ‘एक्स्चेंजेस’मधून मला ‘वृत्तपत्र’ या व्यवसायाची नवी ओळख झाली. ती ओळख करून देण्यात राजनभाऊंचा मोठा वाटा आहे, हे मला कृतज्ञतेने नमूद करायलाच हवे!

**कुमार केतकर**
मुंबई

दि. १२ जानेवारी, २०१५

■●

# पुस्तकामागची भूमिका

■ अतुल कुलकर्णी
*(वरिष्ठ सहाय्यक संपादक, लोकमत, मुंबई)*

'आमचं विद्यापीठ' या पुस्तकाचे कव्हर काय असावे, यासाठी आम्ही काही दिवस चर्चा करीत होतो. नागपूरला विवेक रानडे नावाचे एक अफलातून व्यक्तिमत्त्व आहे. खास वैदर्भीय टच असणारा हा माणूस; एकदम मोकळाढाकळा. मनात जे येते ते स्पष्टपणे बोलून दाखवणारा, नजर मात्र कलावंताची. रानडेंच्या ऑफिसमध्ये आम्ही बसलो होतो. दोन व्यक्ती त्यांच्याकडे कसला तरी लोगो बनवून घेण्यासाठी आल्या होत्या. त्यातून आमच्या गप्पा सुरू झाल्या. अनुभवातून जे शिकायला मिळते ते पुस्तकी ज्ञानापेक्षा कितीतरी वेगळे असते, हे विवेक पटवून देत होते.

विवेक एका खूप मोठ्या ॲड एजन्सीमध्ये काम करीत होते. मायकल जॅक्सनचा तेव्हा बंगलोरचा शो काही कारणांमुळे झालाच नाही. दुसऱ्या दिवशी सगळ्या वर्तमानपत्रांचे मथळे 'मायकल जॅक्सनचा शो फ्लॉप' असे छापून येणार होते. तो शो पेप्सीने आयोजित केला होता. तेव्हा त्या एजन्सीच्या 'ॲड गुरू'ने सगळीकडे बातमी छापून आणली 'पेप्सी शो फ्लॉप' आणि पेप्सीला भारतात तुफान प्रसिद्धी मिळाली. नकारात्मक प्रसिद्धीतून देखील कसे

ब्रॅण्डिंग करून घेता येते, याचा अनुभव विवेक रानडेंनी कोणत्याही कॉलेजात न जाता एका घटनेतून घेतला होता.

## अनुभवातून शिकवणारे गुरू

हा अनुभव सांगून झाल्यावर मी विवेक रानडेंना म्हणालो, की आपल्याही पुस्तकाचे हेच सूत्र आहे. पत्रकारितेची कोणतीही पदवी किंवा तत्सम शिक्षण न घेतलेल्यांना राजेंद्र दर्डा यांनी स्वतःच्या अनुभवातून शिक्षण देत पत्रकार कसे केले, याचे असेच वेगवेगळे किस्से या पुस्तकात आहेत. त्याचे कव्हर काय करायचे ते तुम्ही ठरवा... आणि विवेकच्या कल्पनेतून या पुस्तकाचे हे कव्हर आकाराला आले.

या पुस्तकाचा घाट कशासाठी, असा प्रश्न काही लोकांना पडू शकेल. पण त्याला कारणही तसेच आहे. पाहता पाहता तीन दशकांहून अधिक काळ झाला. 'लोकमत' औरंगाबादला आला. रुजला, वाढला आणि फोफावला. व्यावसायिक दृष्टीने विचार केला तर ते एक 'प्रॉडक्ट' होते; त्याचा आता 'ब्रॅण्ड' झाला. पण सर्वसामान्यांच्या दृष्टीने 'लोकमत' ही एक सवय झालीय. ती कुणाची शाळा असेल तर कोणाचे विद्यापीठ! त्याचा कुलगुरू मात्र आम आदमीच आहे. लोकजीवनाशी एकरूप झालेल्या, त्याच्या भावभावनांशी समरस झालेल्या या व्यासपीठाला काय म्हणावे!

'लोकमत'चे संस्थापक संपादक कै. जवाहरलाल दर्डा म्हणायचे, की पाच वर्षांतील पावणेपाच वर्षे आपण लोकांसोबत राहायचे आणि निवडणुकीच्या काळात काँग्रेससोबत. कारण काँग्रेस ही त्यांची निष्ठा होती. वर्तमानपत्राच्या स्टॉलवर, गावागावांत अनेक वर्तमानपत्रांतून ग्राहक ज्या वेळी 'लोकमत'ची मागणी करतो त्याची अपूर्वाई राजेंद्र दर्डा यांच्यासाठी काही औरच असते. त्यांना ती मनापासून भावते. पुण्या-मुंबईचे सोडून द्या, पण महाराष्ट्रातल्या पिढ्या 'लोकमत'वर पोसल्या आहेत, हे सत्य टीकाकारांनाही मान्य करावेच लागेल.

दृष्टी असेल तर ग्रामीण भागात व्यवसाय कसा करावा याचा वस्तुपाठ खा. विजयबाबू दर्डा आणि राजेंद्रबाबू दर्डा यांनी घालून दिला आणि अनेक वर्षांनंतर मुंबईतल्या साखळी वर्तमानपत्रांना जाग आली! त्यांच्याबरोबरीने देवेंद्र, ऋषी आणि करण दर्डा यांनीदेखील 'लोकमत'चा झेंडा उंच उंच नेला. जेव्हा 'लोकमत' मराठवाड्यात सुरू झाला तेव्हा वर्तमानपत्र वाचणे ही ठरावीक लोकांची मक्तेदारी समजली जात होती. तेथे टपरीपासून हॉस्पिटलपर्यंत 'लोकमत'ने वाचनाची

आवड निर्माण केली. समाज सुसंस्कृत करण्यासाठीची ती न बोलता केलेली चळवळच जणू. त्यामुळे मराठवाडा वाचू लागला! शिवाय मराठवाडा-विदर्भातले प्रश्न, समस्यांना उजेडात आणत, त्याचा पाठपुरावा करीत जोडीला पश्चिम-उत्तर महाराष्ट्र घेऊन 'लोकमत' विस्तारला.

याचे श्रेय कोणाला, असा प्रश्न कोणी राजेंद्रबाबूंना केला तर ते निर्विवादपणे 'लोकमत परिवारा'ला असे उत्तर देतील. हा परिवार जात, धर्म, प्रांत आणि प्रदेशाच्या चतुःसीमेच्या पलीकडचा आहे. वर्तमानपत्र कशावर चालते? भाषा, गुणवत्ता, विचार, मूल्य की स्पिरिट? यावर खरे तर वारंवार चर्चा झाली पाहिजे. भांडवल, तंत्रज्ञान, व्यावसायिक कौशल्य या गोष्टीत सांघिक स्पिरिट नसले तर फार कामाला येत नाहीत. ज्याची 'टीम' चांगली तो तरणार, टिकणार अन् वाढणारदेखील!

### चेहरे नसलेल्यांना ओळख दिली

ही टीम वाढवण्याचे, टीममध्ये सांघिक स्पिरिट निर्माण करण्याचे काम राजेंद्र दर्डा या व्हिजनरी व्यक्तीने केले. 'लोकमत'चे मालक असूनही कधी ते मालकासारखे वागले नाहीत. कधी कोणाला उजव्या हाताने केलेली मदत त्यांनी त्यांच्या डाव्या हातालाही कळू दिली नाही. तुम्ही दहा तास काम करीत असाल तर मी बारा तास करीन, हे सांगण्याची त्यांना कधी गरज पडली नाही; कारण ते तसे करीतच होते. पर्यायाने काही न बोलता त्यांच्यासोबत काम करणाऱ्या प्रत्येकाला त्यांनी हीच सवय लावली.

लौकिकार्थाने पत्रकारितेची पदवी न घेताही अनेकांना पत्रकारितेत नावलौकिक मिळाला; त्याला कारण ठरले होते ते राजेंद्र दर्डा. गेली पंधरा वर्षे ते सक्रिय राजकारणात होते. त्यामुळे पत्रकारितेचा आणि त्यांचा तसा थेट संबंध नव्हता. त्यामुळे नव्या पत्रकारांना कदाचित त्यांची ओळख राजकारणी, उद्योगमंत्री, शिक्षणमंत्री, वृत्तपत्राचे मालक एवढीच असेल. मात्र पत्रकारितेची कोणतीही पदवी न घेतलेल्या अनेकांना त्यांनी पत्रकार म्हणून नावारूपाला आणले. त्या प्रत्येकाला स्वतःची अशी ओळख निर्माण करून दिली.

### स्वत:सोबत कर्मचाऱ्यांना मोठे केले

वृत्तपत्रीय व्यवहाराचे व्यवस्थापन व्यावसायिक गरजेपोटी, छपाई तंत्रज्ञानाबद्दल सतत अद्ययावत राहणे कुतूहलापोटी; तर बातमी, लेखन, संपादन या गोष्टी आत्यंतिक आवडीपोटी

राजेंद्र दर्डा यांनी केल्या. आमच्यासारख्या पत्रकारितेचा गंधही नसलेल्या आणि नोकरीसाठी म्हणून 'लोकमत'मध्ये आलेल्यांचे ते केवळ संपादक झाले नाहीत तर प्रसंगी कठोर शिक्षक, प्रेमळ पिता आणि मनस्वी मार्गदर्शकही झाले. म्हणून आमच्यासारख्या अनेकांचे ते चालतेबोलते विद्यापीठ बनले.

### अपार कष्टातून मिळवलेले घवघवीत यश

'लोकमत'ला मिळालेले यश हे सोन्याच्या ताटात वाढून आलेले नाही. १५ डिसेंबर १९७१ साली नागपूरला, तर १५ डिसेंबर १९७७ ला जळगावला 'लोकमत' सुरू झाले. राजनबाबू परदेशातून वृत्तपत्राशी संबंधित अभ्यासक्रम करून आले. नागपूर, विदर्भ हे त्या वेळी विजयबाबू आणि राजनबाबू या दोन भावांना छोटे वाटू लागले. कोलंबसला जशी अमेरिका सापडली तसे राजेंद्रबाबूंना औरंगाबाद सापडले. काहीतरी करून दाखवण्याच्या इच्छेपोटी ते औरंगाबादला आले. त्यावेळी फार खपाचे दैनिक या भागातून चालेल, असे त्यांनाही कधी वाटले नव्हते. तसे ते बोलूनही दाखवीत. मात्र बाबा दळवींसोबत स्वतःची अशी टीम घेऊन ते मराठवाड्यात उतरले. तो दिवस होता ९ जानेवारी १९८२. आशय आणि सामाजिक बांधीलकी यात तडजोड न करता, तांत्रिक दृष्टीने आपण सगळ्यांच्या पुढे असले पाहिजे, हा दृष्टिकोन ठेवून त्यांनी वाटचाल सुरू केली.

सुरुवातीची वाटचाल खडतर होती. पहिल्याच दिवशी भांडवल एवढे कमी होते, की एमएफएससीकडून त्यांना १८ लाख रुपयांची उभारणी करावी लागली. (पुढे ते राज्याचे उद्योगमंत्री झाले आणि अनेक उद्योगांना त्यांनी करोडो रुपयांची मदतही मिळवून दिली हा भाग अलाहिदा!) त्यावेळी ४ हजार स्क्वेअर फूट बांधकाम असणाऱ्या इमारतीत 'लोकमत'चा पहिला अंक निघाला होता. सतत वेगळे काहीतरी करण्याची त्यांची वृत्ती प्रकाशनाच्या दिवशीच औरंगाबादकरांनी अनुभवली होती. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले, केंद्रीय मंत्री शंकरराव चव्हाण, शिवराज पाटील-चाकूरकर, शिवाजीराव पाटील-निलंगेकर अशी मंडळी तेथे होती. प्रकाशन झाले आणि त्याच प्रकाशनाचा फोटो छापलेला अंक प्रकाशन सोहळा संपण्याच्या आत, तासा-दोन तासांत त्यांनी कार्यक्रमस्थळी आणून सगळ्यांना थक्क करून टाकले होते. पाहुणे कार्यक्रमाच्या ठिकाणी आले आणि अंकाचे प्रकाशन झाल्याची फोटोसह बातमी असलेला अंक घेऊन बाहेर पडले होते. आज प्रत्येकाच्या हातात इंटरनेट आहे; पण आजपासून ३२ वर्षे

आधी असे काही करण्याची कल्पना सुचणेदेखील अशक्यप्राय गोष्ट होती. ‘लोकमत’ची मराठवाड्यात खरी चर्चा सुरू झाली ती याच गोष्टीपासून.

### गतिमान बातम्यांचे वेड

मराठवाड्यात ‘लोकमत’ने नवे काय केले, असा प्रश्न अनेकांना पडेल. पण त्या काळी ‘लोकमत’ने सर्व जिल्ह्यांत पूर्णवेळ जिल्हा प्रतिनिधी नेमण्याचे मोठे काम केले. नंतर राज्यातल्या तमाम वर्तमानपत्रांनी हा प्रयोग स्वतःसाठी राबवला. दहावी-बारावीच्या निकालाला उत्सवी रूप देण्याचे काम ‘लोकमत’ने केले. रंगीत पुरवण्या सुरू करणारे हे पहिले दैनिक. चार पानी रंगीत पुरवणी ही कल्पना ‘लोकमत’ने जन्माला घातली. सगळ्या ठिकाणी डाटा ट्रान्समिशन सिस्टीम सुरू केली. आधी फॅक्स आणि नंतर पॉइंट टू पॉइंट टेलिप्रिंटर करीत करीत हा प्रवास आज पेजेस ट्रान्सफर होण्याच्याही पुढे गेला आहे. काही सेकंदातच ‘लोकमत’ची पाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचतात. हे करीत असताना बातम्यांमधली गती हा ‘लोकमत’चा मोठा जमेचा भाग ठरला. रात्री उशिरा घडलेली बातमी दुसऱ्या दिवशी ‘लोकमत’मध्ये दिसलीच पाहिजे, हा दंडक राजेंद्रबाबूंनी घालून दिला. खूप उशिरा घडलेली एक घटना तर राजेंद्रबाबूंनी हाताने लिहून अंकात लावली. औरंगाबादेत विमान अपघात झाला. व्हिडीओकॉनचे नंदलाल धूत त्यात गेले. अनेक हातांना काम देणारे उद्योजक त्या अपघाताने हिरावले. अपघातस्थळी सगळ्यात आधी पोहोचणारे पत्रकार होते राजेंद्र दर्डा! विमान जळतानाचा पहिला आणि एकमेव फोटो त्यांनी काढला होता.

केवळ बातम्यांपुरते हे वेड मर्यादित नव्हते. १९८७-८८ च्या काळात औरंगाबादेत दंगल झाल्यानंतर त्यांनी पुढाकार घेत समाजात सलोखा राहिला पाहिजे, म्हणून गांधी जयंतीच्या निमित्ताने २ ऑक्टोबरला रॅली काढण्याची पद्धत सुरू केली. अनेक वर्षे ही रॅली नंतर निघत राहिली. १९८५ मध्ये नांदेड, परभणीत पुराचा तडाखा बसला. भर पावसात ‘लोकमत’ची टीम वाचकांना घेऊन गावात फिरली. निधी उभा केला गेला. पूरग्रस्त भागात शाळा, वर्ग बांधून दिले गेले. लातूर-उस्मानाबाद भूकंपात मदत घेऊन जाणारे पहिले तीन ट्रक राजनबाबूंनी पाठवलेले होते! वाचकांना विश्वासात घेऊन समाजाची मदत समाजापर्यंत पोहोचती करण्याची बांधीलकी त्यांनी जपली.

**पगार देण्यासही पैसे नव्हते, पण होती टोकाची जिद्द !**

सुरुवातीची दोन-तीन वर्षे पगार देतानादेखील दमछाक होत असे. मात्र गेल्या ३२ वर्षांत 'लोकमत'ने पगाराची तारीख कधीही चुकवली नाही. जाहिरातदारांकडून वसुली करून, प्रसंगी लोकांकडून उसने पैसे घेतले गेले; पण कर्मचाऱ्यांचे पगार कधी थकवले नाहीत! त्यामुळे 'लोकमत'मध्ये कोणी निव्वळ पोटार्थी म्हणून आले नाही. जे टिकले ते परिवाराचा भाग बनून गेले. बस स्टॅण्डवर जाऊन बातम्यांची पाकिटे आणण्याचे काम असेल किंवा रेल्वे स्टेशनवर जाऊन काही देऊन यायचे असेल, हे माझे काम नाही, असे कधी कोणी म्हटले नाही. अगदी राजेंद्र दर्डा यांच्यापासून ते रघू नावाच्या स्वीपरपर्यंत! आपल्या सहकाऱ्यांच्या मनात टोकाची कमिटमेंट निर्माण करण्यात राजनबाबूंनी सिंहाची भूमिका निभावली जी 'लोकमत'ची सगळ्यात मोठी ताकद बनली.

**गड्याचे गवंडी करणारा आर्किटेक्ट !**

कोणत्याही मोठमोठ्या कंपन्यांची लेबलं न लावलेली, कसल्याही पदव्यांची भेंडोळी न दाखवणारी आणि फाडफाड इंग्रजी बोलून फुकटचे इम्प्रेशन पाडत फिरण्यापेक्षा कामात धन्यता मानणारी साधी पण गुणी माणसं या विद्यापीठातून तावूनसुलाखून निघाली. ही साधी माणसं 'लोकमत'सोबत मोठी झाली आणि याच लोकांनी राजनबाबूंसोबत 'लोकमत'ला सर्वाधिक खपाचे दैनिक असा बहुमान मिळवून दिला. यामागे जादू होती राजेंद्र दर्डा या पाच अक्षरी विद्यापीठाची. संस्थेसाठी जी जान देणारी टीम उभी करण्याचे कौशल्य त्यांच्या अंगी होते. 'लगान' सिनेमा तर २००१ साली आला. मात्र त्याच्याही आधी म्हणजे १९८२ साली राजेंद्रबाबूंनी पत्रकारितेत अनेक 'भुवन' तयार केले. नाव असणारे पत्रकार आपल्याकडे असले पाहिजेत, असा अट्टहास आजच्या जमान्यात केला जात असताना 'लोकमत'च्या रूपाने राजेंद्रबाबूंनी गड्याचे गवंडी करण्याचे काम यशस्वीपणे पार पाडले होते. ३२ वर्षे आधीचा काळ डोळ्यांपुढे आणून पाहा, मग यातले वास्तव लख्खपणे समोर येईल! उपसंपादकांना प्रशिक्षण देण्याचे काम 'लोकमत'ने सुरू केले. त्यातून मराठवाड्यात पत्रकारांची मोठी टीम तयार झाली. 'लोकमत'ने अनेक आवृत्त्यांना संपादक दिले; एवढेच नाही तर आज महाराष्ट्र शासनाच्या माहिती खात्यात सगळ्यात जास्त अधिकारी याच विद्यापीठाचे आहेत.

'लोकमत'मध्ये अनेक जण आले. येताना काही हेतू ठेवून आले. हेतू साध्य होत नाहीत हे

लक्षात येताच निघूनही गेले. काहींनी स्वतःच्या व्यक्तिगत कारणांसाठी नोकरी सोडली हा भाग वेगळा. मात्र या संस्थेने स्वतःच्या बरोबरीने इथे काम करणाऱ्या प्रत्येकाला मोठे केले. 'लोकमत'च्या बरोबरीने इथे काम करणारी माणसे सामाजिक, भौतिक आणि लौकिकार्थाने मोठी होत गेली, सुखी होत गेली. म्हणून तर 'लोकमत परिवार' असा उल्लेख सगळे जण करतात. अन्य कोणत्याही वर्तमानपत्राला स्वतःच्या नावासोबत परिवार हा शब्द आजतागायत लावता आलेला नाही. इथे काम करणाऱ्यांनी आपण नोकरी करतोय, या भावनेने आजवर कधीच काम केले नाही. म्हणूनच जे नोकरी करण्यासाठी आले ते काही काळ नोकरी करून निघून गेले. पण अनेक जण असेही आहेत ज्यांनी कमीत कमी १० वर्षे आणि जास्तीत जास्त ३० वर्षांहून अधिक काळ या संस्थेसोबत घालवला आहे. या सगळ्यांना बांधून ठेवणारे एकमेव सूत्र म्हणजे राजेंद्र दर्डा.

**मुक्त स्वातंत्र्य देणारे संपादक**

महाराष्ट्रात आज असा एकही संपादक नाही ज्यांनी 'लोकमत'साठी आपले योगदान दिलेले नाही. 'लोकमत'शी संबंध आला नाही असे म्हणणारा एकही पत्रकार सापडणार नाही. 'लोकमत'एवढे स्वातंत्र्य मला वाटत नाही अन्य कोणत्या वर्तमानपत्रात मिळत असेल. या स्वातंत्र्याचा काम करणाऱ्यांपेक्षा वर्तमानपत्राच्या मालकांनाच जास्त त्रास झाल्याची उदाहरणे अधिक सापडतील.

या स्वातंत्र्यामागे राजेंद्र दर्डा ही व्यक्ती होती. बस स्टॅण्ड असो की रेल्वे स्टेशन. बातमी असो की मशीन विभाग. 'लोकमत'मध्ये बातम्या आणि जाहिराती आणण्यापासून ते मशीनच्या स्पेअरपार्टच्या दुरुस्तीपर्यंतचा एकही विभाग असा नाही, की ज्या विभागात त्यांनी काम केले नाही. बातम्या असोत किंवा लेख, त्यांना कोणी फसवू शकत नाही. एखाद्याला जर त्यांनी टोमणा मारला तर तो ज्याला असतो त्यालाच कळतो, बाकीच्यांना काही तरी विनोद झाल्यासारखे वाटते. मात्र तो टोला ज्याला बसलेला असतो त्याला अशी शिक्षा पुन्हा नको असे वाटत राहते, हे त्यांचे स्वभाववैशिष्ट्य.

नव्या शहरात पहिली स्कूटर, पहिले भाड्याने घेतलेले घर, पहिली कार, पहिला टेलिप्रिंटर, पहिला फॅक्स, पहिली रंगीत छपाई, पहिले ऑफसेट आणि भल्या मोठ्या दगडावर बसून केलेले अनेक विक्रम. स्वतःचेच विक्रम स्वतः मोडण्याचे व्यसनच जणू त्यांना पत्रकारितेत असताना लागले. त्या काळात सगळा गाडा सांभाळताना, सहकाऱ्यांचे पगार देतानाही त्यांच्याजवळ पैसे

नसायचे, पण पगाराची तारीख त्यांनी कधीही चुकू दिली नाही.

**टोकाची कमिटमेंट निर्माण केली**

स्वतःजवळ आणि स्वतःसोबत काम करणाऱ्यांच्या मनात टोकाची कमिटमेंट निर्माण करण्याची प्रचंड ताकद असलेल्या राजेंद्र दर्डा यांच्याबद्दल त्यांच्यासोबत काम केलेले माझ्यासह अनेक जण बोलत बसले, तर रात्रीचा दिवस कधी झाला तेही कळणार नाही. हे असे व्यक्तिमत्त्व आहे, ज्याने अनेकांच्या घरात प्रकाश आणला, नवी उमेद दिली.

**पत्रकारिता करणाऱ्यांना या पुस्तकाची मदत व्हावी ही प्रामाणिक भावना**

म्हणूनच या पुस्तकाचा घाट घालण्याची कल्पना मी सगळ्यात आधी माझे फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाइड उदय बोपशेट्टी यांना बोलून दाखवली. त्यानंतर व्यंकटेश केसरी, दिनकर रायकर यांच्याशी बोललो तेव्हा त्यांनी तत्काळ ती उचलून धरली. यासाठीचा पहिला लेख कोणताही पाठपुरावा न करता तातडीने पाठवला तो व्यंकटेश केसरी यांनी. शिवाय यात ज्यांनी ज्यांनी लेखन केले आहे त्या सगळ्यांचा मी आभारी आहे. ९ जानेवारी २०१५ रोजी औरंगाबाद 'लोकमत'च्या वर्धापन दिनी या पुस्तकाच्या मुखपृष्ठाची प्रत दिनकर रायकर, चक्रधर दळवी यांच्यासह आम्ही राजेंद्रबाबूंना दिली. त्यांच्यासाठी ते अनपेक्षित होते. ती फ्रेम पाहून त्यांच्या चेहऱ्यावरचे जे भाव आम्ही अनुभवले ती आमची सगळ्यात मोठी कमाई. त्या दिवशी त्यांनी 'लोकमत'च्या अगदी सुरुवातीच्या काळात त्यांच्यासोबत काम केलेल्या संतोष महाजन, विद्याभाऊ सदावर्ते यांना आवर्जून बोलावले. त्यांचा सत्कार केला. त्यामागे भावनेचा ओलावा होता, आपुलकी होती. त्या दिवशी मी त्यांना काही प्रश्न थेट विचारले. त्यांनीदेखील थेट उत्तरे दिली. त्या छोट्याशा मुलाखतीने या पुस्तकाचा समारोप केला आहे.

पत्रकारितेविषयी उत्सुकता, कुतूहलमिश्रित भावभावना मनात ठेवून या व्यवसायाकडे पाहणाऱ्यांसाठी हे पुस्तक आगळावेगळा अनुभव ठरेल. ज्यांना नव्याने पत्रकार म्हणून काम करायचे आहे अशांसाठी तर ही मोलाची शिदोरी ठरावी, हा हेतू हे पुस्तक तयार करण्यामागे आहे. आमचा हा सांघिक प्रयत्न आपल्याला नक्कीच आवडेल या अपेक्षेने...

विवेक रानडे यांनी पुस्तकाचे कव्हर तयार केले तर 'आमचं विद्यापीठ' नावाची कॅलिग्राफी केली अक्षरलेखनात जागतिक कीर्ती मिळविणाऱ्या अच्युत पालव यांनी. या पुस्तकाची अंतर्गत

मांडणीदेखील अच्युत यांनी खूप आपलेपणाने केली. पुस्तकाचे आधी केलेले डिझाइन अच्युतने पूर्णपणे बदलले. म्हणूनच आपल्यासमोर हे सुबक आणि चांगले पुस्तक येऊ शकले. या दोघांच्या प्रेमाचे असे आभार मानणे फारच औपचारिक ठरेल.

पुस्तकातली ओळन्‌ओळ वाचून दुरुस्ती करणाऱ्या दिनकर रायकर, नंदू पाटील आणि चंद्रशेखर कुलकर्णी यांचे मनापासून आभार.

या पुस्तकासाठी लेखन करणारे, माहिती मिळवून देणारे, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणारे अनेक हात आहेत. त्या सगळ्यांचा नामोल्लेख केवळ अशक्य आहे. मुंबईत रेखा प्रकाशन १९६७ साली हेमराज शहा यांनी सुरू केले. अत्यंत सचोटीने काम करणारे पत्रकार आणि प्रकाशक म्हणून सगळे त्यांना ओळखतात. कायम जमिनीवर पाय असणाऱ्या हेमराजभाईंची ओळख रायकरसाहेबांमुळे झाली आणि त्यांच्यामुळे त्यांचा मुलगा अरविंदची ओळख झाली. दोघांनीही मला हवे तसे पुस्तक तयार करू दिले. या संपूर्ण कामात सहकार्य करणाऱ्या सगळ्यांचा मी कायम आभारी आहे. माझी पत्नी दीपा आणि मुलगी गार्गी यांनी मला मोकळीक दिली त्याचा उल्लेख नाही केला तर...

सगळ्यात शेवटी, ज्यांच्यामुळे हे पुस्तक आकाराला येऊ शकले त्या आदरणीय राजेंद्रबाबूंचे ऋण शब्दांत मांडणे फारच कोरडेपणाचे होईल. अशी कितीही पुस्तके निघाली तरीही ते ऋण संपणारे नाही... मी कायम त्या ऋणात आहे...

सर, थँक्यू...

**अतुल कुलकर्णी**
मुंबई

दि. ९ जानेवारी २०१५

# निष्णात पत्रकार, संपादक

## दिनकर रायकर

*(समूह संपादक, लोकमत वृत्तपत्र समूह, मुंबई)*

सन १९६३ ते २००२ या काळात मी इंडियन एक्स्प्रेसमध्ये पत्रकारिता केली. रिपोर्टर ते सिटी एडिटर असा हा प्रवास मला खूप अनुभव देऊन गेला. अनेक चांगले मित्रही मला या काळात जोडता आले. अगदी स. का. पाटील, बाळासाहेब ठाकरे, रजनी पटेल, राम जेठमलानी, जॉर्ज फर्नांडिस, डॉ. दत्ता सामंत, सुनील दत्त अशी मुंबई गाजवणारी अनेक नावे माझ्या व्यक्तिगत परिचयाची झाली. अगदी हाजी मस्तान, युसूफ पटेल, अरुण गवळी यांच्यासारखे वेगळ्या अर्थाने मुंबई गाजवणाऱ्यांचे अंतरंगही मला पाहता आले. वरदराजन तर माझ्या वांद्रे येथील घरी येऊन सोफ्यावर न बसता खाली जमिनीवर बसून चहा पिऊन गेला. अशा अनेक आठवणी या वर्तमानपत्राने मला दिल्या. याच वर्तमानपत्राचे मालक रामनाथ गोएंका हे त्या काळी दबदबा असलेले नाव कधी माझ्या व्यक्तिगत परिचयाचे झाले तेही मला कळले नाही.

एक प्रसंग मुद्दाम सांगतो, मुंबईत प्रचंड पाऊस झाला होता. अनेक जण ऑफिसला पोहोचू शकले नव्हते. रात्रपाळीचे मोजकेच लोक काम करीत

होते. त्या वेळी स्टाफ कमी असेल असे समजल्याने २६ व्या मजल्यावर राहणारे आरएनजी (रामनाथ गोएंकांना लोक आरएनजी या टोपणनावाने ओळखत असत) कम्पोजिंग विभागात आले व कामात मदत करण्यासाठी म्हणून गॅली हातात धरून काम सुरू केले. स्वतः आरएनजी गॅली धरून काम करीत असल्याचे पाहून साहजिकच आजूबाजूचे लोक कावरेबावरे झाले. त्याचा परिणाम कामावर होऊ लागला. हे लक्षात येताच त्या वेळचे न्यूज एडिटर एस. कृष्णमूर्ती आत आले आणि आरएनजींना म्हणाले, ''मिस्टर गोएंका, विल यू प्लीज गो आऊट ऑफ दी रूम. माय वर्क इज गेटिंग डिलेड बिकॉज ऑफ युवर प्रेझेन्स. आय हॅव टू ब्रिंग आऊट द पेपर टुमारो ऑन टाइम.'' सगळी कम्पोजिंग रूम स्तब्ध झाली आणि काय आश्चर्य एक शब्दही न बोलता आरएनजी त्या रूमच्या बाहेर गेले. दुसऱ्या दिवशी पेपर वेळेवर निघाला. कृष्णमूर्तींना सकाळी फायरिंग मिळणार, असा सगळ्यांचा कयास होता. मात्र झाले वेगळेच. सकाळी अकरा वाजता एस. कृष्णमूर्तींच्या टेबलवर पुष्पगुच्छ आणि थँक्यू अशी नोट ठेवलेली होती. त्याखाली आरएनजी अशी झोकदार सहीदेखील होती.

**त्यांच्या येण्यावर घड्याळ लावावे !**

अशा वातावरणातून मी निवृत्त झालो होतो. कुमार केतकर 'लोकमत'चे मुख्य संपादक होते. त्यांनी मला आग्रह धरला, की मी औरंगाबाद 'लोकमत'मध्ये जॉइन व्हावे. त्यासाठी त्यांनी माझी आणि राजेंद्र दर्डा यांची भेट मुंबईत घडवली. स्वतः राजेंद्रबाबूंनी मला फोन केला आणि आमच्या भेटीची वेळ ठरली. ते वेळेचे पक्के आहेत हे मी ऐकून होतो, त्याचा अनुभव पहिल्याच भेटीत आला. सकाळी ९-३०ची वेळ ठरली होती. मी ९-२५ लाच पोहोचलो, पण त्याच्याही आधी ते बैठकीच्या ठिकाणी हजर होते, बऱ्याच गप्पा झाल्या आणि मी 'लोकमत'मध्ये येण्याचे ठरले.

दुसऱ्या दिवशी औरंगाबाद कार्यालयात सकाळी १० वाजता आमच्या भेटीची वेळ ठरली. सकाळी ९-४५ वाजता रवींद्र कुंटे मला घेण्यासाठी आले आणि दहा वाजता त्यांच्या केबिनमध्ये पोहोचलो, त्या आधीच ते देखील तेथे आले होते. त्यांनी मला 'लोकमत'चा सगळा परिसर फिरून दाखवणे सुरू केले. आधी मशीन विभागात नेले. तेथे सुरेश महाजन मशीन विभागाची साफसफाई करून घेत होते. बारीक बारीक गोष्टी राजेंद्रबाबू मला सांगत होते. हा सुरेशचा नित्याचा कार्यक्रम आहे, इथपासून ते संपादकीय विभागात कोण कोठे बसतो इथपर्यंतचा सगळा बारीकसारीक तपशील ते मला सांगत होते. तेव्हा मला जाणवले, एक्स्प्रेसचे मालक गोएंकांना जशी व्यवसायाची

खडानूखडा माहिती होती तशीच 'लोकमत'चे मालक असणाऱ्या राजेंद्र दर्डा यांनाही होती.

**पेपर बारकाईने पाहायला लावणारे संपादक**

पुढे त्यांच्यातला संपादक, पत्रकारदेखील किती निष्णात आहे हे मला कळून आले. मी औरंगाबादला संपादक म्हणून जॉइन झालो. राजेंद्रबाबू त्या वेळी मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून काम करीत होते; तरीही त्यांच्यातला संपादक, पत्रकार सतत जागा होता. शनिवारी-रविवारी ते औरंगाबादला यायचे. अशाच एका शनिवारी ते आले. मला बोलावून घेतले, राजकीय गप्पा झाल्यानंतर त्यांनी त्या दिवशीचा 'लोकमत' पुढे केला. काही बातम्यांच्या पॅरेग्राफचे जस्टीफिकेशन झालेले नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. एवढ्या बारकाईने ते स्वतःचा पेपर पाहात असतील यावर माझा विश्वास नव्हता.

मंत्री असताना ते शनिवार - रविवार औरंगाबादेत येत. त्यांचे घर 'लोकमत'च्या मागेच. त्यामुळे ते घरी कधी आले हे कळायचे नाही. मात्र रात्री जेवण झाले की दहा-साडेदहाच्या सुमारास संपादकीय विभागात फेरफटका मारायला यायचे. याचे मला कौतुक असायचे.

कित्येक वेळा ते बैठका घ्यायचे व 'लोकमत'चे पोस्टमॉर्टेम करायचे. ते करीत असताना केवळ चुका दाखवण्यापुरते ते मर्यादित नसायचे, तर चुकीच्या जागी काय यायला हवे होते हे देखील ते सांगायचे. चुका दाखवणे सोपे असते; पण त्या जागी काय असायला हवे, हे सांगणे कठीण असते. पण ही कठीण बाजू ते सोप्या पद्धतीने सांगून मोकळे होत असत.

काही बातम्या सुटल्या आहेत असे त्यांनी मला एकदा दाखवून दिले. तेव्हा मी त्यांना म्हणालो, जाहिराती बऱ्याच होत्या आजच्या अंकात, जागा कमी पडल्याने त्या बातम्या आपल्याकडे असूनही अंकात लागू शकल्या नाहीत. त्यावर त्यांनी पेपर पुढे ओढला व चक्क पूर्ण पान एडिट करून दाखवले. त्यांनी पान एडिट केल्यानंतर त्या एकाच पानात दोन कॉलम जागा निर्माण झाली होती. चांगले एडिटिंग झाले तर पूर्ण अंकात किती जागा तयार होईल हे पाहा, असा सल्लाही त्यांनी दिला. एक पान वाचवले तर आपण वर्षाकाठी ८२ लाख रुपये वाचवू शकतो, हे गणितही त्यांच्याकडे तयार होते.

अशा जाणिवेतून एकेक वीट रचत त्यांनी औरंगाबाद 'लोकमत' उभा केला आहे. शिवाय तीच भावना त्यांनी कर्मचाऱ्यांच्याही मनात बिंबवली. संपूर्ण मराठवाडा त्यांना मुखपाठ आहे. त्यांनी गावन्‌गाव पिंजून काढले होते. कोणत्या गावात रस्ता आहे, कोणत्या गावात काय महत्त्वाचे आहे,

हेदेखील त्यांना माहिती होते. त्याचा फायदा त्यांनी स्वतःच्या पत्रकारितेत तर करून घेतलाच पण तीच शिकवण त्यांनी आपल्या संपादकीय सहकाऱ्यांच्या मनातही वाढवली. वार्ताहरांच्या, प्रतिनिधींच्या बातम्या एडिट करताना त्यात काय यायला हवे, हे सांगताना ते अनेक सत्य दाखलेही द्यायचे. कोणत्याही चांगल्या पत्रकाराला त्याचा विषय परिपूर्ण माहिती असायला हवा. त्यातले बारकावे कळायला हवेत, यासाठी त्यांचा आग्रह असायचा. कारण ते बारकावे त्यांनादेखील माहिती असायचे... बरेचदा वार्ताहर, प्रतिनिधींच्या बैठका ते घेत असत. ज्यांनी चांगले काम केले त्यांच्या पाठीवर थाप मारायची, ज्यांनी चुका केल्या आहेत त्यांना त्या दाखवून देणे, असे काम ते नेहमी आवडीने करायचे. अशा वेळी ते राजकारणी आहेत की पत्रकार, याचे मला सतत कोडे पडत असे. त्यांना एवढा वेळ कधी मिळतो, कधी ते पेपर वाचतात आणि कधी एवढ्या गोष्टी लक्षात ठेवतात, याचे मला कुतूहल असायचे. 'घार हिंडते आकाशी, लक्ष तिचे पिलापाशी' या उक्तीप्रमाणे त्यांचे 'फर्स्ट लव्ह' 'औरंगाबाद लोकमत' आहे, हे मला सतत जाणवत असायचे ते त्यांच्या बोलण्यातून.

### भूमिकांची गल्लत कधी केली नाही

कॅबिनेट मंत्री झाल्यानंतर सरकारच्या विरोधात बातम्या छापून आम्हीच त्यांना अडचणी निर्माण करू लागलो. त्यांनी एक कटाक्ष कायम बाळगला होता तो म्हणजे कॅबिनेट बैठकीत काय झाले हे त्यांनी कधीही 'लोकमत'च्या प्रतिनिधींना सांगितले नाही. मी सांगणार नाही, असेही ते ठामपणे सांगत होते. मात्र कॅबिनेटमध्ये घडलेल्या काही गोष्टी 'लोकमत'मध्ये छापून आल्या की कॅबिनेटमधील त्यांचे सहकारी त्यांच्याकडे बोट दाखवत. त्यात काही चुकीचे छापून आले तर त्यांना त्याचा त्रासही व्हायचा... ते अनेकदा ही गोष्ट मला बोलून दाखवत. वार्ताहराने बातमी देताना पूर्ण माहिती घेऊनच बातमी दिली पाहिजे, हे त्यांना समजावून सांगा, असेही ते सतत म्हणायचे. मात्र 'लोकमत'मध्ये छापून आलेल्या बातम्यांचा आधार घेत विधानसभेत जेव्हा विरोधक प्रश्न विचारायचे आणि म्हणायचे, दर्डाजी तुमच्याच पेपरमध्ये छापून आलंय... सत्य असणारच... तेव्हा ते मनातून सुखवायचे; पण तेथे मात्र सरकारचा प्रतिनिधी या नात्याने त्यांनी सरकारचीच बाजू लावून धरल्याची अनेक उदाहरणे आहेत.

'लोकमत'च्या बातम्यांचा सगळ्यात जास्त त्रास राजकारणी म्हणून कोणाला झाला असेल, तर तो राजेंद्र दर्डा यांना! मात्र त्यांनी तो कधी बोलून दाखवला नाही. कधी कधी ते त्रागाही करायचे,

पण तो तेवढ्यापुरताच... राज्य सहकारी बँकेच्या गैरकारभारावर 'नाबार्ड'ने ताशेरे ओढल्याचा अहवाल आला. तो सगळ्यात आधी 'लोकमत'मधून अतुल कुलकर्णी यांनी मालिकेच्या रूपाने मांडला. या बातम्या छापून येणार हे फक्त मला आणि त्याने लिहिल्या म्हणून त्याला माहिती होत्या. दुसऱ्या दिवशी बराच गहजब झाला. उपमुख्यमंत्री असणाऱ्या अजित पवारांनी अतुलजवळ नाराजी व्यक्त केली, राजेंद्रबाबूंनादेखील ते बोलले असावेत. मात्र त्या बातम्या थांबवा, असे कधी त्यांनी सांगितले नाही. मला फक्त एवढेच म्हणाले, चुकीचे काही येऊ देऊ नका... खुलासे छापू देणार नाही मी...

आता पुन्हा एकदा त्यांनी 'एडिटर इन चीफ' म्हणून 'लोकमत'ची सूत्रे हाती घेतली आहेत. गेली पंधरा वर्षे ते पत्रकारितेपासून दूर होते असे अजिबात वाटत नाही. याआधीदेखील ते बोलताना फोकस्ड असायचे. बोलताना मला पाच मिनिटे लागणार आहेत, असे सांगायचे आणि त्यांचे म्हणणे पाच मिनिटांत संपवायचेदेखील. विषय भरकटत नेणे त्यांना आवडत नाही, अघळपघळ गप्पा मारणे त्यांच्या स्वभावात नाही. नव्याने त्यांनी सूत्रे स्वीकारली व संपादकीय विभागाची बैठक मुंबईत घेतली. तेव्हा मी त्यांना म्हणालोदेखील, ''तुम्ही 'लोकमत'ची सूत्रे पुन्हा हातात घेतल्याने 'लोकमत'चा नक्कीच फायदा होणार आहे. कारण पत्रकारितेचा आणि सरकारमध्ये मंत्री म्हणून काम केल्याच्या तुमच्या दुहेरी अनुभवाचा लाभ आम्हाला होईल.'' या प्रतिक्रियेवर त्यांनी मात्र स्मितहास्य करीत दुसऱ्या विषयाला हात घातला...

**दिनकर रायकर**
मुंबई

# माझं विद्यापीठ

■ अतुल कुलकर्णी

*(वरिष्ठ सहाय्यक संपादक, लोकमत, मुंबई)*

सकाळी साडेसातची वेळ. माझे वडील आणि मी लातूरच्या बसस्टॅण्डवर उभे. बाबांचे मित्र आंबेकर गुरुजी नावाचे एक शिक्षक फावल्या वेळात पत्रकारिता करायचे. पेपर विकायचे. त्या वेळी दहावीची मार्गदर्शिका छापून आणणारा पेपर म्हणून 'लोकमत'ची चर्चा सुरू झाली होती. सकाळी मी बाबांच्या सोबत उभा असताना आंबेकर गुरुजींची लगबग चाललेली. तेवढ्यात एक गाडी येऊन थांबली. एक गृहस्थ खाली उतरले. हिप्पी स्टाइलची कटिंग, बेलबॉटम पॅण्ट, कमरेला मोठ्या बक्कलचा बेल्ट... आंबेकर गुरुजींनी त्यांना नमस्कार केला. जवळच गोविंद शर्मा हे पेपर एजंट उभे होते. गाडीतून उतरलेल्या त्या व्यक्तीने हात जोडून नमस्कार केला. आंबेकर गुरुजींनी जवळच उभ्या असलेल्या काहींना त्यांची ओळख करून दिली. म्हणाले, हे राजेंद्र दर्डा. जवाहरलाल दर्डा ऊर्फ बाबूजींचे चिरंजीव... नागपुरातून निघणाऱ्या 'लोकमत'चे संपादक. आता 'लोकमत' औरंगाबादेतून सुरू झालाय. त्यांनी एसएससी मार्गदर्शिका सुरू केलीय. आणखी बरेच काही ते बोलले. राजेंद्र दर्डा या नावाशी माझी ती पहिली

ओळख! पुढे याच नावाभोवती आयुष्य फिरत राहणार आहे, असे कोणी सांगितले असते तर ते खरेही वाटले नसते.

कॉलेजला जात असताना पेपरमध्ये आपलेही नाव छापून यावे म्हणून धडपड असायची. अशोक चिंचोले नावाचे एक संपादक लातूरमधून 'भूकंप' नावाचा पेपर काढायचे. त्यात मी पंढरपूर ते लातूर प्रवासात एका वारकऱ्याशी झालेल्या चर्चेची कथा लिहून काढली. वर्तमानपत्रात मी लिहिलेले ते पहिले लिखाण. कालांतराने मी सूर्यप्रकाश धूत यांच्या 'सिद्धेश्वर समाचार', चंद्रकांत झेरीगुंठे यांच्या 'लोकमन' वर्तमानपत्रात लिहू लागलो. त्याच वेळी माझी ओळख जयप्रकाश दगडे या 'लोकमत'च्या पत्रकाराशी झाली. जाणे–येणे वाढले. मी त्या वेळी बसवेश्वर महाविद्यालयात शिकत होतो. फावल्या वेळात त्यांच्या ऑफिसमध्ये जाऊन बसण्याचा नाद लागला. त्यांचे अक्षर मोत्यासारखे. ते पाहून मीही तसेच लिहिण्याचा प्रयत्न करू लागलो. दगडे मला काही बातम्यांसाठी पाठवू लागले. मी 'लोकमत'मध्ये काम करावे, असे त्यांना वाटले. म्हणून मला त्यांनी गळ घातली. घरी सांगण्याची हिंमत नव्हती. तेव्हा जनता दलात काम करणारे चंद्रकांत चौंडा नावाचे एक नगरसेवक होते. माझी त्यांची खूप गट्टी. खरेतर ते माझ्या मोठ्या मामेभावाचे मित्र. पण आमची कधी मैत्री झाली ते कळले नाही. मी दगडेंना म्हणालो, तुम्ही जर चंद्रकांत चौंडांना विचारले तर ते माझ्या घरी सांगतील आणि मला येता येईल. दगडे माझ्यासोबत त्यांच्या दुकानात आले. चर्चा झाली आणि चंदूंनी होकार दिला. नंतर मग मी अनेक दिवस टोपणनावाने 'लोकमत'च्या पुरवण्यांमधून लिहू लागलो. त्याच काळात 'लोकमत'मध्ये यमाजी मालकर 'युवा स्पंदन' नावाचे सदर चालवायचे. आमच्या कॉलेजचा मी प्रतिनिधी व्हावे म्हणून मी अर्ज केला. दगडेंनी शिफारस केली आणि मी आमच्या कॉलेजचा 'युवा स्पंदन' प्रतिनिधी झालो. (पुढे 'लोकमत'मध्ये हेच सदर मी अनेक वर्षे संयोजक या नात्याने चालवीन, ही भविष्यवाणीही कोणी केली असती तरी माझा त्यावर विश्वास बसला नसता.) पुढे संदर्भ लागावेत म्हणून हा थोडासा मीपणा...

### अर्ज लिहून घेतला आणि नोकरी दिली

रात्रीचे अकरा-साडेअकरा वाजलेले. लातूर 'लोकमत' कार्यालयातील काही पत्रकार, कर्मचारी आणि आम्ही बसस्टॅण्डजवळील सुहाना लॉजसमोर उभे. तेवढ्यात दुरून एक गाडी आली. गाडीतून राजेंद्र दर्डा उतरले. सगळ्यांना त्यांचे स्वागत करण्याची घाई झालेली. सगळे बोलत बोलत

त्यांच्यासोबत सुहाना लॉजच्या एसी रूममध्ये येतात. (१९८७ साली लातूरसारख्या शहरात एसी रूम म्हणजे कल्पनेपलीकडचे जग) लातूरचे जिल्हा प्रतिनिधी जयप्रकाश दगडे माझी ओळख करून देतात. ''साहेब, हा अतुल. आपल्याकडे त्याने अर्ज केलाय.' राजेंद्रबाबूजींनी लगेच जवळची फाईल काढली. त्यात माझा अर्ज होता. म्हणाले, ''जयप्रकाश, याला अर्जदेखील लिहिता येत नाही, हा कसला पत्रकार होणार... त्याचा अर्ज तुम्ही लिहून दिलेला दिसतोय... तुमचंच तर अक्षर आहे हे.'' मी लगेच खुलासा करण्याचा प्रयत्न केला. ''नाही साहेब, मीच लिहिलाय तो अर्ज. माझंच अक्षर आहे ते...'' त्यावर त्यांनी ''छे, शक्यच नाही,'' असे म्हणून झुरळ झटकावे तसे मला झटकून टाकले. माझा पडलेला चेहरा पाहून तेच परत म्हणाले, ''मला दाखव असाच अर्ज लिहून.'' आणि जवळचा कागद दिला. मी त्यांच्याच समोर बसून त्यांनीच दिलेल्या कागदावर अर्ज लिहिला. माझे ते अक्षर पाहून त्यांचा चेहरा खुलला. ''कमालंय...'' असे काहीसे ते पुटपुटले... ''ठीकंय, उद्या पाहू...'' असे म्हणून त्यांनी विषय बदलला. मी घरी गेलो. उशिरा आल्याबद्दल नेहमीप्रमाणे बोलणी खाऊन झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी दिवसभर राजेंद्रबाबूंनी अनेक बैठका घेतल्या. नंतर ते नेहमीप्रमाणे गावातल्या दोन-चार लोकांना भेटायला म्हणून निघून गेले. चार-पाचच्या सुमारास परत आले तेव्हा त्यांनी प्रत्येकाला व्यक्तिगत भेटीला बोलावले. माझा नंबर लागला त्या वेळी मला म्हणाले, ''तू चांगल्या बातम्या लिहितोस... औरंगाबादला येणार का, उपसंपादक म्हणून.'' मला क्षणभर कळेचना... मी म्हणून गेलो, ''थेट उपसंपादक म्हणून... संपादकानंतर थेट उपसंपादक... जमणार नाही साहेब.'' त्यावर ते छान हसले... म्हणाले, ''ये उद्या औरंगाबादला.'' मी म्हणालो, ''घरी विचारावे लागेल. परवानगी दिली तर येईन'' आणि तडक सायकल दामटत घरी गेलो. आई-बाबा नुकतेच शाळेतून आलेले. मी जाहीर करून टाकले... 'मला नोकरी लागलीय... औरंगाबादला 'लोकमत'मध्ये. उद्या बोलावलंय.' आणि कोणी काही म्हणायच्या आत पुन्हा मी त्या वेळचा बार्शीनाका आणि आताच्या शिवाजी चौकात येऊन उभा राहिलो... सायंकाळी ७ च्या सुमारास औरंगाबादला जाण्यासाठी म्हणून राजेंद्रबाबूंची गाडी तेथे आली. दगडे गाडीतून उतरले. त्यांनी निरोपाचा हात हलवला. मी जवळ जाऊन म्हणालो, ''उद्यापासून येतो चालेल का?'' राजेंद्रबाबू काही तरी पुटपुटले. गालात हसले आणि गाडी निघून गेली... बराच वेळ दगडे मला काही तरी सांगत होते, पण मी मनाने कधीच त्या गाडीच्या मागे मागे धावत सुटलो होतो.

डॉ. आर. एस. सारडा. लातूरकरांचे श्रद्धास्थान. आज ते हयात नाहीत, पण या माणसाने

लातूरकरांवर मोठी जादू केली होती. रीगल टॉकीजसमोर एका छोट्याशा दुकानवजा दवाखान्यापासून ते सात मजली बँकेसमोरील स्वतःच्या भव्य सदासुख हॉस्पिटलपर्यंतचा त्यांचा प्रवास विलक्षण होता. माझ्या वयापेक्षा जास्त त्यांची डॉक्टरकी होती. का कोणास ठाऊक पण ते खूप आपुलकीने, मित्रत्वाच्या, मुलाच्या नात्याने वागवायचे... औरंगाबादला जॉइन झाल्यानंतर बऱ्याच वर्षांनी त्यांनी मला सांगितले, म्हणाले, ''राजेंद्र दर्डा भेटायला आले होते त्यावेळी त्यांनीच मला विचारलं होतं तुझ्याबद्दल... कसा आहे हा मुलगा. औरंगाबादला घ्यायचा विचार करतोय... आणि मी म्हणालो होतो, माझ्या मुलासारखा आहे, चांगलाय... मला आज तुझं कौतुक वाटतं.'' माझ्याजवळ शब्द नव्हते, पण डॉक्टरांचे आणि माझे नाते त्या दिवशी आणखी घट्ट झाले होते. काँग्रेसचे नेते प्रदीप राठी यांनाही राजेंद्रबाबूंनी हाच सवाल केला होता. काही वर्षांनी राठींनी मला अगदी सहज बोलता बोलता हे सगळे सांगितले होते.

**औरंगाबाद 'लोकमत'मधला पहिला दिवस**

औरंगाबादला जायचे तर त्या वेळी २३ रुपये तिकीट होते. लातूर-औरंगाबाद गाडीने पहाटे औरंगाबादला पोहोचलो. माझा एक मित्र अरुण लोहकरे 'लोकमत'मध्ये होता. त्याच्याशिवाय तसे ओळखीचे कोणीही नव्हते. दुसरी ओळख म्हणजे चक्रधर दळवीची. हा लातूरचा जावई. त्याला पाहिले की आधी भीतीच वाटायची. आता हाच चक्रधर फॅमिली मेंबरच होऊन गेलाय. मी गेलो अरुण लोहकरेच्या रूमवर... तयार होऊन ऑफिसात. साधारण अकरा वाजलेले असतील. विद्याधर सदावर्ते नावाचे वृत्तसंपादक बसलेले. त्यांना भेटलो. म्हणालो, ''मी लातूरहून आलोय. मला नोकरीसाठी यायला सांगितलेय बाबूजींनी.'' विद्याभाऊंनी एकदा आपादमस्तक न्याहाळलं... म्हणाले, ''हो, तुम्ही आमचे साहेब... बिनामुलाखतीचे, बिनापरीक्षेचे आलात... या संध्याकाळी, पानं लावायच्या वेळेला.'' आणि संध्याकाळी मी हाताखालच्या पेस्टरला, ''अहो साहेब, माझे पान लावा ना,'' असे म्हणत लातूरच्या सगळ्या शिल्लक राहिलेल्या बातम्या पानावर लावून टाकल्या. नंतर विद्याभाऊंनी जी काय हजामत केली ती अशी जाहीरपणे सांगायला हवी का?

माझी पत्रकारिता सुरू झाली होती. सगळ्यांना मालक या शब्दाची मोठी भीती असायची... मला त्याच एका शब्दाचा आधार होता! पत्रकारितेमधले फार काही कळतही नसे. (आताही फार कळते असे नाही...) पण राजेंद्र दर्डा या नावात काही तरी गंमत आहे, हे हळूहळू जाणवायला लागले. ते संपादकीय विभागाची बैठक घ्यायचे. त्या वेळी त्यांच्या भल्या मोठ्या केबिनमध्ये पांढऱ्या रंगाचा,

लाकडांच्या पट्ट्यापासून बनवलेला आकाशात झेप घेणाऱ्या घोड्याच्या वेगळ्याच आकाराचा स्टॅच्यू होता. तो स्टॅच्यू नवीन चव्हाण यांनी तयार केला होता. विश्वास, जिद्द, झेपावण्याची वृत्ती असे गुण त्यातून कसे जाणवतात, याबद्दल ते भरभरून सांगायचे, येणाऱ्यांनाही आणि बैठकीत बसलेल्यांनाही... सांगताना ते इतरांपेक्षा वेगळेच काही तरी सांगतायत, हे सारखे जाणवायचे. नंतर नंतर त्यांच्यासारखे निरीक्षण करण्याची सवयच लागून गेली.

**मनमोकळे स्वातंत्र्य दिले**

गेल्या २६ वर्षांतली किती निरीक्षणे मांडायची... शब्द कमी पडतील आणि जागादेखील... पण पत्रकारितेची कोणतीही पदवी न घेतलेले किंबहुना साधी ग्रॅज्युएटची देखील डिग्री नसलेले अनेक तरुण त्यांच्या हाताखाली काम करीत होते. मी त्यातला एक टिल्लू पत्रकार... या ठिकाणी मांडल्या गेलेल्या निरीक्षणांना, अनुभवांना कसलाही घटनाक्रम नाही किंवा हे कोणाचे आत्मचरित्रही नाही. पण बदलत चाललेली पत्रकारिता पाहिली की राजेंद्र दर्डा यांचे कायम जवळ असणे अधिकच ठळकपणे जाणवायला लागते. मला जसे राजेंद्र दर्डा जाणवले, भावले तसेच ते माझ्यासोबतच्या अनेकांना भावले. आम्हा सगळ्यांसाठी राजेंद्र दर्डा हे पत्रकारितेचे विद्यापीठ होते, आहेत, राहतील.

आम्हाला ते पत्रकार, संपादक म्हणून कसे जाणवले हे प्रत्येकाने आपापल्या आठवणीतून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. यातून हे व्यक्तिमत्त्व स्फटिकासारखे स्वच्छ उभे राहावे आणि ज्यांना कोणाला पत्रकारितेत यायचे आहे त्यांना यातून काही तरी मिळावे, हा यामागचा हेतू आहे. या पुस्तकात साहित्यिक मूल्य किती आहे मला माहिती नाही; मात्र माझ्यासारख्या अनेकांना 'कमवा आणि शिका' हा मंत्र 'लोकमत'मध्ये अनुभवता आला. अनेक गोष्टी बिनधास्तपणे करता आल्या. राजेंद्रबाबूंना त्रासदायक ठरणाऱ्या असंख्य बातम्या छापून येईपर्यंत त्यांना माहिती नसायच्या. अशा त्रासदायक बातम्या छापून आल्या तरी त्यांनी कधी आम्हाला रोखले नाही. फक्त आग्रह एकच असायचा, की खुलासा छापण्याची वेळ येऊ देऊ नका. कोणता मालक हे स्वातंत्र्य आज पत्रकारांना देतो, हे टॉप टू बॉटम सर्व पत्रकारांनी स्वतःच्या मनाला विचारून पाहावे.

विशेष म्हणजे आम्ही जे करीत होतो त्याला कोणतेही पत्रकारितेचे पूर्वापार चालत आलेले मानदंड नव्हते. जे करू ते कदाचित वर्तमानपत्राच्या इतिहासात पहिल्यांदाच केलेले असायचे, पण त्यातून रोज वेगळे काही तरी करण्याची झिंग यायची. कितीही मोठ्या पदव्या घेऊन जे शिकायला मिळाले नसते, ते सगळे नोकरी करता करता शिकायला मिळाले. त्यातून जे करू ते आपणच

पहिल्यांदा केलेले असावे, हा अट्टहास कायमचा मनावर बिंबला गेला. हे असले शिक्षण कोणत्या डिग्रीतून शिकायला मिळणार?

### रेणापूर नदीचा पूर आणि पेढे

लातूरला पेपर घेऊन येणारी टॅक्सी पहाटे ५ च्या दरम्यान पोहोचायची. आम्ही पाठवलेल्या बातम्या कशा व किती छापून आल्या, हे पाहण्यासाठी आम्ही सकाळीच शर्माजीच्या स्टॉलवर जाऊन बसायचो. पावसाळ्याचे दिवस होते. लातूरला खूप पाऊस आला होता. लातूर ते अंबाजोगाई या मार्गावरील रेणापूर नदीला पूर आलेला. टॅक्सी येऊ शकत नव्हती. सकाळचे दहा वाजले. काही वेळाने पाणी कमी झाले, पण गाड्यांची गर्दी कमी होत नव्हती. मग आम्ही, दगडे आणि शर्माजींची मुले सगळ्यांनी पुलावर मधे मधे मानवी साखळी केली. पेपरचे काही गठ्ठे तिकडून उतरवून इकडे आणले. असा आणलेला पेपर उघडून पाहिला. नंतर शर्माजीसोबत सुहाना हॉटेलात इडली-डोसा खाल्ला. आज असा आनंद इंटरनेटवरची आवृत्ती पाहतानाही होत नाही. नंतर कधी तरी हा किस्सा राजेंद्रबाबूंना कळला. त्यांनी सगळ्यांना शाबासकी दिली, शिवाय दगडेंना सांगून सगळ्यांना त्या वेळी किसन हलवाईचे पेढे आणि फरसाणही मनसोक्त खाऊ घातले.

### ... अशा बातमीची हेडलाइन झाली !

लातूरला 'लोकमत'मध्ये वार्ताहर म्हणून काम करतानाचा हा किस्सा. रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम चालू होते. काम करणाऱ्या मजुरांच्या बायका, मुले बाजूलाच मोकळ्या मैदानावर बांधलेल्या तंबूवजा झोपड्यांत खेळत होती. रिकामी झालेली डांबराची पिंपे ते मजूर फोडायचे. त्याचा सरळ पत्रा बनवायचा आणि त्याच्या आधारे घर बनवून ते त्यात राहायचे. अनेकदा उन्हामुळे डांबर पिघळून त्याचे ओघळ यायचे. त्या मजुरांची मुले त्याच डांबरात माती मिसळून त्याच्या गोट्या करून खेळायची. हे चित्र राज्यात ज्या ठिकाणी रस्त्याची कामे सुरू असतील तिथे हमखास दिसायचे. तेच लातूरलाही होते. मला त्याची गंमत वाटली. मी त्या मुलांशी बोललो. त्यांचा फोटो काढून घेतला. त्याची बातमी करून औरंगाबादला पाठवली. त्या वेळी तेथे अजय अंबेकर प्रादेशिक विभागाचा प्रमुख होता. (आता अजय माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात संचालक आहे.) त्याने त्या बातमीवर थोडे संस्कार केले आणि ती बातमी फोटोसह 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' या मथळ्याखाली 'लोकमत'च्या पहिल्या पानावर मास्कहेडच्या

खाली छापून आली. दुसऱ्या दिवशी लगेच ठेकेदाराने त्या मजुरांना ताडपत्रीचे तंबू लावून दिले. मी त्याचीही बातमी पाठवली आणि 'लोकमतच्या बातमीमुळे मजुरांना मिळाले नवे तंबू' अशी बातमी दुसऱ्या दिवशी पुन्हा तशीच जोरात छापून आली. पत्रकारिता शिकायची म्हणजे यापेक्षा वेगळे काय शिकायचे असते? आणि ती बातमी छापून येण्याआधी कोणत्या दैनिकाने असा विषय त्या वेळी पहिल्या पानावर घेतला होता? आजही असे विषय किती ठिकाणी पहिल्या पानावर दिसतात...?

यामागे राजेंद्रबाबूंचा कटाक्ष असायचा. ते म्हणायचेदेखील, होनुलुलूची बातमी पहिल्या पानावर कशाला छापता. तिथे काय आपला पेपर जातोय का... आपल्या भागातल्या, आपल्या वार्ताहराने दिलेल्या बातम्या पहिल्या पानावर ठळक छापत जा. एकदा असेच औरंगाबादच्या बैठकीत काही महत्त्वाच्या बातम्या लागल्या नाहीत व ज्या लागल्या त्यादेखील आतील पानावर, अशी तक्रार काहींनी राजेंद्रबाबूंकडे केली. बाबा दळवी, विद्याधर सदावर्ते यांच्यासह अनेक जण त्या बैठकीत होते. पहिल्या पानावर कुठल्या तरी देशाची एक बातमी लागली होती. राजेंद्रबाबूंनी फोन उचलला आणि त्या वेळचे 'लोकमत'चे सरव्यवस्थापक एस. एल. देशमुख यांना लावला. आणि म्हणाले,

''एस. एल., होनुलुलूला आपल्या किती प्रती जातात हो?''

देशमुखांनाही तो सवाल कळला नाही.

ते म्हणाले, ''नाही साहेब, तिथे कुठे जातो आपला पेपर...''

''अच्छा, त्या देशात आपला पेपरच जात नाही तर...''

असे म्हणत विद्याभाऊंकडे कटाक्ष टाकत त्यांनी फोन ठेवून टाकला. पुन्हा त्या विषयावर कोणतीही चर्चा झाली नाही. पण पुन्हा अशा खप नसलेल्या बातम्या कधी पहिल्या पानावर आल्या नाहीत. (पण याच राजनबाबूंना आंतरराष्ट्रीय घटना-घडामोडींचे विलक्षण भान होते आणि आहे. म्हणूनच १७८ वर्षांचा इतिहास असलेले 'न्यूज ऑफ द वर्ल्ड' हे लंडनमधले रविवारीय दैनिक बंद पडले, तेव्हा ते अस्वस्थ झाले. त्यावर शिक्षणमंत्री असताना त्यांनीच दीर्घ लेख लिहिला केले.)

एखाद्याला झापण्याची ही त्यांची शांतपणे केलेली कृती असायची. एक ना दोन, असे असंख्य अनुभव दिवसागणिक घडायचे. ते नेहमी सांगायचे, की 'तुम्ही आज नोकरी सोडून जाल, पण इथे जे काही शिकाल ते तुमच्या डोक्यातून कोण काढून घेणारंय का?' त्यांचा हाच प्रश्न माझ्यासारख्या अनेकांना सतत पळवत राहिलाय, शिकवत राहिलाय...

## पगारासह मिळालेले शिक्षण

आज नव्याने पत्रकारितेत आलेले अनेक पत्रकार 'राजेंद्र दर्डा एक पत्रकार' या व्याख्येपासून कोसो दूर आहेत. पण पत्रकारिता म्हणजे काय, ती कशी करतात, त्यासाठी काय करावे लागते, याचे चालतेबोलते विद्यापीठ म्हणजे राजेंद्र दर्डा! कोठेही पैसे देऊन जे शिकायला मिळणार नाही ते त्यांच्यासोबत काम करताना शिकता आले... पगारासह!

नोकरीसाठी औरंगाबादला आलो आणि ऑफिसमध्ये तेच 'युवा स्पंदन' हे सदर नव्या तरुण पोरांनी चालवायला पाहिजे, असा विचार राजेंद्रबाबूजींनी मांडला. तेव्हा ''हे सदर तू लिहिलं पाहिजेस अतुल,'' असा आवाज बैठकीत आला आणि मी मलाच चिमटा घेऊन पाहिला. ज्या सदरासाठी मला माझ्या कॉलेजचा प्रतिनिधी करा म्हणून मी मागे लागलो, ते सदर मला चालवायला मिळणार! माझा विश्वासच बसत नव्हता. मी कसाबसा हो म्हणालो. ''हो सर, मी सगळ्या बातम्या निवडून देतो त्यासाठी.'' त्यावर ते म्हणाले, ''बातम्या तर पाहिजेतच, पण सुरुवातीला काही तरी चांगले, तरुणाईच्या भाषेत लिहिले पाहिजे. मला दाखव आधी लिहून झाल्यावर.'' आणि ती बैठक संपली. मी तरंगतच बाहेर आलो. एखाद्यावर विश्वास टाकायचा म्हणजे काय करायचे असते, त्याचा तो पहिला धडा होता.

## एका कॉलमचा सन्मान

मी लिहायला लागलो. 'युवा स्पंदन'साठी पत्रांचे ढीगच्या ढीग यायचे. अर्थात मी लिहिलेल्या लेखाचे कौतुक कमी आणि आमचे छापा सांगणारीच पत्रं जास्त असायची त्यात. मग हळूच कोणी तरी याची तक्रार करायचे. 'साहेब, हा फक्त स्वतःचेच लेख छापतो; बातम्या लावतच नाही.' मी देखील एवढ्याशा जागेत काय काय छापणार, असे म्हणू लागलो. यापुढे दर बुधवारी या सदरासाठी अर्धे पान द्या... साहेबांनी आदेश दिला आणि तक्रार करणाऱ्यांच्या चेहऱ्यावर मला अनेक सवाल दिसू लागले. 'युवा स्पंदन' अर्ध्या पानात छापून यायला लागलं. तसे अनेक कॉलेजांमधून येणारा पत्रांचा ओघही वाढू लागला. मी पाकिटांचा ढीग घेऊन बसलेला पाहिले की राजेंद्रबाबू जाता–येता त्यातली काही पाकिटे उघडून पाहायचे. एका मुलाने त्याच्या कॉलेजातल्या ग्रंथालयाच्या दुरावस्थेबद्दल लिहिले होते. याची चांगली बातमी कर, असे म्हणून ते निघून गेले. त्या बुधवारी मी त्याच पत्राची बातमी करून त्याला 'युवा स्पंदन'च्या पानावर सहा कॉलमी मथळा दिला. सकाळी

सकाळी बैठकीला आल्यानंतर त्या मथळ्याला लाल स्केचपेनने गोल करून 'गुड' असे लिहून त्यांनी तो अंक मला पाठवला होता! ऑफिसात घेतली गेलेली ती सगळ्यात पहिली दखल होती. एखाद्या कॉलेजातल्या लायब्ररीची दुरवस्था हा एवढ्या मोठ्या बातमीचा विषय कधी कोणत्या वर्तमानपत्रात झाल्याचा मला तरी २८ वर्षांतल्या कारकीर्दीत अनुभव आला नाही.

'युवा स्पंदन' हे सदर चालवत असताना या सदराच्या वतीने युवक महोत्सव घेतला जावा असे ठरले. डॉ. सुधीर गव्हाणे यांनी त्यासाठी पुढाकार घेतला. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात होते. मराठवाडा पातळीवरील युवा महोत्सव घेण्याचे ठरले. एखाद्या दैनिकात चालणाऱ्या कॉलमच्या वतीने असा युवक महोत्सव होणे हीच मुळात त्या वेळी आगळीवेगळी कल्पना होती. प्रचंड प्रतिसाद मिळाला. शेवटच्या दिवशी तर संत एकनाथ रंगमंदिरात दोन मुलांच्या गटांमध्ये भोसकाभोसकी झाली. वातावरणात तणाव निर्माण झाला. रात्री पुरस्कार वितरण होणार होते. सगळ्यांच्या चेहऱ्यावरचा तणाव पाहून राजेंद्रबाबूंनी चक्रधर दळवीला कामाला लावले. प्राचार्य रा. रं. बोराडे, प्राचार्य प्रताप बोराडे, प्राचार्य गंगाधर पाथ्रीकर, प्राचार्य राजाराम राठोड अशा शहरातील सगळ्या प्राचार्यांना बोलावून चक्रधरने पहिल्या रांगेत बसवले. त्या सगळ्यांची उपस्थिती मुलांना गप्प करून गेली. रात्री बक्षीस वितरण समारंभ प्रचंड उत्साहात पार पडला. टाळ्या, हुर्योऽऽऽ आणि जल्लोष... दुपारच्या घटनेचा कुठे मागमूसही नव्हता. निशिगंधा वाड आणि चेतन दळवी असे मराठी चित्रपटसृष्टीतील दोन कलाकार पुरस्कार वितरणाला आले होते. कार्यक्रम पार पडला.

मात्र त्या कार्यक्रमात जी काही गडबड झाली ती अतुलला नीट सांभाळता आली नाही, असे काहींनी 'अतिप्रेमा'ने साहेबांच्या निदर्शनास आणून दिले, आणि...

### माझ्या रिपोर्टिंगचा श्रीगणेशा...

तिसऱ्या दिवशी सकाळी ऑफिसमध्ये मला राजेंद्रबाबूंनी बोलावले. म्हणाले, की चांगला महोत्सव झाला. तू आता डेस्कवर काम न करता रिपोर्टिंग केले पाहिजेस. मी म्हणालो, की मला शहराची माहिती नाही आणि माझ्याजवळ दुचाकी नाही. त्यांनी सांगितले, की उद्या जाऊन ऑटो कार्समधून 'बजाज कब'चे कोटेशन घेऊन ये. माझा प्रश्न तयार होता, की माझ्याजवळ पैसे नाहीत. ते हसले... म्हणाले, की उद्या कोटेशन घेऊन ये... मी दुसऱ्या दिवशी सकाळी ऑटो कार्स उघडण्याच्या आत तेथे जाऊन बसलो. कोटेशन घेऊन तडक राजेंद्रबाबूंचे केबिन गाठले.

त्यावर त्यांनी मंजूर, असे लिहून सही केली. साबूजींना चेक द्यायला सांगितला. माझे प्रश्न संपलेले नव्हते. सर, साबूजींना सांगा, की माझ्या पगारातून पैसे काढून घेतील ते. त्यावर ''जा पळ, असे होणार नाही,'' असे उत्तर त्यांनी दिले. सायंकाळी सगळे सोपस्कार पार पाडून मी स्कूटर आणली.

'लोकमत'च्या गेटसमोर एक मोठे डेरेदार झाड होते. नंतर ते रस्ता रुंदीकरणात गेले. त्या झाडाजवळ स्कूटर उभी करून विद्याभाऊ, चक्रधर सगळे पाहात होते. तेवढ्यात राजेंद्रबाबूंची गाडी आली. त्यांच्या पायाला तेव्हा मार लागलेला होता. लंगडतच ते खाली उतरले. गाडीला किक मारून त्यांनी ती सुरू केली... म्हणाले, ''भगाव अब... आणि जेवढा फिरशील तेवढी शहराची माहिती होईल, हे लक्षात ठेव.''

कालांतराने 'लोकमत' मोठा होत गेला आणि त्याच्यासोबत आम्हीदेखील संपन्न होत गेलो... नंतर मी सेकंड हॅण्ड मारुती झेन स्वतःच्या पैशाने घेतली, तेव्हा तीदेखील त्यांनी चालवून पाहिली व मस्त गाडी आहे, असे कौतुक केले. त्यात कोठेही ती गाडी सेकंड हॅण्ड आहे, असा भाव त्यांच्या वागण्या-बोलण्यात नव्हता.

### दहावीच्या गुणवंतांच्या फोटोसाठीची धडपड

दहावी-बारावीचा निकाल म्हणजे राजेंद्रबाबूंसाठी आनंदाचा दिवस. त्या वेळी गुणवत्ता यादीत पहिल्या आलेल्यांना एक दिवस आधी फोन करून बोर्डात बोलावून घेतले जायचे. गुणवत्ता यादीत सगळ्यात जास्त मुले लातूरची यायची. त्यामुळे लातूरला कोणाला फोन आला का याची चौकशी निकालाच्या आधी सुरू व्हायची. मी लातूरला रिपोर्टर म्हूणन काम करीत असतानाचा हा किस्सा. लातूरचा मुलगा पहिला आला होता. त्याचा निरोप आला आणि त्याची खबर मला लागली. मी लगेच ट्रंककॉल बुक करून औरंगाबादला निरोप दिला. अमुक मुलाला उद्या निकालासाठी बोलावलंय... आणि तो संध्याकाळच्या गाडीने औरंगाबादला निघालाय... रात्री साडेअकराच्या सुमारास गाडी सिडको बसस्टॅण्डवर येईल. निरोप येताच राजेंद्र दर्डा, स. सो. खंडाळकर, बासित मोहसीन, चक्रधर दळवी, फोटोग्राफर नरेंद्र लोंढे असा सगळा फौजफाटा सिडको बसस्टॅण्डवर गेला. रात्री गाडी आली, लगेच सगळे गाडीत शिरले. त्या मुलाच्या नावाने आवाज देणे सुरू झाले. गाडीत तो मुलगा नव्हताच. नंतर कळले की तो मुलगा त्याच्या वडिलांच्या गाडीतून औरंगाबादला दुपारीच निघून गेलाय. लगेच सगळे एसएससी बोर्डाच्या गेस्टहाऊसकडे धावले. रात्री बाराच्या सुमारास त्या मुलाला गाठले. त्याचा आणि त्याच्या आईवडिलांचा ग्रुप फोटो घेतला. तो रोल

धुवायला आणि त्याचे कलर सेप्रेशन बनवायला लगेच नरेंद्र लोंढे पुण्याला रवानाही झाला. त्या वेळी औरंगाबादेत कलर फोटोचे रोलही डेव्हलप करून मिळत नसत. त्याचे सेप्रेशन तर फार दूरची गोष्ट. दुसऱ्या दिवशी नरेंद्रने सायंकाळपर्यंत एलो, मॅजेंटा, सायन, ब्लॅक अशा चार पॉझिटिव्हचे पाकीट पोटाशी धरून आणले. साहेबांनी त्या पॉझिटिव्ह ट्युबकडे धरून पाहिल्या. म्हणाले, ''गुड... लावा आता पानावर.'' आणि दुसऱ्या दिवशी फक्त 'लोकमत'मध्ये त्या मुलाचा कलर फोटो छापून आला. एका फोटोसाठीची ही मेहनत नंतर मी औरंगाबादला अनेक वेळा अनुभवली. त्या वेळी राजेंद्रबाबूजींचे मित्र कम पी. ए. नीरज तोटावार यांना ते पुण्याला सेप्रेशन आणायला पाठवायचे. नंतर 'लोकमत'मध्येच डॉ. हेल्थ कलर ड्रम स्कॅनर, सेप्रेशनचे मशीन आणले आणि मग काय विचारता, कशाचेही सेप्रेशन करून घेण्याचा धडाकाच सुरू झाला. (पुढे ते स्कॅनर 'नागपूर लोकमत'च्या म्युझियममध्ये पाठवले गेले.)

**पेपरची अशीही माहिती ठेवणारे संपादक**

एकदा बैठकीत त्यांनी रंगीत छपाईमुळे किती शाई लागते हे सांगत असताना बारा पानांच्या न छापलेल्या अंकांचे वजन किती होते आणि छापलेल्या अंकाचे वजन किती असते हेदेखील सांगितले होते ! एका रोलमधून किती अंक निघतात, त्याला शाई किती लागते याचे अचूक गणित त्यांनी त्या बैठकीत तोंडी सांगितले होते. वर्तमानपत्राच्या जगतात काम करणाऱ्या किती मालकांना आणि इंक, पेपर, रोल या दुनियेत वावरणाऱ्या किती जणांना हा हिशेब आजही करता येतो की नाही, हे माहीत नाही.

**...आणि मेमो रद्द झाला**

त्या वेळी साप्ताहिक सुट्या जमा करून एकदाच चार–पाच सुट्या घेऊन लातूरला पळायला मजा यायची. एकदा अशाच साप्ताहिक सुटीच्या दिवशी मी नगरला विठ्ठल औटी या माझ्या मित्राकडे गेलो. दिवसभर थांबून दुसऱ्या दिवशी परत आलो. ऑफिसात गेलो तर विद्याभाऊंनी एक मेमो हातात ठेवला. न सांगता गैरहजर राहिल्याबद्दलचा तो लाल कागद मला पहिल्यांदा मिळाला होता. मी काहीसा चिडलो. त्यांना काही बोललो नाही, पण तो कागद घेऊन मी थेट राजेंद्रबाबूजींचे केबिन गाठले. 'लोकमत'च्या मागेच त्यांचे घर. ते घरी निघाले होते. मी त्यांच्याशी बोलत बोलत घरापर्यंत गेलो. म्हणालो, ''माझी चूक नसताना मला मेमो दिलाय. मी काही सांगायला गेलो तर

माझे ऐकलेदेखील नाही.'' सांगताना माझे डोळे पाणावले होते. मेमो म्हणजे काही तरी भयंकर झालंय अशी ती भीती होती. ते काही बोलले नाहीत. तो कागद हातात घेतला. वाचला. म्हणाले, ''जा तू, मी बघतो...'' मी त्यांच्या घरापासून संपादकीय विभागात परत येईपर्यंत काय झाले होते माहिती नाही. विद्याभाऊंनी मला पाहिले, आवाज दिला. म्हणाले, ''या साहेब, बसा आमच्यासमोर... तुम्ही आमचे जावई... आम्ही तुम्हाला मेमो दिला... आमची चूक झाली.'' आणखी बरंच काय काय ते बोलत होते... मला रागही येत होता आणि आनंदही वाटत होता... मी काहीच बोललो नाही. दुसऱ्या दिवशी ऑफिसात साहेब एका ठिकाणी क्रॉस झाले. म्हणाले, ''अशी पत्रं कोणी दिली तर ठेवून घ्यायची... लगेच त्याचा इश्यू नाही करायचा. जा आता...'' मी विद्याभाऊंकडे गेलो. त्यांना सॉरी म्हणालो... पण नंतर मला कधीही भाऊंनी लाल कागद दिला नाही तो नाहीच... पण याच विद्याभाऊंच्या मोत्यासारख्या अक्षराचा हेवा वाटायचा. माझ्यावर ते असा राग करीत होते, पण माझ्या बातम्या चांगल्या व्हाव्यात म्हणून अनेकदा त्यांनी स्वतः त्याचे पुनर्लेखनही केले.

**शालजोडीचा अहेर !**

त्या वेळचे मराठवाडा विद्यापीठ दरवर्षी एका शहरात युवक महोत्सवाचे आयोजन करीत असे. 'युवा स्पंदन' सदर मी चालवत होतो म्हणून मला युवक महोत्सव कव्हर करायला औराद शहाजनीला पाठवले. तीन दिवस महोत्सव होता. समारोपाला ज्येष्ठ विचारवंत शिवाजीराव भोसले येणार होते. आम्ही लातूरच्या ऑफिसातून औराद शहाजनीला बसने निघालो आणि वाटेत बस फेल झाली. खूप उशीर होऊ लागला म्हणून आम्ही दुसऱ्या बसने परत लातूरला आलो. पण शिवाजीराव भोसले काय बोलले याची उत्सुकता होतीच. मग औरादला कोणाला फोन लावायचा याचा विचार करीत करीत फ. मं. शहाजिंदे यांना फोन लावला. ते म्हणाले, ''भोसले सर येऊन गेले, जोरात भाषण केले. तुम्ही ऐकायला पाहिजे होते. ''काय म्हणाले ते...'' असे मी त्यांना खोदून खोदून विचारले. त्यांनी जे काही सांगितले त्यावरून बातमी तयार करून पाठवून दिली... रात्री औरंगाबादहून फोन आला. डेस्कवरचा माणूस म्हणाला, ''अरे, भोसले सरांच्या दुसऱ्या ठिकाणी झालेल्या भाषणाची बातमी आलीय... औराद शहाजनीचे भाषण करून ते सोलापूरला पोहोचू शकत नाहीत... काय ते नीट सांग.'' मी सगळा किस्सा सांगितला. भोसले सर औरादला आलेच नव्हते. दुसऱ्या दिवशी माझी बातमी खोटी ठरण्यावाचून वाचली होती. पण हा किस्सा साहेबांना

कळला. ते लगेच काही बोलले नाहीत... पण काही महिन्यांनी संपादकीय बैठकीत ''आपले वार्ताहर स्पॉटवर न जाता बातम्या देतात, हे काही बरोबर नाही.'' असे माझ्याकडे तिरक्या नजरेने पाहात ते म्हणाले. तेव्हा मला लाल कागद न मिळताही प्रचंड वाईट वाटले होते..! पुन्हा मी कधी अशा सांगोवांगीच्या बातम्यांवर विश्वास ठेवला नाही तो नाहीच.

**'उचल्या'काराची पहिली मुलाखत 'लोकमत'मध्ये**

अगदी सुरुवातीला आम्ही लातूरहून पार्सलने बातम्या पाठवायचो. सकाळी पार्सल घेऊन येणारी टॅक्सी जाताना बातम्यांचे पार्सल घेऊन जायची. कधी कधी बातम्या अर्जंट असल्या की ट्रंककॉल बुक करायला लागायचा. ईपीबीएक्सवरून तो टेबलवर जाईपर्यंत अनेकदा कट व्हायचा. त्यावर मात करण्यासाठी म्हणून राजेंद्रबाबूंनी लातूरला टेलिप्रिंटर बसवला. लातूरला टाइप केले की तेच अक्षर औरंगाबादच्या टेलिप्रिंटरवर उमटायचे. अनेकदा तिकडे कोणी टेलिप्रिंटरची रिबीन बदलली नाही किंवा कागद बदलला नाही की इकडे टाइप केलेले वाया जायचे... त्या वेळी 'उचल्या' आत्मकथनासाठी लक्ष्मण गायकवाड यांना 'साहित्य अकादमी पुरस्कार' मिळाला होता. दगडे एका बैठकीला औरंगाबादला गेले होते. त्या वेळी रविवारची पुरवणी 'अक्षररंग' नावाने निघायची. डॉ. सुधीर गव्हाणे ती पुरवणी पाहायचे. मला काही प्रश्न दगडेंनी टेलिप्रिंटरवरून दिले. मी काही प्रश्न काढले. सगळी मुलाखत मी एकट्याने दोन वेळा टाइप करून पाठवली. रविवारच्या पुरवणीत फक्त 'लोकमत'मध्ये ती मुलाखत आली. राजेंद्रबाबूंना हा सगळा किस्सा कळला. त्यांनी फोन करून अभिनंदन केले, पण फोन ठेवताना म्हणाले, ''बघ, टायपिंग शिकल्याचा फायदा झाला की नाही.'' जाता जाता शिकवण्याची त्यांची ती पद्धत किती सहज, साधी सोपी होती...

**कौतुक झाले की समजावे बॅग भरण्याची वेळ झाली !**

लातूरला मी ट्रेनी म्हणून काम सुरू केले. मधे काही कारणास्तव दगडेंची बदली लातूरहून औरंगाबादला झाली. मला लातूरला पाठवण्यात आले. ज्या गावात मी पत्रकारितेचे अ ब क ड शिकलो, त्याच शहरात 'जिल्हा प्रतिनिधी' म्हणून काम करण्याची संधी मला दिली गेली. पाठवताना साहेब म्हणाले होते, ''मला खात्रीय, तू नक्की चांगले काम करशील...'' उड्या मारत मीही गेलो. नंतर काही महिन्यांनी त्यांनी औरंगाबादला बोलावले. म्हणाले, ''मला माहितीये, तू आणखी चांगले काम केले पाहिजेस.''

एखाद्याची बदली करायची असली किंवा त्याच्या कामात बदल करायचा असला की राजेंद्रबाबू म्हणायचे, ''तुझ्यामध्ये अधिक चांगले काम करण्याची क्षमता आहे...'' ते असे म्हणाले की समजायचे, चला, बॅग भरण्याची वेळ झालीय... तेथून त्यांनी मला सोलापूरला पाठवले. नवीन आवृत्ती सुरू होणार होती... सोलापूर... अकलूज... पंढरपूर... मी फिरत राहिलो.

**वात्सल्याचे नाते जपणारा पिता**

पंढरपुरातल्या वेश्यावस्तीत काम करणाऱ्या महिलांच्या मुलांच्या चांगल्या शिक्षणासाठी म्हणून एक डॉक्टर काम करीत होते. त्यांच्यावर मी स्टोरी केली होती, तीदेखील पंढरपुरात... दुसरी स्टोरी केली होती ती पंढरपुरातल्या मर्तिका घाटावर येणाऱ्यांची... सगळ्या शहरात 'असल्या' बातम्यांची चर्चा सुरू होती. तिथल्या एजंटनी कदाचित माझी तक्रार केली असावी. मीदेखील पंढरपूरहून फोन केला. दिवाळीच्या सुट्या असतानाही मी तेथे अशा बातम्या करीत होतो. शंकरराव मामिलवाड नावाचे पोलीस इन्स्पेक्टर होते तेथे. त्यांच्याच ठाण्यातून ट्रंककॉल लावला होता. मी आपल्या अंकाची चर्चा कशी सुरू आहे हे त्यांना सांगितले. मामिलवाडही त्यांना बोलले. म्हणाले, ''साहेब, पेपर भारीये आपला.'' त्यावर राजेंद्रबाबूं त्यांना म्हणाले, ''जरा काळजी घ्या पोराची...'' पण मला काहीच बोलले नाहीत... फक्त म्हणाले, ''आणखी चांगले काम करायला पाहिजे...'' काही दिवसांनी मी पुन्हा सोलापूरमार्गे औरंगाबादला आलो...

**मराठवाड्यातला पहिला फॅक्स**

एकदा ते परदेश दौऱ्यावर गेले होते. तेथून बातम्या पाठवताना दिल्ली, मुंबईचे काही इंग्रजी दैनिकाचे पत्रकार फॅक्सवर बातम्या पाठवायचे. ते पाहून आपल्या प्रत्येक ऑफिसला फॅक्स मशीन कशी आवश्यक आहे, हे त्यांनीच संपादकीय विभागाच्या बैठकीत सांगितले... वास्तविक अशा मागण्या पत्रकारांनी करायला हव्यात, पण इथे मालक असणारे राजेंद्रबाबू स्वतःच अशा मागण्या करीत होते... लगेच 'लोकमत'मध्ये फॅक्स मशीनही आले. मराठी दैनिकात अशा मशीन त्या वेळी घेणारा मुंबईबाहेरचा हा एकमेव पेपर होता.

**शाबासकी देण्याची अनोखी पद्धत**

पंढरपूरचाच विषय निघाला म्हणून. ते स्वतः एक किस्सा आवर्जून सांगायचे. टेलिप्रिंटर,

फॅक्स येण्याच्याही आधीचे ते दिवस होते. ट्रंककॉल लावला तरी चार–चार तास लागत नसे. त्या वेळी पंढरपूरचा एक वार्ताहर एक बातमी आणि फोटो घेऊन आला होता. बातमी भयंकर होती. एक माणूस सायकलच्या कॅरियरला पोते लावून निघाला होता आणि त्या पोत्यातून मुलाचे हात-पाय बाहेर डोकावत होते. कोणी तरी मुलांना मारण्याचे काम करीत होता...! ती माहिती आणि फोटो पाहून त्या वार्ताहरला त्यांनी बसवले, खायला प्यायला दिले आणि ती बातमी दुसऱ्या दिवशी 'लोकमत'च्या पहिल्या पानावर झळकली, त्या वार्ताहरच्या नावानिशी... जाताना त्यांनी त्या वार्ताहरला रोख बक्षीसही दिले... नंतर अनेक दिवस तो क्राइमच्या बातम्या पाठवत राहिला...

### राजीव गांधींच्या निधनाचे वृत्त आणि अंकाचे नियोजन

वर्तमानपत्राच्या जगात सतत काही तरी घडत असते. जवळपास ९० टक्के आलेल्या बातम्या या घाईगर्दीत, कमी वेळेत तयार करून द्याव्या लागतात. म्हणूनच वर्तमानपत्रातल्या साहित्याला घाईतले साहित्य म्हणतात! अनेकदा रात्री उशिरा बातम्या घडतात, अंकाची डेडलाइन जवळ आलेली असते, काही वेळा अंक छपाईसाठीदेखील गेलेले असतात. अशा वेळी बातम्या कव्हर करण्यासाठी नेमके कशा प्रकारचे नियोजन असावे लागते हे पुस्तकातून शिकता येत नाही. त्यासाठी अनुभवच कामी येतो. असे अनेक प्रसंग आम्ही 'लोकमत'मध्ये अनुभवले. त्या त्या वेळी त्यासाठीचे नियोजन म्हणजे काय हे अनुभवले. अशीच एक घटना राजीव गांधी यांच्या मृत्यूची. त्यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला ही बातमी रात्री उशिरा आली. राजेंद्रबाबू तर त्या बातमीने कोसळलेच. त्यांचे आणि गांधी घराण्याचे नाते, राजीव गांधींसोबत त्यांनी केलेला परदेशातील प्रवास या सगळ्यांचा पट त्यांच्यापुढे उभा राहिला. काही काळ त्यांना त्यांच्या अश्रूंचा बांध रोखणे अशक्य झाले. बाहेरगावच्या टॅक्सी निघून गेल्या होत्या. बातमी तर कव्हर करायची होती. सगळ्यात आधी ज्या ठिकाणच्या टॅक्सी गेल्या होत्या त्या परत बोलावण्याची जबाबदारी वितरण विभागावर देण्यात आली. अंकाचे नियोजन सुरू झाले. तेवढ्यात संपादकीय विभागातील एक सहकारी राजीव गांधींचा रंगीत फोटो घेऊन आले... म्हणाले ''साहेब, हा फोटो छापायचा का...'' काही क्षण राजेंद्रबाबूंनी त्याच्याकडे पाहिले. एक शब्दही न बोलता त्यांनी राजीव गांधींचा ब्लॅक ॲण्ड व्हाइट मोठा फोटो निवडला. हा फोटो लावा, एवढेच सांगून ते पुढच्या कामाला लागले. 'लोकमत'चा मास्कहेड लाल रंगाचा आहे, पण तो

देखील ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाइट करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. एकाला मुख्य बातमी लिहायला सांगितली, एकाला दुर्मीळ फोटोंच्या पॉझिटिव्ह शोधण्याच्या कामाला लावले. सगळे विभाग एकाच वेळी काम करीत होते. काही पाने आहे तशीच ठेवली आणि सुरुवातीची पाने बदलून अंक मशीनमध्ये पाठवला गेला. अंक छापून होईपर्यंत बाहेरगावी गेलेल्या टॅक्सी परत आल्या होत्या. येणाऱ्या टॅक्सीतले अंकांचे गठ्ठे बाजूला काढून राजीव गांधींच्या निधनाचे वृत्त असलेले अंक छापून त्या टॅक्सीत भरून त्या रवाना केल्या गेल्या. दुसऱ्या दिवशी लातूरला सकाळी ९ च्या सुमारास टॅक्सी पोहोचली. अंक हातोहात संपला... जे अंक टॅक्सीतून काढून घेतले होते ते रद्दीतही न विकता जाळून टाका, अशा सूचना देऊन राजेंद्रबाबू दुसऱ्या दिवशीच्या नियोजनाला लागले. एक घटना, पण ती किती विभागांचे ज्ञान आम्हाला देऊन गेली... प्रॅक्टिकल नॉलेज यापेक्षा वेगळे काय असते...

**... आणि हाताने लिहून बातमी लावली गेली !**

'लोकमत'च्या जवळच एक पेट्रोलपंप आहे. एके दिवशी मध्यरात्री त्या पंपावर दरोडा पडला. रात्रीचे दोन वाजून गेले असावेत. संपादकीय विभागाचा स्टाफ घरी गेलेला. एकनाथ जोशी आणि पुराणिक नावाचे दोन पेस्टर काम संपवून निघालेले. बातमी समजताच तातडीने विद्याभाऊ सदावर्तेंना बोलावून घेतले गेले. कम्पोजिंग विभागही बंद झालेला. विद्याभाऊंनी एक पॉझिटिव्ह फिल्मचा तुकडा घेतला. मार्कर पेनने अख्खी बातमी त्यावर लिहून काढली. तशा पेनने पॉझिटिव्हवर बातमी लिहिणे किती कठीण असते हे ज्यांनी ते केले आहे त्यांनाच ठाऊक. दुसरी एक बातमी कापून हाताने लिहिलेली बातमी त्या जागी लावली गेली. कम्पोजिंगच्या जगात पॉझिटिव्ह फिल्मवर लिहिली गेलेली कदाचित ती जगातील पहिली आणि एकमेव बातमी असावी. वेळ निभावून नेणे आणि स्कोअर करणे यासाठी 'लोकमत'ने जेवढे प्रयोग केले असतील तेवढे खचितच कोणत्या अन्य दैनिकांनी केले असतील... सतत वेगवेगळे प्रयोग करण्याचा त्यांचा स्वभाव त्यांच्यासोबत काम करणाऱ्यांच्या रोमारोमांत भिनलेला होता. वर्तमानपत्राच्या जगात जेवढे अनोखे प्रयोग 'लोकमत'ने केले तेवढे खचितच अन्य कोणी केले असतील...

**अशी उठवली संचारबंदी !**

बाबरी मशीद प्रकरणानंतर देशभर दंगल उसळली. औरंगाबादही त्याला अपवाद नव्हते. सगळीकडे संचारबंदी होती. काही दिवस त्यात गेले. संचारबंदी काढली तरीही लोक घराबाहेर पडत नव्हते. शहरातले वातावरण निवळले पाहिजे यासाठी काही तरी करायला हवे, अशी चर्चा सुरू झाली.

राजेंद्रबाबूंनी सिडकोतले एक सलून उघडायला लावले. एकाची दाढी करण्यास त्याला सांगितले आणि त्याच्या दुकानात दोन–तीन ग्राहक पेपर वाचत बसल्याचा फोटो काढून घेतला. तो फोटो दुसऱ्या दिवशी 'लोकमत'ने प्रकाशित केला. 'शहरातले जनजीवन हळूहळू पूर्वपदावर' या मथळ्यासह! लोकांच्या मनातली भीती त्या एका फोटोने दूर झाली. लोक घराबाहेर पडू लागले. पत्रकाराने केवळ मसालेदार बातम्या देऊ नयेत, तर समाजाशी आपले काही देणे-घेणे लागते याची शिकवणही त्या घटनेतून त्यांच्यासोबत काम करणाऱ्यांना मिळाली होती...

**आनंदऋषी महाराजांचे देहावसान आणि बातमी**

जैन धर्मीयांचे आदरस्थान असलेले गुरू आनंदऋषीजी महाराज यांचे नगरला देहावसान झाले. औरंगाबादहून अनेक लोक त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी गेले. राजेंद्रबाबूंनी जाताना रिपोर्टिंगसाठी मला नेले. नगरची टीम होतीच. तो सगळा प्रसंग अद्‌भुत होता. आम्ही सगळ्यांनी मिळून त्या प्रसंगाच्या वेगवेगळ्या अँगलने बातम्या दिल्या.

दुसऱ्या दिवशी 'लोकमत' संपादकीय विभागाची बैठक झाली. त्या बैठकीत अंकाचे कौतुक झाले. पण राजेंद्रबाबू म्हणाले, दिवसभर कडक ऊन होते, मात्र ज्या वेळी आनंदऋषीजींना भडाग्नी दिला त्या वेळी तेथे पाऊस आला होता... आपल्या बातमीत कोठेही हा उल्लेख नाही... बातमी म्हणजे केवळ माहिती देणे एवढेच नाही तर वाचणाऱ्याच्या डोळ्यांपुढे सगळा प्रसंग उभा राहिला पाहिजे. घटनेचे वर्णन तेवढे प्रभावीपणे करता यायला हवे. दुसऱ्या कोणत्या तरी पेपरने तसे काहीसे वर्णन दिले होते. ते पाहून ते म्हणाले, ''बघा, या पेपरने कसे सगळे दिले आहे... न जातादेखील आपण स्वतः तेथे गेल्याचा भास होतो वाचणाऱ्यांना...'' त्यांचे ते सांगणे नंतर प्रत्येक घटनेच्या वेळी लक्षात येत असे... कालांतराने मुंबईत आल्यानंतर २६/११ ची घटना घडली आणि त्यावर मी जे पुस्तक लिहिले त्यामागे हा सल्ला मला मोलाचा ठरला...

**पेट्रोल तुटवड्याची अशीही बातमी**

कोणतीही घटना लिहिताना वाचकांना ती घटना आपल्या डोळ्यांसमोर घडते आहे असे वाटायला हवे, याकडे त्यांचा कटाक्ष असायचा. एकदा औरंगाबादमध्ये पेट्रोलचा अभूतपूर्व दुष्काळ पडला. 'लोकमत'च्या शेजारी असणाऱ्या राज पेट्रोलपंपावर ऑटोरिक्षांची रांग लागली. ती रांग 'लोकमत'च्या समोरून कॅनॉट प्लेसमार्गे एमएजीएम रोडवरून पुन्हा पेट्रोलपंपापर्यंत आली होती. (ज्यांना औरंगाबादची भौगोलिक माहिती आहे ते हा वळसा सहज समजू शकतील.) याची बातमी काय देणार... राजेंद्रबाबूजींनी नरेंद्र लोंढेला सांगितले, ''तुकड्या तुकड्यांत सगळी रांग कव्हर होईल असे फोटो काढ आणि लगेच दाखव...'' त्या वेळी 'लोकमत'मध्येच ब्लॅक ॲण्ड व्हाइट फोटो डेव्हलप करण्याची सुविधा होती. त्यांनी सांगितल्याप्रमाणे फोटो काढून लगेच डेव्हलप करून त्यांना दाखवले. त्यांनी ते एकमेकांना जोडून प्रत्यक्षात जशी रांग आहे तशी रांग तयार केली आणि म्हणाले, असे फोटो लावा... त्या दिवशीच्या पेपरमध्ये पहिल्या पानापासून ते शेवटच्या पानापर्यंत पेट्रोलसाठीची रांग छापून आली. कितीही वर्णन केले असते तरी ते फोटोविना फोल ठरले असते. बातमीला केवळ वर्णन चालत नाही तर अनेकदा फोटोच बाजी मारून जातात, हा धडा त्या वेळी त्यांनी दिला होता. शिवाय अनेक वेळा धाडसी निर्णय कसे कामी येतात हे देखील त्यांनी दाखवून दिले होते.

'लोकमत'ने २६ जानेवारीच्या आदल्या दिवशी 'जनगणमन'चा विश्वविक्रम करण्याचे ठरवले. त्याचे फोटो कसे घ्यायचे अशी बैठक झाली. ऋषी दर्डा यांना जेव्हा मी १६ कॉलम फोटो छापू, असे सांगितले तेव्हा त्यांनी ती कल्पना क्षणात मान्य केली. मात्र त्या कल्पनेचे बीज पेट्रोलच्या रांगांचा जो फोटो छापला होता त्यात दडलेले होते..!

**तयार बातम्यांवर बंदी**

संपादकीय विभागात प्रादेशिक डेस्कवर काम करताना आम्हाला तयार बातम्यांची पाकिटे आली की खूप आवडायची. जयप्रकाश दगडे, विजयकुमार बेदमुथा, जगदीश पिंगळे, कमलाकर जोशी यांच्या बातम्या तयार असायच्या. त्यावर हेडिंगदेखील टाकलेले असायचे. दुपारची टॅक्सी यायची आम्ही सगळे वाट पाहायचो. राजेंद्रबाबूजींचा कटाक्ष असायचा. डेस्कवर काम करणाऱ्या प्रत्येकाने किमान पाच डबलर (दोन कॉलमी बातमी) आणि त्याच्या आजूबाजूला चार सिंगल (छोटी

बातमी) दिल्याच पाहिजेत. शिवाय 'थोम'च्या (थोडक्यात महत्त्वाचे) पट्ट्यासाठी प्रत्येकाने चार वेगळ्या बातम्या आणि एक चौकटीची बातमी दिलीच पाहिजे. आमच्या या गरजा अनेकदा चार जिल्ह्यांचे टपाल आले की पूर्ण व्हायच्या. काम संपवून जाताना आम्ही विद्याभाऊंना आमच्या याद्या द्यायचो, त्यात किती डबलर आणि किती सिंगल आहेत हे लिहिलेले असायचे. चांगल्या अक्षराच्या बातम्या ऑपरेटरदेखील पटापट कम्पोजला घ्यायचे. प्रूफ रीडर मंडळींनाही अशा बातम्या आवडायच्या आणि अशा तयार बातम्यांच्या आरसी लगेच पानावरही लागायच्या! पर्यायाने ग्रामीण भागातील वार्ताहरांच्या, खराब अक्षर असलेल्यांच्या बातम्या तशाच पडून राहायच्या. (हे सगळे वर्णन कॉम्प्युटर येण्याच्या आधीचे आहे!)

एकदा आमचे हे नाटक राजेंद्रबाबूजींच्या लक्षात आले. त्यांनी त्या दिवशी टॅक्सीद्वारे येणाऱ्या टपालाच्या चांगल्या अक्षरातील बातम्या स्वतःच्या केबिनमध्ये ठेवून घेतल्या आणि स्वतःच त्यावर संपादकीय संस्कार करीत बसले. आम्हाला ऑपरेटरने निरोप दिला. आज टॅक्सीवाल्याने टपाल आणलेले नाही. मग काय विचारता, आम्ही सगळे ग्रामीण वार्ताहरांच्या खराब अक्षरांतील बातम्यांचे ढिगारे उपसत बसलो. संध्याकाळी ते संपादकीय विभागात आले आणि विद्याभाऊंना म्हणाले, की जिल्हा प्रतिनिधींच्या टपालातल्या एवढ्याच बातम्या महत्त्वाच्या आहेत. त्या मी कम्पोजला दिल्या आहेत. बाकीच्या नंतर दिल्या तरी चालतील... आता इतर वार्ताहरांच्या बातम्यांना न्याय मिळेल...

पत्रकारितेच्या कोणत्या कॉलेजात हे असे प्रॅक्टिकल नॉलेज मिळते? आजच्या संगणकाच्या आणि मोबाइलच्या जमान्यात तर हे असले शिक्षण दुरापास्तच; पण माझ्यासारख्या पत्रकारितेची कोणतीही पदवी न घेतलेल्या अनेकांना हे शिक्षण मिळाले!

### विमान अपघाताचा पहिला फोटो

औरंगाबादचा विमान अपघात हा सगळ्या जगाला माहिती आहे. त्या अपघाताचे वृत्त समजले आणि घटनास्थळी पोहोचणाऱ्या पत्रकारांमध्ये सगळ्यात पहिले होते राजेंद्रबाबू. त्या वेळी त्यांच्याजवळच्या छोट्या कॅमेऱ्याने त्यांनी विमान जळतानाचा फोटो काढला. शिवाय अनेकांना वाचवण्यासाठी धावलेल्यांसोबत तेही झटत होते. रात्री दीड वाजता शेवटचा आकडा किती आहे, हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विचारून तो आकडा अपडेट करेपर्यंत ते स्वतः काम करीत होते, कॉप्या पाहात होते व अनेकांना मदत पोहोचली की नाही हेदेखील पाहात होते...

हैदराबादहून रात्री दहाच्या सुमारास ए.पी./असोसिएट प्रेसच्या एका पत्रकाराचा फोन आला, त्याला तो फोटो हवा होता. रात्री उशिरा त्याला तो फोटोही त्यांनी पाठवला. जळत्या विमानाचा फोटो छापणारे 'लोकमत' हे एकमेव दैनिक होते!

**...आणि स्वीपरला मिळाली शाबासकी !**

संपादक, पत्रकार म्हणून त्यांचे सगळ्यात मोठे यश काय असेल तर ते सगळ्यांचे म्हणणे ऐकून घेतात. तुला काय जास्त कळते असा भाव कधी त्यांच्याजवळही फिरकत नाही. जयंती, पुण्यतिथीच्या दिवशी त्या व्यक्तीचा फोटो छापून आपल्या संवेदना व्यक्त करण्याची पद्धत वर्तमानपत्रात राजेंद्रबाबूंनी सुरू केली. एकदा महावीर जयंतीच्या दिवशी भगवान बुद्धांचा फोटो छापून आला. ती चूक कोणाच्याही लक्षात आली नव्हती. सकाळी नेहमीप्रमाणे राजेंद्रबाबू ऑफिसात आले. तेव्हा रघू नावाचा स्वीपर फरशी पुसत होता. साहेबांना पाहून तो लगेच अंक घेऊन त्यांच्याकडे गेला. म्हणाला, ''साहेब, फार मोठी चूक झालीय... फोटो चुकीचा छापून आलाय...'' राजेंद्रबाबूंनी रघूला शाबासकी तर दिलीच, शिवाय दुसऱ्या दिवशी झालेल्या चुकीबद्दल ठळकपणे दिलगिरीदेखील प्रकाशित केली. हा मोकळेपणा संपादक म्हणून त्यांच्याजवळ होता आणि आहे...

वर्तमानपत्रात असणाऱ्या कथित सेवाज्येष्ठतेचे अप्रूप त्यांना कधीही नव्हते आणि त्यांनी त्याचे कधी प्रस्थही वाढू दिले नाही. त्यांना एखादी गोष्ट खटकली तर ते थेट त्या रिपोर्टरशी बोलायचे. संपादक, वृत्तसंपादक, डेस्कप्रमुख अशा शिड्या त्यांनी कधी ठेवल्या नाहीत. एखादी चांगली गोष्ट असेल तर मात्र ते सगळ्यांना बोलून दाखवायचे. अशा वेळी त्या रिपोर्टरचे कौतुक रिपोर्टरसमोर ते फार कमी करायचे. मात्र बाहेरचे लोक जेव्हा त्या रिपोर्टरला सांगत असत की, अरे साहेबांनी तुझं कौतुक केलं... तेव्हा त्यांनी थेट आपल्याला कौतुकाचे शब्द ऐकवावेत म्हणून तो आणखी दुप्पट जोमाने कामाला लागत असे. हा अत्यंत दुर्मीळ गुण त्यांनी कायम जपला आहे...

**'लोकमत'वरील हल्ला आणि दुसऱ्या दिवशीचा पेपर...**

९ जून १९९५ चा तो दिवस मला आजही जशास तसा आठवतो. दुपारची वेळ होती. जेवणाच्या सुटीची वेळ झाली हे समजण्यासाठी तेव्हा भोंगा वाजायचा. तसा भोंगा वाजला आणि काही जण

जेवणासाठी कॅन्टीनमध्ये तर काही आपापल्या घरी गेलेले. राजनबाबूंकडे सिंगापूरहून उद्योगपती दादी बलसारा आले होते. औरंगाबादेत गुंतवणूक करण्याचा त्यांचा मानस होता. राजनबाबूंच्या केबिनमध्ये त्यांच्यासोबत दर्डा परिवारातील अनेक ज्येष्ठ सदस्य होते. महावीर जोंधळे त्यांच्या केबिनमध्ये अग्रलेख लिहीत होते, तर मी रविवार पुरवणीसाठीचे काम पाहात होतो. सुधीर महाजन डेस्कवर आणि राम अग्रवाल प्रादेशिक विभागात काम करीत होते. दोन प्रूफ रीडर वगळता संपादकीय विभागात फारशी धावपळ नव्हती. तेवढ्यात काही लोक आरडाओरड करीत आत आले. त्यांच्या हातात काठ्या होत्या. त्यांनी आत येताच तोडफोडीला सुरुवात केली. काचा फोडल्या, कॉम्प्युटर उचलून आदळले. किशोर नावाचा राजनबाबूंचा शिपाई होता. त्याने प्रसंगावधान राखून राजनबाबूंच्या केबिनचे दार तत्काळ बाहेरून लॉक केले. सगळा स्टाफ जेवणासाठी बाहेर होता आणि आत तोडफोड सुरू होती. त्याचे नेतृत्व शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख माधव बडक करीत होते. ते आरडाओरड करीत महावीर जोंधळेंच्या केबिनमध्ये आले. मी आणि सुधीर आतमध्ये धावलो. माझ्याविरोधात बातम्या का देता, असे विचारत ते त्यांच्या टेबलवरील काचेवर हात आपटत होते. आम्ही तिघे त्यांना समजावत होतो. पण ते काहीही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. तेवढ्यात पोलिसांच्या गाड्यांचे सायरन वाजू लागले. ते पाहताच सारे जण पसार झाले. पळताना एकाला 'लोकमत'च्या सुरक्षारक्षकांनी आणि कर्मचाऱ्यांनी पकडले. पोलीस आले. भेटी देणाऱ्या नेत्यांची रीघ लागली. संपादकीय विभाग पूर्णतः उद्‌ध्वस्त झाला होता. फोटो कम्पोज विभागापर्यंत हे लोक जाऊ शकले नव्हते. दुपारचे तीन वाजत आले. दुसऱ्या दिवशी पेपर कसा निघेल, अशी परिस्थिती निर्माण झाली. मात्र राजनबाबूंनी तत्काळ हालचाली सुरू केल्या. एकीकडे येणाऱ्यांना भेटायचे आणि दुसरीकडे उद्याच्या पेपरची तयारी करायची, या दोन्ही आघाड्यांवर लढाई सुरू झाली. अवस्था अत्यंत भीषण होती. त्यांच्या रिसेप्शनजवळ मोकळी जागा होती. त्या जागेत काही टेबल लावून संपादकीय विभाग स्थापन केला गेला आणि सगळे कामाला लागले. आपल्यावर हल्ला झाला तरीही उद्याचा पेपर काढायचाच असा निश्चय राजनबाबूंनी बोलून दाखवला. मग काय विचारता... धडाक्याने सगळे कामाला लागले आणि दुसऱ्या दिवशीचा पेपर दिमाखात निघाला..! वर्तमानपत्रांवर हल्ले होतील, पण असल्या भ्याड हल्ल्याला घाबरून जायचे नाही, हा कृतीतून शिकवलेला प्रॅक्टिकल धडाही 'लोकमत'मध्येच गिरवायला मिळाला होता.

**त्यांना आवडणार नाही, तरीही...**

काहीही माहिती नसणाऱ्या औरंगाबाद शहरात मी आलो, स्थिरावलो. 'लोकमत'पासून जवळच एका अपार्टमेंटमध्ये मी फ्लॅट पाहिला. त्या वेळी त्याची किंमत रजिस्ट्रीसह ५ लाख रुपये होती. रजिस्ट्रीसाठीचे पाच हजार रुपयेदेखील हातात नव्हते. चक्रधरने राजेंद्रबाबूंना ही गोष्ट सांगितली. त्यांनी मला बोलावून घेतले. फ्लॅट कोठे आहे, कसा आहे, किती पैसे लागणार, अशी सगळी चौकशी केली आणि जा म्हणून सांगितले. मी बाहेर आलो. चक्रधरला सगळं सांगितलं. त्या वेळी मला काही पैसे कमी पडत होते. काय करायचे सुचत नव्हते. पंधरा मिनिटांनी राजेंद्रबाबूंचा शिपाई किशोर आला. मला बोलावले आहे, असे सांगत. मी त्यांच्या केबिनमध्ये गेलो. त्यांनी पाकिटात घालून मला ५० हजार रुपये दिले. म्हणाले, ''घरी जा. बिल्डरला देऊन मग ऑफिसात ये.'' त्या वेळी त्या पैशांची किंमत किती तरी अधिक होती. माझे घर झाले. वास्तुशांतीच्या दिवशी ते स्वतः आले. घरी थांबले. या गोष्टीला आता किमान २० वर्षे झाली असतील. आजपर्यंत त्यांनी मला या गोष्टीची पुसटशीही आठवण दिलेली नाही... हे असे पुस्तकात लिहिलेले त्यांना आवडणार नाही, पण हे सांगणे मला फार महत्त्वाचे वाटते; कारण त्या घराने मला स्थैर्य दिलेय...

**अतुल कुलकर्णी**
मुंबई

■●

# पीआयएल आणि लोकमत

■ अतुल कुलकर्णी

*(वरिष्ठ सहाय्यक संपादक, लोकमत, मुंबई)*

मी 'लोकमत'मधून अनेक वृत्तमालिका लिहिल्या. त्यातल्या वेगवेगळ्या नऊ मालिकांनाच उच्च न्यायालयाने पीआयएल (पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन / जनहित याचिका) म्हणून दाखल करून घेतले. त्यातल्या जवळपास सगळ्या बातम्या राजेंद्रबाबूंनी निवडलेल्या होत्या. (एखाद्या पत्रकाराच्या आयुष्यात अशी जमेची बाजू फार दुर्मीळ गोष्ट असते, जी मला 'लोकमत'ने मिळवून दिली आहे.)

१) पहिली बातमी होती पाठ्यपुस्तकांच्या किमती वाढल्याबद्दलची. औरंगाबादला 'बालभारती'चे भांडारगृह होते. पुस्तकांच्या किमती किती वाढल्या आहेत, याची बातमी आपण केली पाहिजे असे त्यांनी मला सांगितले. गेल्या वर्षी किमती किती होत्या व या वर्षी किती आहेत याची तुलना करा, असेही त्यांनी सांगितले होते. मी त्याचा तक्ता करून छापला. १३ मे १९९२ रोजी बातमी छापून आली. त्याचा आधार घेत ॲड. जी. एम. जाधव यांनी ३० मे १९९२ रोजी याचिका दाखल केली आणि

न्या. बी. एन. देशमुख व न्या. नरेंद्र चपळगावकर यांच्या खंडपीठाने १४ ऑगस्ट १९९२ रोजी पहिली ते चौथीच्या मुलांना सर्व क्रमिक पुस्तके मोफत देण्याचा निवाडा दिला. १९८८-८९ मध्ये पहिलीच्या वर्गात २५.४ लाख विद्यार्थी होते. मात्र १९९१-९२ ला चौथीत त्यांची संख्या १८.६ झाली. या गळतीमागे पुस्तके विकत घेणे पालकांना परवडत नाही, असाही निष्कर्ष मांडला गेला. एक तक्ता छापण्याचा निर्णय किती दूरगामी परिणाम करून गेला होता. (नंतर काही वर्षांनी राजेंद्रबाबू शिक्षणमंत्री झाले आणि राज्यात पुस्तकं प्रकाशित करणाऱ्या पाठ्यपुस्तक मंडळाचे अध्यक्षही, आणि 'बालभारती'च्या मराठी पुस्तकाच्या कमिटीवरही त्यांनीच मला नेमले.)

२) औरंगाबादेत कामगारवर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांच्या बातम्या सतत दिल्या पाहिजेत याकडे राजेंद्रबाबूंचा कटाक्ष असायचा. कामगारांसाठीचे ईएसआयसी रुग्णालय (राज्य कामगार विमा रुग्णालय) आहे. मात्र त्याच्या सोयीसुविधांकडे कोणाचेही लक्ष नव्हते. तेथे पुरेसे डॉक्टर नव्हते. त्याची बातमी लिहिल्यानंतर त्यांनी ती पान एकवर अँकर करून लावली. दुसऱ्या दिवशी त्याचा फॉलोअप द्यायला लावला. त्या वेळी औरंगाबाद खंडपीठात डॅशिंग न्यायमूर्ती बी. एच. मर्लापल्ले होते. त्यांनी त्या बातम्यांनाच पीआयएल म्हणून दाखल करून घेतले. लोकमत विरुद्ध राज्य सरकार अशी ती याचिका अनेक वर्षे चालली. आज औरंगाबादेत सुसज्ज राज्य कामगार विमा रुग्णालय आहे. तेथे अद्ययावत यंत्रसामुग्री आहे, डॉक्टर्स आहेत.

३) औरंगाबादच्या घाटी हॉस्पिटलविषयी त्यांना खूप आस्था. घाटीतल्या गैरसोयींविषयी ते सातत्याने बातम्या छापायला लावायचे. त्यातूनच आरोग्याची काळजी वाहणाऱ्या घाटीचेच आरोग्य कसे धोक्यात आले आहे याची चार दिवस मालिका 'लोकमत'मधून लिहिली. त्याच वेळी औरंगाबाद खंडपीठात घाटीसंबंधी एक याचिका चालू होती. न्यायालयाने सगळ्या बातम्या एकत्र करून त्यांना दिवाणी अर्ज म्हणून मूळ याचिकेत दाखल करून घेतले. नंतर न्यायालयाच्या आदेशाने अनेक कामे मार्गी लागली.

घाटीचे खरे स्वरूप बदलले ते राजेंद्र दर्डा सक्रिय राजकारणात गेल्यानंतर, मंत्री झाल्यानंतर. याच घाटीचे ते ५ वर्षे अभ्यागत समितीचे अध्यक्ष राहिले. त्यांनी अनेक सोयी-सुविधा तेथे निर्माण केल्या. आज औरंगाबादच नाही तर मराठवाड्यातील रुग्णांना मुंबई-पुण्याकडे धाव घेण्याची गरज उरलेली नाही.

४) सिडकोत ग्रीन बेल्ट मोठ्या प्रमाणावर सोडण्यात आले होते. मात्र त्यावर ठिकठिकाणी एवढी अतिक्रमणे झाली होती की लोकांना पायी चालणे अवघड बनले होते. त्याचे वृत्त छापल्यानंतर त्या बातमीला न्या. बी. एच. मर्लापल्ले आणि न्या. एन. व्ही. दाभोळकर यांनी दिवाणी अर्ज म्हणून दाखल करून घेतले व सिडकोला 'कारणे दाखवा' नोटीस बजावली.

५) औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ऑडिट झाले आणि त्यात सात कोटींचा हिशेब लागत नव्हता. तो धागा पकडून जिल्हा बँकेचा ऑडिट रिपोर्ट आम्ही मिळवला आणि त्याची तीन दिवस मालिका छापली.  या वृत्तालाच न्या. ए. बी. नाईक आणि न्या. एन. एच. पाटील यांनी याचिका म्हणून दाखल करून घेतले. ॲड. चिंचोलकर यांची न्यायालयाचे मित्र म्हणून नेमणूक केली. पुढे बरीच वर्षे ही याचिकादेखील चालूच राहिली. त्याही वेळी राजेंद्र दर्डा मंत्री होते. बातम्या छापून आल्यानंतरच त्यांनाही त्या कळत होत्या. पण कधीही त्यांनी त्यात हस्तक्षेप करीत अडवणूक केली नाही.

६) गतिमंद मुलांना प्रमाणपत्र घेण्यासाठी घाटी इस्पितळात जावे लागत होते. काहीही न कळणारी ती मुले सांभाळत त्यांचे आई–वडील तारेवरची कसरत करीत मुलांना तेथे घेऊन जात असत. त्यांचे होणारे हाल पाहावत नसायचे. याची बातमी प्रकाशित केली तेव्हा औरंगाबाद खंडपीठाने त्याची याचिका दाखल करून घेतली आणि सरकारला त्यावर ठोस यंत्रणा उभी करावी लागली. यात पुढे तेव्हाचे डीसीपी हरीश बैजल यांनीदेखील पुढाकार घेत काही गोष्टी त्यांच्या पद्धतीने सरळ केल्या.

७) सिडकोत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले होते. त्यावर लिहिलेल्या बातम्यांना औरंगाबाद खंडपीठाने याचिका म्हणून दाखल करून घेतले व सिडकोला नोटिसा बजावल्या. पुढे त्या नोटिसीचे उत्तर आले आणि 'न भूतो न भविष्यती' अशी जवळपास २५ हजार अतिक्रमणे हटवली गेली. त्या वेळी राजेंद्र दर्डा राज्याचे गृहराज्यमंत्री झाले होते. त्यांच्यावर मोठा दबाव येत होता. दुसरा कोणी असता तर तातडीने त्या बातम्या बंद करायला लावल्या असत्या. मात्र मी आता मंत्री आहे, 'लोकमत'च्या कामात मी हस्तक्षेप करणार नाही, अशी भूमिका घेत त्यांनी मला

पाठिंबा दिला. मात्र सिडकोतील नागरिकांच्या हितासाठी त्यांनी मंत्री असताना काही बदल करून घेतले. ज्याचा नागरिकांना खूप मोठा फायदा झाला.

८) 'सलीम अली सरोवर' हे औरंगाबादेत परदेशी पक्ष्यांचे आवडीचे ठिकाण. अनेक स्थलांतरित पक्षी तेथे येत. त्याची अवस्थादेखील अत्यंत बिकट बनली होती. त्याचे वृत्त तीन दिवस प्रकाशित केले तेव्हा त्यावरदेखील न्यायालयाने विभागीय आयुक्तांना नोटीस काढून कमिटी करायला भाग पाडले. आज जे थोडेफार चांगले सलीम अली सरोवर दिसते आहे त्याचे श्रेय 'लोकमत'ला आणि न्यायालयाच्या आदेशाला आहे.

९) आरटीओमधील गैरकारभाराची देखील मालिका 'लोकमत'मध्ये सतत आठ दिवस प्रकाशित केली गेली. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती स्वतंत्रकुमार यांनी याचिका म्हणून दाखल करून घेतले. ॲड. अस्पी चिनॉय यांना त्यात न्यायालयाचे मित्र म्हणून नेमले गेले. पुढे त्यात सहा आरटीओ निलंबित झाले, आठ जणांची विभागीय चौकशी सुरू झाली. राजेंद्र दर्डा त्या वेळी मंत्रिमंडळात होते. हे खाते मुख्यमंत्री असणाऱ्या विलासराव देशमुख यांच्याकडे होते. तरीही ही मालिका लिहिताना त्यांनी कधीही अडवले नाही. नंतर 'लोकमत'चे संपादकीय संचालक ऋषी दर्डा यांनी मला त्या मालिकेबद्दल ११ हजाराचे रोख पारितोषिक दिले. ती माहिती तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना त्यांचे मित्र अभिनंदन थोरात यांनी सांगितली. तेव्हा विलासरावांनी फोन केला आणि म्हणाले, की यापेक्षा जास्त पैसे तर त्या आरटीओंनी दिले असते! स्वतःच्याच कॉमेंटवर ते दिलखुलास हसले पण म्हणाले, की अकरा हजारांचे मोल त्याला आले नसते... अभिनंदन..!

राज्य सहकारी बँकेचे 'नाबार्ड'ने ऑडिट केले होते. त्यात अनेक ताशेरे ओढण्यात आले होते. तो रिपोर्ट मला मिळाला आणि त्यावर मी बराच खल केला. ॲड. उदय बोपशेट्टी आणि देविदास तुळजापूरकर या दोघांनी त्यात खूप मदत केली होती. या मालिकेतला शब्दन्‌शब्द वाचून, त्यातले बारकावे तपासून समूह संपादक दिनकर रायकर यांनी त्या बातम्या ओके केल्या होत्या. त्यावरून बराच वादंग होणे अपेक्षित होते. या मालिकेतले सगळे भाग छापून आल्यानंतरच राजेंद्रबाबूंनी वाचले. त्या वेळी ते मंत्री होते. त्यांच्यावर बराच दबाव आला. मात्र त्यांनी कधीही हस्तक्षेप केला

नाही. ऋषी दर्डा यांनीदेखील या बातम्या पहिल्या पानावर लावण्याच्या सूचना केल्या. पुढे राज्य सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त झाल्याची बातमी आली, त्या दिवशी आम्ही सगळे औरंगाबादेत होतो. माझा जिवलग सहकारी चक्रधर दळवीच्या लग्नाला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याची पार्टी होती. तेथे ही बातमी कळली तेव्हा राजेंद्रबाबूंनी तेथेच फुलांचा गुच्छ देऊन माझ्या पाठीवर थाप दिली. त्या वेळी ती थाप त्यांच्यातल्या संपादकाची होती.

'लोकमत'मध्ये काम करण्यासाठी तुम्हाला किती स्वातंत्र्य आहे हे लक्षात यावे म्हणून हा सगळा तपशील दिला. मोकळेपणा, बातम्या लिहिण्याचे स्वातंत्र्य आणि आपल्या प्रतिनिधींवर टाकला जाणारा विश्वास या गोष्टी फार महत्त्वाच्या असतात आणि 'लोकमत'मध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाच्या मनात राजेंद्र दर्डा यांनी या गोष्टी ठासून भरल्या आहेत.

**अतुल कुलकर्णी**
मुंबई

# ‘व्यक्तिमत्त्व’ असणारा पत्रकार

■ **व्यंकटेश केसरी**

*(सहाय्यक संपादक, दी एशियन एज, नवी दिल्ली)*

राजेंद्रबाबू पत्रकार किती, व्यवस्थापक किती, आणि ‘टीम लीडर’ किती, हे सांगणे खरोखरच कठीण आहे. पण याच्या जोरावर त्यांनी ‘लोकमत’चा प्रचंड डोलारा कसा उभा केला याचे साक्षीदार अनेक आहेत.

पत्रकार म्हणजे कोण? संपादकीय लिहिणारा, अंक काढणारा की वृत्तांत संकलन करणारा, याच्या व्याख्या पूर्वी झाल्या आहेत व पुढेही होतील. पण ज्या पत्रकाराला व्यक्तिमत्त्व नसेल त्याचा ‘कारकून’ होतो. याची जाण या व्यवसायात असणाऱ्याला असते. भले तो जाहीरपणे मानो वा न मानो. राजेंद्र दर्डा यांची गणना ‘व्यक्तिमत्त्व’ असणाऱ्या पत्रकारांत होते. दिसण्यापासून ते कृतीपर्यंत त्यांचे तुमच्यात असणे साधेपणाचे असते, दिलासा देणारे असते, आणि समजून घेणारेदेखील...

उत्तम पत्रकार हा उत्तम व्यवस्थापक असतोच असे नाही आणि नेतृत्वगुण असावे म्हणजे भलतेच काही तरी, असे वाटण्याचा हा काळ आहे. याचे कारण पत्रकारिता ही ‘अहं’ (इगो) व ‘मत्सर’ (जेलसी) याच्यावर उभी आहे.

**राजेंद्रबाबूंमुळे मी इंग्रजी पत्रकारितेत आलो...**

राजेंद्र बाबू यांच्याबरोबर मी तब्बल दहा वर्षे काम केले. त्यांची निर्णय घेण्याची क्षमता, बातमीची पारख व नेतृत्वगुण या काळात जवळून पाहायला मिळाले. त्यांच्यामुळे मी इंग्रजी पत्रकारितेत आलो. औरंगाबादसारख्या प्रादेशिक ठिकाणी इंग्रजी वर्तमानपत्र काढणे, ते चालविणे व व्यावसायिकदृष्ट्या ते सफल करणे याची कल्पना पंचवीस वर्षांपूर्वी हास्यास्पद होती. पण त्यांनी १९८७ साली 'लोकमत टाइम्स' सुरू केला आणि आज त्याची यशस्वी वाटचाल सुरू आहे. 'लोकमत टाइम्स' सुरू झाल्यानंतर काही दिवसांनी मी तेथे रुजू झालो आणि त्यांनी सांगितले, टायपिंग शिका. मला तुम्हाला टाइपरायटरवर बसून स्वतःची बातमी करताना पाहायचे आहे. सुरुवातीला मी थोडी टंगळमंगळ केली. पण जेव्हा कळून चुकले, जात्यावर बसल्याशिवाय ओवी सुचणार नाही. तेव्हा टायपिंग अल्पावधीत शिकलो. तो काळ मराठवाडा व महाराष्ट्राच्या दृष्टीने राजकीय बदलाचा होता. मुंबईच्या बाहेर शिवसेनेचा विस्तार होत होता. मराठी माणसाचा मुद्दा बाजूला सारून शिवसेनेने आक्रमक हिंदुत्व स्वीकारले आणि ते मराठवाड्यात फोफावले.

**नवख्या पत्रकारासारखा कायम उत्साह...**

औरंगाबाद महानगरपालिकेची पहिली निवडणूक झाली आणि तीत भल्याभल्यांचे अंदाज चुकले. मी तरुण होतो, उत्साही होतो. राजेंद्रबाबू अनौपचारिकपणे अनेकांकडून निवडणुकीच्या निकालाचे अंदाज घ्यायचे. एकदा त्यांनी मला सहजपणे याविषयी विचारले, मी उत्साहाच्या भरात काही आकडे सांगितले. योगायोगाने ते काहीसे बरोबर ठरले. याचा आनंद माझ्यापेक्षा जास्त राजेंद्रबाबूंना झालेला दिसला. या निवडणुकीची मतमोजणी रात्रभर सुरू होती. त्या वेळी आम्हासोबत तेही होते.

त्यानंतर हिंदू-मुस्लीम जातीय दंगल उसळली. हा बहुधा १९८८चा काळ असावा. औरंगाबादेत अनेक दिवस कर्फ्यू, पैठणमध्ये जिवंत जाळण्याचे प्रकार. या काळात ते अनेक ठिकाणांहून माहिती घेत, संपादकीय विभागात बसत आणि मग एकूण वातावरणच बदलत असे. मथळ्यांबाबत (हेडलाइन्स) ते चर्चा करायचे.

महापौरपदाची निवडणूक, मतपेटी पळविण्याची घटना, १९८९ची लोकसभेची निवडणूक, १९९० ची विधानसभा निवडणूक, राजीव गांधींची हत्या, असा हा काळ होता. राजकीय

समीकरणे बदलत होती. १९८७ ते १९९१ या काळात राजेंद्रबाबू उत्साही पत्रकारांसारखे काम करायचे.

एकदा आमच्याकडे नवे संपादक आले. वर्तमानपत्रावर आपला ठसा उमटावा म्हणून त्यांनी मराठवाड्यातील काही प्रतिष्ठितांच्या मुलाखती घ्यायला सांगितल्या. त्या मुलाखती त्यांनी पहिल्या पानावर प्रसिद्ध करण्याचे ठरविले. रात्री बारा-साडेबाराच्या सुमारास राजेंद्रबाबू पेस्टिंग रूममध्ये आले. 'लोकमत टाइम्स'चे पहिले पान पाहताना त्यांना बातम्या कमी व मुलाखती जास्त दिसल्या. ते एवढेच म्हणाले, 'बातम्या कुठेत?' पण त्यांनी पानात बदल केले नाहीत.

राजेंद्रबाबू बातमी दडपण्याच्या विरुद्ध असत. एकदा त्यांच्या परिचितांच्या विरुद्ध बातमी देण्याचा प्रसंग आला. राजेंद्रबाबू औरंगाबादच्या बाहेर होते आणि परिचितांच्या विरोधात पोलिसांत तक्रार नोंदविण्यात आली होती. हे परिचित गृहस्थ साधीसुधी असामी नव्हती. ते 'लोकमत'च्या उपक्रमात सक्रिय असायचे. 'लोकमत'च्या संपादकीय विभागात ही बातमी तूर्तास बाजूला ठेवावी, असा निर्णय झाला. आमच्याकडे निर्णय घेणारे कोणी नव्हते, संपादक नागपूरला होते. तिथे फॅक्स केला व निर्णय कोणता घ्यावा असे विचारले. हा फॅक्स करण्यामागे कारण असे होते, की औरंगाबादेतील दुसऱ्या वर्तमानपत्रात ही बातमी ठळकपणे प्रसिद्ध होणार होती आणि काही मिनिटांतच राजेंद्रबाबूंचा फोन आला. बातमीची माहिती घेतली. पोलिसांत तक्रार असेल, गुन्हा दाखल असेल तर बातमी द्यावी, असे त्यांनी सुचविले. तिसरा प्रसंग औरंगाबादेत ब्रॉडगेज रेल्वे लाइन्सच्या शुभारंभाचा. प्रमुख पाहुणे म्हणून त्या वेळचे केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण व तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक. फार वर्षांचे स्वप्न पूर्ण होत होते. औरंगाबादकर हरखून गेले होते. मराठवाडा मुख्य प्रवाहात येत होता. उद्‌घाटन झाले, भाषणे झाली. आम्ही वर्तमानपत्राच्या कार्यालयात परतलो. बातमी लिहिण्याचे दडपण होते. बातमी ऐतिहासिक होती. राजेंद्रबाबू संपादकीय विभागात आले. त्यांच्या हाती मुख्यमंत्र्यांच्या भाषणाची प्रत होती. सुधाकररावांनी त्यांचे अख्खे भाषणच राजेंद्रबाबूंच्या हाती चिकलठाणा विमानतळावर दिले.

राजेंद्रबाबूंच्या कामाची एक पद्धत आहे. टापटीप, नीटनेटकेपणा, शब्दाला चोख, व्यवसायात जागरूक, या गुणांमुळे त्यांनी 'लोकमत'चा विस्तार केला. 'लोकमत'च्या कॅण्टीनमध्ये त्यांना जेवताना मी पाहिलेय आणि जेवण कशासाठी तर तेथील खाद्यपदार्थांचा दर्जा पाहण्यासाठी. 'लोकमत टाइम्स'मध्ये चांगली माणसे यावीत, आलेली टिकावीत, त्यांच्यात स्पर्धेमध्ये चढाओढी करण्याचे, आक्रमकतेचे 'स्पिरिट' असावे, याबद्दल त्यांच्या विशेष अपेक्षा असत.

**अग्रलेखाला दाद शरद पवारांनी दिली तेव्हा !**

शरद पवारांच्या काँग्रेस (समाजवादी)चे काँग्रेसमध्ये औरंगाबादेतील 'आम खास' मैदानावर विलीनीकरण झाले आणि 'अपोजिशन'ची पोकळी भरून काढण्यासाठी शिवसेनेला वाव मिळाला. मुंबईत मराठी माणूस व मुंबईच्या बाहेर 'हिंदुत्व' असे धोरण बाळासाहेब ठाकरे यांनी स्वीकारले. अशा वेळी वर्तमानपत्राचे धोरण काय असावे, शिवसेनेचे 'कव्हरेज' कसे असावे, असा काहीसा संभ्रम होताच. राजेंद्रबाबू हे सूक्ष्म बदल टिपत होते. शिवसेनेकडे तरुण खेचला जातोय, सरकारी प्रशासनात शिवसेनेचे सहानुभूतीदार वाढत आहेत. मध्यमवर्ग, कनिष्ठ मध्यम वर्ग शिवसेनेकडे जातोय, हे लक्षात ठेवून 'लोकमत' लोकांबरोबर राहिला. शिवसेनेच्या धोरणावर अग्रलेखातून कडाडून टीका केली. मात्र शिवसेनेच्या बातम्या कधीच दडपल्या नाहीत. 'लोकमत'च्या अशाच एका जहाल अग्रलेखाची (तुका म्हणे ऐशा नरा...) दाद स्वतः शरद पवारांनी दिली होती. आणि अशा बदलत्या काळाबरोबर बदलण्याची दृष्टी राजेंद्रबाबू यांच्याजवळ होती. हे बदल तंत्रज्ञानाविषयी नव्हते, नफा-तोट्याचे संतुलन साधण्यापुरते सीमित नव्हते हे महत्त्वाचे होय.

**व्यंकटेश केसरी**
नवी दिल्ली

# लव्हेबल पार्लमेंटवाला संपादक

■ प्रशांत दळवी

*(लेखक, नाटककार, मुंबई)*

राजेंद्र दर्डा म्हणजेच राजेंद्रबाबू हे आज महाराष्ट्रातले खूप मोठे नाव आहे. गेल्या १५-२० वर्षांतली त्यांची राजकीय कारकीर्दही खूप मोठी आहे. मंत्री म्हणूनही त्यांनी काम केले आहे आणि ते सगळ्या महाराष्ट्राला परिचित आहेत. पत्रकार म्हणून, संपादक म्हणून त्यांचे काम मराठवाड्याच्या सामाजिक, आर्थिक बदलात मोठे योगदान देणारे आहे, असा माझा विश्वास आहे. माझी आणि त्यांची ओळख जवळजवळ २८ ते ३० वर्षांची आहे. पहिल्यापासूनच राजेंद्र दर्डा हे माझ्यासाठी भारदस्त नाव राहिले आहे. पण या आदराच्या पलीकडे आमचे प्रेमाचे असे नाते आहे. याचे कारण असे की ऐन उमेदीच्या काळातले राजेंद्रबाबू बघण्याचे भाग्य मला लाभलेले आहे. ही गोष्ट १९८४-८५ या वर्षातली असेल. औरंगाबादच्या शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालयातून मी पदवी घेतली आणि त्यानंतर नाट्यशास्त्र विभागात मी प्रवेश घेतला. त्याचवेळी मी औरंगाबादच्या दैनिक 'लोकमत'मध्ये उपसंपादक म्हणून रुजू झालो. २ ते ३ वर्षे 'लोकमत'मध्ये मी होतो आणि तो काळ माझ्यासाठी महत्त्वाचा ठरला.

## मराठवाड्यात नव्या पत्रकारितेची रुजुवात

या काळात राजेंद्रबाबू यांच्याशी दुहेरी-तिहेरी असे माझे नाते होते आणि या नात्याला अनेक पदर होते. माझे वडील म. य. दळवी ऊर्फ बाबा दळवी हे 'लोकमत'चे कार्यकारी संपादक होते. पण 'लोकमत' परिवारात आल्यावर केवळ एक कार्यकारी संपादक असे ते नाते नसते, तिथे माणूस या परिवाराचा एक भाग कसा बनत जातो हे मी अनुभवले. एकीकडे बाबा कार्यकारी संपादक आणि दुसरीकडे राजेंद्रबाबू हे तरुण, तडफदार असे संपादक, असा तो काळ मी पाहिला आहे. तो काळ वेगळ्या अर्थाने मंतरलेला होता, कारण कोणताही काळ एखाद्याचा घडणीचा असेल, तर तो महत्त्वाचा ठरतो. मी एकीकडे 'लोकमत'मध्ये घडत होतोच आणि दुसरीकडे 'लोकमत' मराठवाड्यात रुजत होते, बहरत होते. सगळ्यांच्या अपेक्षांचे आलेख मोडून वेगाने 'लोकमत' उभे राहत होते. कुणाला कल्पनाच नव्हती की मराठवाड्यात अशा प्रकारची पत्रकारिता होऊ शकते. माझे वडील नागपूरहून मराठवाड्यात आले होते; कारण इथे 'लोकमत' लॉन्च करायचे होते. हळूहळू या दैनिकाचा औरंगाबादमध्ये दबदबा निर्माण व्हायला सुरुवात झाली. त्या काळात इतरही काही वर्तमानपत्रे तिथे काम करीत होती, पण 'लोकमत' आल्यानंतर मराठवाडा किती मोठा आहे, किती विस्तारलेला आहे, इथे किती गावे आहेत, इथे किती वाचकवर्ग असू शकतो, अशा प्रकारच्या नव्या शक्यता हाताळल्या गेल्या.

राजेंद्रबाबू लंडनहून प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेऊन आले होते आणि दर्डा परिवारातला एक उमदा तरुण मराठवाड्यात आला होता. असा तरुण औरंगाबादसारख्या शहरात येतो आणि संपादकपद स्वीकारतो, हे मोठ्या जबाबदारीचे लक्षण होते. जी काही प्रस्थापित कुटुंबे किंवा लोक असतात, त्यांच्या पुढील पिढीचे कधी कधी कर्तृत्व असते किंवा नसते. पण राजेंद्रबाबू यांच्या निमित्ताने मी असे एक तरुण नेतृत्व बघितले की ज्यांनी प्रस्थापिततेला कुठेही अंगी लावून घेतले नाही. तर चांगल्या अर्थाने अस्वस्थ असा हा तरुण होता. आपल्याकडे सगळे आहेच आणि ते फक्त पुढे न्यायचे आहे, अशी त्यांची भावना नव्हती. तर एक ठसा उमटवायचा आहे, अशी त्यांच्या मनात ठोस भावना होती. संपादक म्हणून काम करताना अतिशय चार्मिंग असे ते व्यक्तिमत्त्व होते. एखादा हीरो वाटावा असे ते देखणे, स्मार्ट होते. त्यांच्यात एक लव्हेबल असा एलिमेंट होता. त्यांच्याबरोबर आपल्याला काम करायचे आहे आणि हा तरुण काही तरी करून दाखवणार आहे, असा विश्वास त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दडलेला होता.

## स्तिमित करणारी परिपक्वता

माझे वडील हे चळवळीतून आलेले होते आणि ते केबिनमध्ये बसून पत्रकारिता करणाऱ्यांतले नव्हते. मराठवाड्यातल्याच नव्हे, तर विदर्भातील अनेक चळवळींशी त्यांचा संबंध होता. ते केवळ बघे नव्हते, तर चळवळीचा भाग होते. मराठवाड्यातली दलित चळवळ किंवा तिथला नामांतराचा प्रश्न या सगळ्यांबद्दल त्यांना प्रचंड आस्था होती. अशा वेळी अशी पार्श्वभूमी असलेला ज्येष्ठ संपादक आणि एक तरुण संपादक यांचे नाते महत्त्वाचे ठरू पाहात होते. हे सगळे मी जवळून अनुभवले. हे सर्व व्यवस्थित जुळेल ना, असा कधी कधी मला प्रश्न पडायचा. पण राजेंद्रबाबू यांची त्या वयातली ती परिपक्वता स्तिमित करणारी होती. बाबा दळवी यांच्या अनुभवांचा, व्यासंगाचा, चळवळीतील सहभागाचा 'लोकमत' वर्तमानपत्रासाठी कसा अधिकाधिक चांगला उपयोग करून घेता येईल, हे राजेंद्रबाबू यांनी पाहिले. बाबांबद्दल आदर ठेवून त्यांची मूल्ये कशी रुजवता येतील आणि त्याच वेळी तरुण पिढीलाही कसे आकर्षित करता येईल, याचा राजेंद्रबाबू यांनी उत्तम असा समन्वय साधला. राजेंद्रबाबू बाबांना वडिलांच्या जागी मानायचे आणि माझ्या वडिलांचा स्वभावसुद्धा असा होता की ते सगळ्यांना मित्र मानायचे. त्यामुळे माझे वडील जरी ज्येष्ठ असले तरी त्यांना तरुणही खूप आवडायचे. त्यांच्या ज्येष्ठत्वाचे कधी कुणावर वजन येत नसे. बाबांनाही राजेंद्रबाबू खूप आवडले. त्यांना काही तरी तळमळीने करायचे आहे, हे बाबांना समजत होते आणि माझ्या वडिलांना तो विश्वास होता. यातूनच या दोघांचे नाते कायम टिकले. माझे वडील गेल्यानंतर ज्या शोकाकुल अवस्थेत मी राजेंद्रबाबू यांना पाहिले आहे. तेव्हा मला वाटले की हा क्षण पुढच्या काळात असलेल्या पत्रकारितेत महत्त्वाचे ठरणारा आहे. हे नाते मी आणि सगळ्या औरंगाबादकरांनी जवळून पाहिलेले आहे.

छपाईचे उत्तम तंत्र घेऊन सुबक वर्तमानपत्र काढता येऊ शकते, हे राजेंद्रबाबू यांनी मराठवाड्याला प्रथम दाखवले. वर्तमानपत्रातले विचार तर महत्त्वाचे आहेतच, पण देखणे रूपही हवे यासाठी त्यांनी त्यांच्या प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचा सगळा अनुभव पणाला लावला. संपादक म्हणून त्यांचे सर्वाधिक कौशल्य मला त्या वेळी जाणवले ते असे, की एखाद्या भागात जेव्हा वर्तमानपत्र रुजवण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा त्या भागाच्या कानाकोपऱ्यात कसे जाता येईल आणि आधीचे संकेत कसे मोडून काढता येतील, हे त्यांनी पहिल्यांदा मराठवाड्याला दाखवून दिले. ज्या भागात वृत्तपत्रविक्रेतेच नव्हते, तिथे या विक्रेत्यांनी नव्याने जन्म घेतला. ज्या वेळेला टीआरपी हा

शब्द अस्तित्वात नव्हता, त्या वेळी 'लोकमत'ने मराठवाड्यात टीआरपी मिळवला. तिथे 'लोकमत'मुळे अनेक संसार उभे राहिले. यातून या वृत्तपत्राचे मोठे जाळे विणले गेले. एकीकडे सुबक छपाई, दुसरीकडे विचारांचे भांडवल आणि तरुण संपादक या नात्याने असलेला राजेंद्रबाबू यांचा आधुनिक, प्रागतिक असा दृष्टिकोन, त्यांनी वर्तमानपत्राला दिलेले पुरोगामित्व हे सगळे एकत्र जुळून आले. बाबांचे विचारही स्वीकारले जाणे, ही काही साधी गोष्ट नव्हती. ते अनेकदा अग्रलेख लिहायचे आणि ते स्वीकारले जाणे ही सुद्धा मोठी गोष्ट होती. राजेंद्रबाबू यांनी ती हिंमत दाखवली.

### वेगळा विचार करणारा माणूस

मी संपादकीय विभागात काम करीत होतो आणि दुसरीकडे नाट्यशास्त्र विभागात मी संध्याकाळी शिकायचो. चंद्रकांत कुलकर्णीसुद्धा माझ्याबरोबर तिथे होता. राजेंद्रबाबू यांनी मोठ्या प्रेमाने आम्हाला शिकण्यासाठी सवलत दिली होती. हेही करा आणि तेही करा, असे त्यांचे मत होते. दिवसभर आम्ही काम करायचो आणि रात्री नाट्यशास्त्राच्या क्लासला जायचो. 'लोकमत'मध्ये मी प्रादेशिक विभागात काम करीत होतो. संपादकीय विभागाच्या बैठका राजेंद्रबाबू मोठ्या कौशल्याने घ्यायचे. त्या वेळी उपसंपादक म्हणून मला जागरूक राहायला लागायचे. त्यांचे सर्वांच्या कामावर आणि विविध विभागांवर बारीक लक्ष असायचे. आपण त्यांना आन्सरेबल आहोत, याचे चांगल्या अर्थाने आम्हाला टेन्शन असायचे. मराठवाड्यातले प्रत्येक गाव महत्त्वाचे आहे, असा दृष्टिकोन त्यांनी समोर ठेवला. प्रत्येक गावाला प्राधान्य मिळाले पाहिजे आणि बातमी कव्हर झाली पाहिजे, अशी त्यांची दृष्टी होती. बातमीला चांगले हेडिंग आले आहे की नाही याकडे त्यांचे लक्ष असायचे.

मराठवाड्यात पत्रकारितेचा अशा प्रकारचा विचार प्रथमच होत होता. हे सगळे करताना, आमचा प्रादेशिक विभाग आणि दुसरीकडे रिपोर्टिंगचा विभाग याकडे त्यांचे लक्ष असायचे. आज नवीन काय किंवा कोणत्या गोष्टींवर आपण प्रकाश टाकतोय, हे ते पाहायचे. त्या तरुण वयातही त्यांचे चौफेर असलेले लक्ष, यातून त्यांची धडाडी दिसून यायची. त्यांनी त्यांच्याविषयी आदर आणि प्रेम निर्माण केले. त्यामुळे विदर्भातून येऊनही ते मराठवाड्यात उपरे राहिले नाहीत. सगळीकडे वर्तमानपत्र पोहोचतेय की नाही, बातम्यांना न्याय दिला जातो आहे की नाही, ती आकर्षक होतेय की नाही, हे सगळे बारकाईने पाहणारा माझ्या काळातला तो संपादक होता आणि आजही आहे. आपल्या स्टाफला ऊर्मी देण्याचे जे संपादकाचे काम असते, ते राजेंद्रबाबू कौशल्याने करायचे.

### पत्रकार घडवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न

औरंगाबादमध्ये त्या वेळी 'लोकमत'च्या इमारतीएवढी देखणी इमारत दुसरी कुठलीच नव्हती. कार्यालयात कुणी पाहुणे आले की ते त्यांना विविध विभागांची ओळख करून द्यायचे आणि मी या सगळ्याचा भाग असल्याचा मला अभिमान वाटायचा. संपादकीय विभागावर त्यांची उत्तम पकड होती आणि त्यातून अनेक चांगले पत्रकार निर्माण झाले. त्यांनी पत्रकारितेचे प्रशिक्षण वर्गही सुरू केले होते आणि त्यातून पत्रकार घडवण्याची जबाबदारी माझ्या वडिलांकडे सोपवली होती. यातून मराठवाड्यातल्या तरुणांची एक फळी तयार झाली. 'लोकमत'मध्ये या निमित्ताने एक छोटेसे विद्यापीठच निर्माण झाले होते. हे सगळे करताना राजेंद्रबाबू यांनी जो मोकळेपणा ठेवला होता, तो मला महत्त्वाचा वाटतो. माझी नाटकाची पार्श्वभूमी बघून त्यांनी मला नाट्यमहोत्सव वगैरे कव्हर करण्याची नेहमी संधी दिली. सत्यदेव दुबे यांचा औरंगाबाद येथे होणारा पहिला फेस्टिव्हल मला कव्हर करायला मिळाला. त्या वेळी राजेंद्रबाबू यांनी नाटकासाठी अख्खी पुरवणी दिली होती आणि त्याचा आम्हाला मोठाच आनंद झाला होता. त्यांचा आम्हाला कायम पाठिंबा मिळत गेला. त्यांनी संकुचित विचार न करता, आपल्या वर्तमानपत्रात हे यायला पाहिजे असे तुम्हाला वाटते ना, मग तुम्ही हा महोत्सव हवा तसा कव्हर करा, एवढे स्वातंत्र्य त्यांनी आम्हाला दिले होते. यातून 'लोकमत'मध्ये साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातल्या मंडळींची वर्दळ सुरू झाली. कार्यकर्त्यांना ते आपले वर्तमानपत्र वाटू लागले. 'लोकमत' हे वर्तमानपत्र सर्वस्पर्शी कसे होईल, हे राजेंद्रबाबू यांनी पाहिले. सगळ्या नव्या विचारांसाठी 'लोकमत'चे दरवाजे सताड उघडे राहिले आणि हे मला खूप मोलाचे वाटते. 'लोकमत'मधला कामाचा अनुभव आणि राजेंद्रबाबू यांच्या संपादकीय कार्याचा अनुभव मला माझ्या पुढच्या आयुष्यासाठीही महत्त्वाचा ठरला. म्हणूनच माझे आणि 'लोकमत'चे नाते आजही टिकलेले आहे.

**प्रशांत दळवी**
मुंबई

(शब्दांकन : राज चिंचणकर, मुंबई)

# ‘शो मस्ट गो ऑन’ शिकवणारा संपादक

■ चक्रधर दळवी

*(संपादक, लोकमत, औरंगाबाद)*

माझ्या स्मरणानुसार १९८३चा सप्टेंबर महिना होता. मी ‘लोकमत’मध्ये प्रशिक्षणार्थी उपसंपादक म्हणून रुजू होऊन वर्षभरापेक्षा जास्त कालावधी उलटला होता. मेडिकल कॉलेजच्या घाटी परिसरातील क्वॉर्टर्समध्ये मी भावाकडे राहत होतो. दररोज रात्री १२ ते १२.३० च्या सुमारास शहर आवृत्तीची पाने सोडली की आम्ही निघायचो. दररोज रात्री एडिशन गेल्याखेरीज राजेंद्रबाबूही घरी जात नसत. कधी कधी तर राजेंद्रबाबू त्यांच्या एमएक्सव्ही-५५५ या फियाट कारमधून आम्हाला घरीही सोडत होते. शेवटीची सिटी बस १२.३० वाजता होती. ‘लोकमत’ ते घाटी हॉस्पिटल हे अंतर पायी जाण्याएवढे सोपे नव्हते. शेवटची बस जर चुकली तर पायी जावे लागत असे. अशा वेळी राजेंद्रबाबू मला आणि भीमराज सातदिवे या दोघांनाही घरी सोडायला स्वतः यायचे.

अशाच एका रात्री उशीर झाल्यामुळे आम्ही राजेंद्रबाबूंसोबत निघालो होतो. अंबा-अप्सरा थिएटरच्या समोरून जात असताना डाव्या हाताच्या जागेत आकाशात आगीचा डोंब उसळलेला दिसला. साहेब म्हणाले, कोठे

तरी आग लागलेली दिसते. आग मोठी आहे, आपण कव्हर करू शकू. लागलीच त्यांनी कार त्या दिशेने वळविली. जिल्हा परिषद कन्याशाळेच्या ग्रंथालय आणि मुख्याध्यापकांच्या खोलीतून आगीचे लोळ दिसत होते. तो काळ मोबाइलचा नव्हता. साहेबांनी लागलीच तेथून जवळ राहत असलेल्या साहेबराव पाटील सुलतानपूरकर यांच्या घरून अग्निशमन दलाला फोन केला. आगीची माहिती दिली. आजूबाजूच्या लोकांशी चर्चा करून माहिती मिळवली. हे सर्व करेपर्यंत २.३० वाजले होते. लागलीच साहेबांनी कार परत प्रेसच्या दिशेने वळविली व प्रेसमध्ये येऊन मशीन थांबविली. थोडे अंक प्रिंट झाले होते. नंतरची प्रिंटिंग थांबवून हे वृत्त कम्पोज करून घेऊन स्वतः कटिंग, पेस्टिंग करीत ती बातमी सेकंड लीड केली. दुसऱ्या दिवशी त्या वृत्ताने शहरात खळबळ उडाली. रात्री १.३० वाजता घडलेली घटना 'लोकमत'मध्ये प्रकाशित झाली. वाचकांना आश्चर्याचा धक्काच बसला. सर्व सहकाऱ्यांना मात्र या घटनेतून त्यांची बातमीवरची तळमळ, समयसूचकता आणि सामाजिक हित लक्षात ठेवून त्यांनी केलेली धडपड आणि त्याच्यामागची भावना लक्षात आली. बातम्या आम्ही अशा शिकत होतो.

**एका मथळ्याची कमाल !**

१९८४ मध्ये औरंगाबादेत आंतरविद्यापीठ महिला ऑफिसर्स स्पर्धा झाल्या. त्या वेळी मी क्रीडा उपसंपादक म्हणून पूर्ण वेळ काम करीत होतो. दिवसभर मैदानावर आणि सायंकाळी कार्यालयात येऊन त्याचे वृत्तांकन करायचो. एकट्यालाच आठ कॉलम भरायचे असल्यामुळे मोठमोठे फोटो वापरत होतो. मी पेज लावत असताना साहेब पाठीमागे येऊन कधी उभे राहिले हे कळलेच नाही. चक्रधर, ऑलिम्पिक स्पर्धांप्रमाणे कव्हरेज देताय... त्यावर मी म्हणालो, सर स्पर्धा बघण्यासाठी गर्दी चांगली होते, त्यामुळे इतके फोटो लावले. गर्दी चांगली होते आणि शहरातील जर सध्या एकमेव गर्दी खेचणारे हे ठिकाण असेल तर मग पहिल्या पानावर का घेत नाही, असे म्हणून त्यांनी गोल करतानाचा अमृतसर विद्यापीठाच्या खेळाडूचा अप्रतिम फोटो पहिल्या पानावर घेतला. तो सामना अमृतसर विद्यापीठाने जिंकला होता. माझ्या कॉपीत त्यांनी बरीच सुधारणा करीत मथळा दिला. 'बोले सो निहाल, नानकच जिंकले.' अमृतसर विद्यापीठाचे नाव होते गुरुनानक विद्यापीठ. दुसऱ्या दिवशी विद्यापीठ मैदानावर पाऊल ठेवायला जागा नव्हती ! हजारो प्रेक्षकांनी महिला हॉकी स्पर्धेला उपस्थिती लावली होती. एका फोटोने व मथळ्याने केलेली ती कमाल होती.

### ...असेही एक संकट आणि त्यावरची मात

१९९३ मध्ये अचानक एक दिवस 'लोकमत'मध्ये बीएमएसची युनियन लागली. पत्रकार आणि प्रॉडक्शन विभागातील एकही कर्मचारी कार्यालयात आलेला नव्हता. अनेक कर्मचाऱ्यांना इतर कर्मचाऱ्यांनी रोखून ठेवले होते. मला कशाचीच कल्पना नव्हती. मी हिंगोलीहून आलो होतो. कार्यालयात जात असता मला गेटवर रोखण्याचा प्रयत्न झाला. मी त्याकडे दुर्लक्ष करीत आत आलो. साहेब व विंग कमांडर जाधव, जानराव, ऑपरेटर टेबलजवळ उभे होते. मी आत आल्यानंतर साहेब म्हणाले, की तू थांबला नाहीस का तेथे? मी म्हणालो, नाही. कुठल्याही स्थितीत आपल्याला पेपर काढायलाच पाहिजे असे ते म्हणाले. मी उभा होतो. परत म्हणाले, काही झाले तरी (शो मस्ट गो ऑन) बाहेरून काही माणसे आणून व नागपूरवरून मजकूर मागवून, काही मजकूर प्रिंटवेलमधून कम्पोज करून आणला व आठ पानांचा 'लोकमत' काढला. काही झाले तरी 'शो मस्ट गो ऑन' हे मी आजही विसरू शकत नाही. आज लोकमतमध्ये ज्या सोयी सुविधा मिळतात त्या अन्यत्र अभावानेच दिसतात. अंतर्गत युनियन झाली. त्यातून संवादाचे पूल मजबूत झाले. हेल्थ चेकअप सारख्या गोष्टींमुळे अनेकांचे दूर्धर आजार उघडकीस आले, त्यातून त्यांच्यावर वेळीच उपचार करता आले. निवृत्तीच्या दिवशी घरी जाताना निवृत्त होणाऱ्यांच्या हाती पीएफ, सुट्यांचे पैसे यांचा हिशोब करुन त्याच दिवशी त्याच्या पैशांचा चेकही त्याच्या हाती दिला जातो. या गोष्टी समाधान देणाऱ्या आहेत.

### कोर्टात केस गेली म्हणून घाबरायचे नाही

१९९२-९३ चा काळ, औराद शहाजानी या छोट्या गावातील एका डी.एड्. महाविद्यालयात तीन तरुणींनी पळून जाऊन लग्न केले. गावकऱ्यांनी प्राचार्यांविरोधात जनआंदोलन उभे केले. लातूर जिल्हा ढवळून निघाला. जागोजागी मोर्चे निघाले. पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी अशी लढाई सुरू झाली. प्राचार्यांना गाव सोडावे लागले. तेव्हा हे नेमके काय प्रकरण आहे आणि पळून गेलेल्या मुली अल्पवयीन होत्या का, त्यांना कोणाची फूस होती काय, याचा शोध घेण्यासाठी मला आणि सुधीर महाजनला ऑन दी स्पॉट रिपोर्टिंगसाठी औराद शहाजानीला राजेंद्रबाबूंनी पाठविले. 'आर्यकथा' म्हणून चार भागांत लिहिलेल्या ऑन दी स्पॉट रिपोर्टिंगने महाराष्ट्रात खळबळ माजली. प्राचार्य फरार झाले. महाविद्यालयाने प्राचार्यांना बडतर्फ केले. कालांतराने प्रकरण थंड होते न होते तोच या प्राचार्यांनी आमच्याविरोधात हैदराबादेत अब्रुनुकसानीचा दावा ठोकला. समन्स आले. मी

समन्स घेऊन राजेंद्रबाबूंकडे गेलो. मला बघताच या आरोपी क्र. १ असे साहेब म्हणाले. मी घाबरलो होतो. समन्स येण्याची ही पहिलीच वेळ होती. घटना-घडामोडी खऱ्या होत्या. आपण जे लिहिले त्या तेथील घटना-घडामोडी होत्या. कोर्टात केस गेली म्हणून घाबरायचे नाही, असे सांगून साहेब म्हणाले, आपण केस लढू. ही केस १० वर्षे हैदराबादेत चालली. शेवटी दोन्ही पक्षांनी कोर्टाबाहेर हे प्रकरण मिटविले आणि शेवटपर्यंत त्यांनी आमचे मनोधैर्य कधीही खचू दिले नाही.

**सहकाऱ्यांवर विश्वास**

१९८६-८७ चा काळ होता. विद्यापीठातील राजकारण प्रचंड तापलेले होते. मी त्या वेळेस शहर प्रतिनिधी होतो. माझ्याकडे विद्यापीठ बीट होते. आपण कितीही निष्पक्षपाती वार्तांकन केले तरी त्यात एखादा गट सुखावतो आणि एखादा गट नाराज होतो. या प्रक्रियेत आपण कधी एखाद्या गटाचे होऊन जातो हे कळतही नाही आणि नेमके असेच झाले. सत्य आणि वस्तुनिष्ठ बातम्या देताना विद्यापीठातील भ्रष्टाचार उघडकीस आणला. साहजिकच सत्ताधारी नाराज झाले आणि विरोधक सुखावले. ८६ ते ८९ या कालावधीत विद्यापीठ राजकारण तापले नव्हते तर रक्तरंजितही झाले होते. हाणामाऱ्या, मोर्चे, शिवीगाळ यांनी विद्यापीठ रंगत होते. या कालावधीतच सत्ताधाऱ्यांनी संपादक राजेंद्रबाबूंकडे आधी निनावी व नंतर प्रत्यक्ष येऊन माझ्याविरुद्ध तक्रारी केल्या. ‘बातमी चुकीची असल्यास सांगा, बाकी कोणतीही तक्रार मी ऐकून घेणार नाही,’ असे स्पष्ट शब्दांत राजेंद्रबाबूंनी वारंवार येणाऱ्या संबंधित शिष्टमंडळांना सांगितले. बातमीतील दुसरी बाजू असेल तर द्या. खुलासा करा. पण आम्ही बातमी छापणारच नाही असे होणार नाही व तुमच्या म्हणण्यावर संबंधित वार्ताहरचे बीट बदलणार नाही, असे सांगून शिष्टमंडळाला बाहेरची वाट दाखविली. पुढे याच वार्तांकनाला मला १९८९ मध्ये पां. वा. गाडगीळ शोधपत्रकारिता पुरस्कार मिळाला. जर राजेंद्रबाबूंनी माझ्यावर विश्वास दाखवला नसता, तर हे घडलेच नसते.

**चक्रधर दळवी**
औरंगाबाद

# संपादकांचे संपादक

■ नंदकिशोर पाटील

*(कार्यकारी संपादक, लोकमत, मुंबई)*

पत्रकार हा सर्वज्ञ असतो, असा सार्वत्रिक गैरसमज. याच (गैर) समजातूनच मग पत्रकारांच्या हातून नको त्या चुका होऊन जातात. चार बुके शिकल्याने पत्रकारिता करता येतेच असे नाही, त्यासाठी अखंड अध्ययन करण्याची वृत्ती अंगी असावी लागते. तुमच्या लेखणीला विचाराचे अधिष्ठान प्राप्त करून देणारा 'गुरू' योग्य वळणावर भेटावा लागतो. अन्यथा, पत्रकारितेतील नवशिक्याचा वळणावर भीषण अपघात होण्याचा संभव असतो. कारण जग बदलण्याची ऊर्मी, निडरता आणि वाटेल ते ठोकून देण्याची वृत्ती याच उमेदवारीच्या काळात प्रत्येकाच्या अंगी असते. या अपघाती वळणावर योग्य मार्गदर्शक, गुरू अथवा वाटाड्या भेटला नाही, तर तुमचे वारू भरकटलेच म्हणून समजा. माझ्यासह 'लोकमत'मधील अनेकांचे सुदैव असे की, उमेदीच्या याच काळात आमच्या पाठीवर राजनबाबूंचा मार्गदर्शक हात होता. चुकलो तरी पुन्हा स्वतःला दुरुस्त करता यायचे आणि शाबासकीच्या शब्दांनी अंगात हत्तीचे बळ संचारायचे. 'लोकमत' हेच आमचे अंगण आणि आकाश असल्याकारणाने तिथेच रांगत, धडपडत,

धावत-पळत आणि धडाडीने आम्ही इथवर पोहोचलो. आधाराला राजनबाबूंचा हात होता म्हणूनच!

## पाठ्यपुस्तकाबाहेरील धडे

आयुष्यात काही धडे पुनःपुन्हा गिरवावे लागतात. पाटीवरच्या धुळाक्षरांना जोवर अर्थ प्राप्त होत नाही, तोवर ती बाराखडीच. अक्षरांचे शब्द, शब्दांची वाक्ये आणि वाक्यांची अक्षरमाळ होण्यासाठी विचारांना सुविचाराचे आणि हाताला आकार-उकारांचे वळण लागावे लागते. नुसत्या वळणदार अक्षरांनी पेनातून बातमी उतरली असती, तर सुलेखनाच्या वह्यांची देखील पाठ्यपुस्तके झाली असती. पत्रकारितेचे तसे नसते. पुस्तकी अभ्यासातून एक वेळ बातमी लिहिण्याचे तंत्र कळू शकेल, पण बातमी काढण्यासाठी विजिगीषू वृत्ती अंगी असावीच लागते. बेरीज-वजाबाकीतील 'हातचा' माहीत नसेल, तर केवळ पाढे पाठ असण्याने गणित सोडवता येतेच असे नाही. पत्रकारितेचेही अगदी तसेच. समाजाच्या विविध अंगांचा 'लसावि' काढत असताना असे 'हातचे' कळावे लागतात; किंबहुना ते बातमीदाराच्या हाताशीच असावे लागतात. पत्रकारितेच्या कुठल्याही पाठ्यपुस्तकात नसलेला हा 'धडा' राजनबाबूंनी शिकवला, म्हणून आम्ही पेरते झालो!

पत्रकारिता हा तसा स्वतःहून स्वीकारलेला आपद्धर्म असतो. 'आपद्धर्म' यासाठी की, या व्यवसायातील धोके, अनिश्चितता, अव्यवहार्यता आणि अपरिहार्यता ठाऊक असतानादेखील ते व्रत आपण स्वीकारतो; तेव्हा परिणाम भोगण्याची आपली तयारी आहे, अशा अलिखित करारावर आपण नकळतपणे स्वाक्षरी केलेली असते. अनेकदा अंगावर येण्याचे प्रसंग उद्भवतात, कोंडी होते, निवडलेल्या वाटेवरून परत फिरण्याची वेळ येते. पण अशा प्रसंगी एखादा वडीलधारी हात पाठीशी असेल, तर काट्यांवरूनही चालता येते! सनसनाटीपेक्षाही संवेदना, सहवेदना आणि समरसता अधिक परिणामकारक असते. हे जिथे शिकायला मिळाले तेच हे विद्यापीठ!

## मानवत हत्याकांड

परभणीला जिल्हा प्रतिनिधी म्हणून रुजू झालो. दुसऱ्याच दिवशी एक मोठी घटना घडली. गळा चिरलेल्या दोन बालकांचे मृतदेह पूर्णा नदीच्या पात्रात आढळून आले. सगळीकडे खळबळ माजली. फोटोग्राफरला सोबत घेऊन मीही घटनास्थळी धाव घेतली. नदीकाठी प्रचंड गर्दी जमलेली. कसेबसे पुढे सरकत आम्ही फोटो काढले. पोलिसांशी बोललो. काही थांगपत्ता लागत

नव्हता. फोटो काढून आम्ही ऑफिसला परतलो. दुपारी पूर्णा येथील वार्ताहरचा फोन आला.

'साहेब, नरबळीचे प्रकरण आहे!' मोठीच बातमी. तातडीने औरंगाबादला फ्लॅश पाठवला आणि तो वार्ताहर येण्याची वाट पाहात बसलो. सायंकाळचे साडेचार वाजत आले होते. तेवढ्यात फोनची रिंग वाजली. फोन औरंगाबादहून होता. तिकडच्या ऑपरेटरने तो थेट राजनबाबूंशी जोडून दिला. 'नंदु, बातमी कळली. पण मला वाटतं बातमीत आपण 'मानवत हत्याकांडा'चा संदर्भ दिला पाहिजे... कारण प्रकरण तसेच दिसते आहे.' एवढे बोलून राजनबाबूंनी फोन ठेवला. माझी पंचायत झाली. 'मानवत हत्याकांड' काय प्रकरण आहे, हे कुठे मला माहीत होते?

घटना तशी खूप जुनी आणि माझा तर दुसराच दिवस. शिवाय कार्यालयातील इतर सहकाऱ्यांनाही काही सांगता येईना. बरे त्या काळी 'गुगल सर्च' नसल्याने तशीही काही सोय नव्हती. माझ्यापरीने शोधाशोध केली. शेवटी मानवतचे वार्ताहर मधुकर वैद्य यांच्याकडून कळले की, १९७२ साली 'मानवत हत्याकांड' घडले. रखेलीला पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून एका नराधमाने अकरा जणांचे बळी घेतले होते. त्यात दहा महिला आणि एका पुरुषाचा समावेश होता. पूर्णाच्या बातमीला संदर्भ मिळाला. इतर माहिती घेऊन बातमी औरंगाबादला पाठवून दिली.

दुसऱ्या दिवशीचा अंक हाती पडला अन् मी उडालोच. 'परभणीत मानवत हत्याकांडाची पुनरावृत्ती!' अशा मथळ्याखाली माझ्या बायलाइनसह आठ कॉलम बातमी!! या बातमीने मोठीच खळबळ उडवून दिली. पोलिसांनी प्रकरण गांभीर्याने घेतले आणि मला नाव मिळून गेले. एखादी बातमी संदर्भासह दिली गेली तर ती किती परिणामकारक ठरू शकते, त्याचा हा मला मिळालेला पहिला धडा!

### ॲक्ट लोकली

गोदावरी खोऱ्यातील पाणीप्रश्न पेटलेला. नाशिकहून जायकवाडीसाठी सोडलेले पाणी नगरच्या नेते मंडळींनी अडवले. नगरचेच राधाकृष्ण विखे-पाटील हे औरंगाबादचे पालकमंत्री. स्वतःच्या जिल्ह्याचेच हित पुढे करीत त्यांनीही नगरहून पाणी पुढे सोडण्यास जोरदार विरोध केला. औरंगाबाद आणि अहमदनगरमध्ये अघोषित पाणी युद्ध पेटले. जाळपोळीमुळे नगर-औरंगाबादची वाहतूक ठप्प झाली. मी नगर आवृत्तीचा संपादक असलो, तरी मूळ मराठवाड्यातील असल्याने नगरमधील नेत्यांच्या आडमुठ्या धोरणावर सडकून टीका करणारा लेख लिहिला. संपूर्ण लेखात मराठवाड्याचा कैवार आणि नगरकरांना दूषणे. सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते शंकरराव कोल्हे यांनी

ज्या दिवशी कोपरगाव तहसीलवर प्रचंड असा मोर्चा काढला, नेमक्या त्याच दिवशी हा लेख प्रसिद्ध झाल्याने टीकेचा सगळा रोख 'लोकमत'वर! काहींनी अंकाची होळी केली. दिवसभर शिव्या घालणारे फोन. एक-दोन जणांनी तर धमकीही दिली. तेवढ्यात कोल्हेसाहेब 'लोकमत'वर मोर्चा आणणार, अशी बातमी कोपरगावचे बातमीदार सी. बी. गंगवाल यांच्याकडून समजली.

आता काय करायचे, खरंच मोर्चा आला तर? एकच पर्याय, राजनबाबू! फोनवर त्यांना सगळी हकिकत सांगितली. त्यांनी शांतपणे माझे म्हणणे ऐकून घेतले. एवढेच म्हणाले, 'तुम्ही जे लिहिले आहे ती वस्तुस्थितीच आहे. पण तुम्ही तिथे मराठवाड्याचे नाही, तर नगर आवृत्तीचे संपादक म्हणून काम पाहात आहात. आपली व्यक्तिगत मते आणि स्थळनिष्ठता काहीही असो. पत्रकार म्हणून आपण जिथे काम करतो, तिथल्या स्थानिकांचे प्रश्न मांडणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. यापुढे तुम्ही नगरकरांच्या बाजूने लिहीत राहा, आम्ही औरंगाबादची बाजू मांडत राहू!' दुसऱ्या दिवशी दहा-वीस जणांच्या शिष्टमंडळासह शंकरराव कोल्हे कार्यालयात हजर. 'काल मला दर्डाजींचा फोन आला होता. त्यांनी तुमच्याबद्दल खूप चांगले उद्‌गार काढले. तुमचा लेख मी वाचला. मराठवाड्याची बाजू चांगली मांडलीत. माझी त्याबद्दल तक्रार नाही; पण आमचीही बाजू तुम्ही समजून घ्यावी म्हणून आलोय.' एवढे प्रास्ताविक करून त्यांनी भलीमोठी फाइल माझ्या टेबलावर ठेवली. वेगवेगळे सरकारी निर्णय, नगर जिल्ह्याची सिंचनावस्था, पाणीवाटपातील विसंगती, सरकारचे चुकीचे धोरण... अशी सगळी माहिती त्यात होती. वरून त्यांची लाइव्ह कॉमेन्टरी सुरूच. मी चाट पडलो. सिंचनाविषयी इतका दांडगा अभ्यास असलेला राजकारणी मी पहिल्यांदाच पाहात होतो. नगरची नेतेमंडळी वर्तमानपत्रात आलेल्या एका लेखाची किती गांभीर्याने दखल घेतात, हे माझ्यासाठी नवल होते. राजनबाबूंनी दिलेला कानमंत्र आणि कोल्हेंनी सुपूर्द केलेली माहिती, एवढ्या भांडवलावर नंतरच्या काळात मी नगरची बाजू इतक्या तडफेने मांडली, की कालांतराने लोक मला नगरकर म्हणूनच ओळखू लागले!

**एक मुलाखत गाजलेली!**

नांदेड-वाघाळा महापालिकेची निवडणूक लागलेली. विशेष रिपोर्टिंगसाठी माझी नेमणूक. निवडणूक अंतिम टप्प्यात आलेली. विशेष बातम्या, विश्लेषण, मुलाखती असे सगळे धूमधडाक्यात सुरू होते. अचानक एके दिवशी एक बातमी आली. किनवट तालुक्यातील दोन

जमीनदारांची विजयकुमार नावाच्या नक्षलवाद्याने हत्या केली. यापूर्वीदेखील काही जमीनदार, सावकार आणि गुत्तेदारांचे हत्याकांड नक्षलवाद्यांनी घडवून आणले होते. त्यामुळे या घटनेने नांदेडच्या प्रेस, पोलीस आणि पॉलिटिक्समध्ये फारशी प्रतिक्रिया उमटली नाही. मात्र मला एका गोष्टीचे विलक्षण कुतूहल होते. ते म्हणजे जमीनदाराची हत्या ज्याने केली, त्या नक्षलीचे नाव वर्तमानपत्रात कसे आले? माझ्यातील पत्रकार जागा झाला. मला मिळालेली माहिती रंजक आणि तितकीच उत्कंठावर्धक होती. विजयकुमार हा नक्षलवादी असला तरी तो त्या भागातील गोरगरिबांसाठी मसिहा होता. जमीनदार, सावकार, मालदार, ठेकेदार आणि आमदारांना लुटून तो गरिबांना पैसे वाटत असे. पोरीबाळींच्या लग्नाला मदत करीत असे. साहजिकच त्याला लोकांचे पाठबळ मिळत असल्याने तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता. नक्षलवादी चळवळीबद्दल मी वाचलेली माहिती आणि विजयकुमारबद्दल ऐकलेली ही कहाणी यात खूप अंतर होते. काहीही करून त्याला गाठायचे ठरवले. अनेकांशी बोललो. पण काही थांगपत्ता लागेना. अनेकांनी कानावर हात ठेवले. जीव धोक्यात घालू नका, असा सल्ला पत्रकार बिरादरीकडून मिळाला. किनवटचा एक पुढारी विजयकुमारच्या संपर्कात असल्याची माहिती मिळाली. त्याला गाठून विजयकुमारला भेटण्याचा प्लॅन आखला. महापालिकेची निवडणूक पार पडल्यानंतर परभणीला परत आलो. काही दिवसांनंतर किनवटच्या त्या मध्यस्थाला फोन लावला. तर तो म्हणाला, पत्रकाराला मुलाखत द्यायला विजयकुमार तयार नाही. पुन्हा काही दिवस गेले. एके दिवशी त्या मध्यस्थाचा फोन आला. तो म्हणाला, मुलाखत शक्य नाही. पण भेट होऊ शकते... एका नातेवाइकाकडे लग्न आहे. तिकडे तो येणार आहे. मी मनात म्हटले, चला काम फत्ते झाले! ठरलेल्या दिवशी मी किनवटला एसटीने पोहोचलो. ठरलेल्या प्लॅननुसार संध्याकाळी एका खेडेगावात जायचे होते. सायंकाळी सहा वाजता जीपमधून आम्ही निघालो. आठ वाजेपर्यंत आम्ही त्या गावात पोहोचलो. सगळीकडे दाट झाडी, मिट्ट काळोख, झोपडीवजा दहा-बारा घरे, आजूबाजूला पडीक शेत... ना लग्नमंडप, ना वऱ्हाडी. मी विचारले, लग्न कुठेय? त्यावर मध्यस्थाने गप्प बसण्याचा सल्ला दिला. मला काही कळेना. काही दगाफटका तर होणार नाही ना, या भीतीने माझा थरकाप उडाला. रात्री एकच्या सुमारास विजयकुमार चार-पाच साथीदारांसह आला. कुठून आला, कशावरून आला काही पत्ता लागला नाही.

मी जीपमध्येच बसून. गावकऱ्यांशी काहीबाही बोलून आणि काही तरी देण-घेणे करून विजयकुमारसह... सगळे जण आमच्याच जीपमधून परत निघाले. मी जीव मुठीत घेऊन बसलो.

विजयकुमार पुढे बसला. बाकीचे मागे. गाडी निघाली. ते दोघे बोलू लागले, तोडक्या-मोडक्या हिंदी आणि तेलुगूत. मला तेलुगू कळत नव्हते. पण हिंदीतील संभाषण मी कानात साठवत होतो. अंधाऱ्या रस्त्याने वाट काढत गाडी कुठे तरी जंगलात थांबली. सगळे जण जीपमधून उतरून अंधारात गुडूप झाले. माझे अंग अजूनही शहारले होते. विजयकुमारची अगदी जवळून झालेली मूकभेट, त्या दोघांचे बोलणे आणि गावकऱ्यांच्या भेटीचा सगळा तपशील मला समजला.

**धाडस त्यांचे... पुरस्कार मला !**

दुसऱ्या दिवशी सगळा वृत्तांत लिहून काढला. नक्षलवाद्याची मुलाखत पाठवत आहे, असा निरोप औरंगाबादला दिला. दुपारी साधारणपणे तीन वाजता महावीरभाईंचा फोन आला. 'पाटील, काय कामगिरी केलीत? कुठला नक्षलवादी गाठला रे बाबा? उगीच डिंग्या मारू नको, पोलीस नेतील पकडून.' काय घडले ते मी त्यांना सगळे सांगितले. शेवटी मी मुलाखतवजा वृत्तांत औरंगाबादला पाठवून दिला. उत्सुकतेपोटी दुसऱ्या दिवशीचा अंक पाहिला. बातमी ना मुलाखत! तीन-चार दिवस झाले तरी बातमी नाही. विचारपूस केल्यानंतर कळले, की नक्षलवाद्याच्या भेटीचा वृत्तांत छापू नये, असे संपादकीय विभागात ठरले आहे. आता काय करायचे? ज्याच्यासाठी मी सारी धडपड केली, ती मेहनत वाया जाणार होती. मी तडक राजनबाबूंना फोन लावला. सगळी हकिकत सांगितली. शांतपणे सगळे ऐकून घेत 'ओके, मी बघतो' म्हणाले. मी निश्चिंत झालो. दुसऱ्या आठवड्याच्या 'अक्षररंग' पुरवणीत माझा वृत्तांत छापून आला. ज्या लेखाने पुढे मला चार पुरस्कार मिळवून दिले, तो लेख राजनबाबूंनी स्वतः एडिट केला होता!

बातम्यांवर प्रेम करण्याची त्यांची वृत्ती, आपल्या वार्ताहरावर विश्वास टाकण्याचे त्यांचे धाडस आणि स्वतः पेन हातात घेऊन वेळप्रसंगी लेख, बातम्या एडिट करण्याचे कसब या गुणांवर तर आम्ही कायम मोहित झालो.

**श्रद्धा आणि सबुरी**

शिर्डीतील साईबाबांच्या सिंहासनाला सोन्याचा मुलामा देण्याचा निर्णय साई संस्थानने घेतला. त्यावरून बरेच वादंग झाले. स्वतः शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सिंहासनविरोधी भूमिका घेतलेली. त्यामुळे संस्थानचे पदाधिकारी हतबल होते. शिवसैनिकांची नेमकी भूमिका काय, हे जाणून घेण्यासाठी मी शिर्डीला गेलो. सेनेच्या एका नगरसेवकाने घरी बोलावले. सोबत

शिर्डीचे वार्ताहर प्रमोद अहेर होते. चहा पिताना माझे लक्ष भिंतीवर टांगलेल्या एका फोटोकडे गेले. तो फोटो होता, बाळासाहेबांना शिर्डीत दिलेल्या चांदीच्या सिंहासनाचा! आम्ही युक्तीने तो मिळवला. नगरसेवकाचा निरोप घेऊन आम्ही बाहेर पडलो. तिथूनच रायकरसाहेबांना फोन लावला. ते म्हणाले, ताबडतोब मुंबईला फोटो पाठव. मग काय, प्रमोदच्या दुकानातूनच त्यांना मेलवर कॅप्शनसह फोटो पाठवला. फोटो छापण्याचा निर्णय रायकरसाहेबांचा. झालेल्या वादानंतर बाळासाहेबांनी ते सिंहासन परत पाठवले, तेव्हा 'रिसीव्ह' असे त्यांच्या पत्रावर लिहून दिले अतुल कुलकर्णी याने. त्या दिवशी दुपारच्या वेळी ऑफिसमध्ये तो एकटाच होता. (मात्र फोटोओळीत किरकोळ दुरुस्ती करून काहींनी त्याचे श्रेय लाटले, हे अलाहिदा!) दुसऱ्या दिवशीच्या अंकात पहिल्या पानावर फोटो प्रसिद्ध होताच राज्यात एकच खळबळ उडाली. बाळासाहेबांनी लागलीच 'त्या' फोटोतील 'ते' सिंहासन 'लोकमत'च्या मुंबई कार्यालयात पाठवून दिले. देशभरातील न्यूज चॅनल्सना मोठी बातमी मिळाली! विजयबाबू, रायकरसाहेब यांच्या प्रतिक्रियेसाठी चॅनल्सची झुंबड उडाली. दिवसभर 'लोकमत' आणि 'सिंहासन' हाच विषय!

मुंबईत हे सुरू असताना नगरच्या कार्यालयाला पोलिसांचा गराडा. शिवसैनिक हल्ला करणार, अशी खबर लागलेली. धमक्यांमुळे फोन, मोबाइल खणाणू लागले. आमचा जीव मुठीत. रात्री बारापर्यंत सगळे जण कार्यालयात. साडेबाराच्या सुमारास राजनबाबूंचा फोन आला. 'नंदू, तुम्ही खूप मोठं धाडस केलंत. लाखो रुपये खर्च करून जेवढी 'लोकमत'ची चर्चा झाली नसती, तेवढी ती तुमच्या एका फोटोमुळे देशभर झाली. तुमचं अभिनंदन! पण मला माहित्येय की, तुम्हाला धमक्या येताहेत. काळजी करू नका. श्रद्धा आणि सबुरी ठेवा!' त्या दिवसापासून साईबाबा आणि राजदबाबूंवरचीही माझी श्रद्धा अधिक दृढ झाली!

**नंदकिशोर पाटील**
मुंबई

■●

# अंतर्बाह्य संपादक

■ **अजय अंबेकर**

*(माहिती संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई)*

सन १९८६ साली 'लोकमत'मध्ये रुजू होण्यापूर्वी राजेंद्र दर्डा ऊर्फ बाबूजी यांच्याबद्दल 'संपादक असे नामाभिधान लावणारे मालक' अशी माझी समजूत होती. मुलाखतीच्या वेळी पत्रकारितेतील विविध संकल्पना, वृत्तपत्र स्वातंत्र्य, लेखनशैली अशा विविध बाबींवर त्यांनी मला प्रश्न विचारले होते. सर्व प्रश्न संपादन कौशल्याशी संबंधितच होते. (माझ्या सुदैवाने बाबा दळवी माझ्या मुलाखतीच्या दिवशी बाहेरगावी गेलेले होते. ते असते तर त्यांच्या शुद्धलेखनाच्या आणि सामान्यज्ञानाच्या प्रश्नावर माझी नक्कीच दांडी गुल झाली असती) पण राजेंद्रबाबूंचे प्रश्न केवळ मालकाच्या भूमिकेतले नव्हते तर अस्सल संपादकीय स्वरूपाचे प्रश्न होते. हे त्या वेळी नाही, पण नंतर लक्षात आले. 'लोकमत'मध्ये रुळत असताना हळूहळू लक्षात आले की, राजेंद्रबाबू वृत्तपत्रीय व्यवहाराचे व्यवस्थापन हे व्यावसायिक गरजेपोटी, छपाई तंत्रज्ञानाबद्दल सतत अद्ययावत राहणे कुतूहलापोटी तर बातमी, लेखन आणि संपादन या गोष्टी आत्यंतिक आवडीपोटी करतात. 'लोकमत'पूर्वीच्या अन्य वृत्तपत्रांतील माझे आणि

अन्य वृत्तपत्रांत काम करणाऱ्या मित्रांचे अनुभव वेगळेच होते. कोणताच मालक त्यांच्या वृत्तपत्रीय संपादकीय विभागात क्वचित तेही अगदी व्यावहारिक गरजेपोटीच डोकावत असे.

### सुटलेल्या बातम्यांची झाडाझडती घेणारे मालक - संपादक

राजेंद्रबाबू संपादकीय विभागात केवळ डोकावत नसत किंवा संपादकीय विभागाच्या सकाळच्या बैठकीत केवळ सुटलेल्या बातम्यांबद्दल झाडाझडती घेत नसत, तर सर्व प्रकारच्या संपादकीय कामकाजात प्रसंगी बातमीचे डिक्टेशन देणे, मथळे सांगणे, लिहिलेली बातमी पुन्हा लिहिणे, मथळे अधिक अर्थपूर्ण करणे, अनेक वेळा पेज लावणे; राजेंद्रबाबू अगदी तन्मयतेने सहभागी होत असत. मी जवळपास एक-दीड वर्ष सलग रात्रपाळी केलेली होती. त्या काळात तर जवळजवळ प्रत्येक दिवशी रात्री दहा वाजता, अकरा वाजता येऊन त्यांनी पहिले पान लावून घेतलेले आहे. त्यांचे पेज लेआऊटबद्दलचे ज्ञान, कौशल्य आणि दृष्टिकोन याने आम्ही सर्वच चकित होत असू. पेजवर स्वतः बातम्या लावताना (त्या वेळी बातम्यांचे ब्रोमाइड पेजवर डिंक लावून चिकटावे लागत असे) आपण वृत्तपत्राचे सर्वेसर्वा आहोत असा अहंभाव कोठेच नसे किंवा संपादकपदाचीही शेखी नसे. आपल्या आवडीचे काम करायला मिळतेय याचा बालसुलभ आनंद त्यांच्या देहबोलीत दिसत असे. आनंद बालसुलभ असला तरीही त्यांचे काम तज्ज्ञाच्या तोलाचे असे.

आता पेज लेआऊट संगणकाच्या स्क्रीनवरच तयार होतो. त्याहीपूर्वी म्हणजे ब्रोमाइडला डिंक लावण्यापूर्वीच्या काळात ब्रोमाइडला चिकटपट्टीच्या तुकड्याने पेजवर चिकटविले जात असे. त्यामुळे पेस्टिंगच्या रूममध्ये टेबलावर आणि जमिनीवर चिकटपट्ट्यांच्या तुकड्यांचा पसारा विखुरलेला असे. 'लोकमत' सुरू झाला तेव्हाची माझ्या पूर्वसुरींनी सांगितलेली एक आठवण इथे शेअर करीत आहे. गाड्यांच्या वेळापत्रकाचे गणित बसविण्याच्या प्रारंभीच्या काळातील धडपडीत एकदा ताजी बातमी पेजवर लावण्याच्या अट्टहासापायी आवृत्तीला उशीर होत होता. सर्व जण कामाला लागले. राजेंद्रबाबू स्वतः पेजेस लावण्याकरिता आले. त्यांनी पाने लावली. आवृत्ती छपाईला गेली. बाबूजी स्वतः छपाई आणि पॅकिंग पूर्ण होईपर्यंत थांबले. कर्मचाऱ्यांबरोबर मॅटेडोरमधून बसस्टॅण्डला गेले. सोबत संपादकीय कर्मचारी होते. गठ्ठे रवाना झाल्यावर पहाट होत असताना सगळे निवांतपणे चहाच्या टपरीवर आले. चहा पीत असताना बाबूजींच्या कपड्यांकडे

लक्ष गेले तेव्हा लक्षात आले की पॅण्टवर आणि शर्टाच्या बाहीवर जागोजागी चिकटपट्ट्यांचे तुकडे लागले आहेत. एखादा सैनिक शर्टावर डकविलेल्या शौर्याच्या आणि मानाच्या मेडलकडे ज्या अभिमानाने बघतो तसे बाबूजी त्या तुकड्यांकडे पाहात होते.

**परदेशी वर्तमानपत्र आणून देणारे पत्रकार**

त्यांचे व्यवस्थापनकौशल्य, विविध पातळ्यांवर संवाद साधण्याची हातोटी, राजकीय आणि सामाजिक भान, व्यावसायिकतेबरोबरच कला आणि क्रीडा यांची आवड ह्या बाबी सर्वश्रुतच आहेत. पण ते स्वतः उत्तम लिहितात आणि इतरांनी लिहिलेले बारकाईने वाचतात. परदेश दौऱ्यावरून आल्यानंतर त्यांनी अनेकदा आमच्यासाठी तिथली वर्तमानपत्रे आणि मासिके आणली आहेत. ते ती नुसती आणत नसत तर त्यावर आमच्याशी सखोल चर्चा करीत आणि कशाचे किती अनुकरण करता येईल याची चाचपणी करीत.

एखाद्या वेळी संपादकीय कक्षात अवचितपणे येऊन बाबूजी आमच्याशी छोट्या-मोठ्या गप्पा मारत. त्या वेळी बाबा दळवी असतील तर आणखी मजा यायची. बाबांशी होणारे त्यांचे वैचारिक वादविवाद म्हणजे लुटुपुटुची लढाई असायची. किंबहुना बाबांनी आपला वाग्यज्ञ सुरू करावा याकरिता राजेंद्रबाबू अनेक वेळा मिस्कीलपणे तिरकस विधान करून वादविवादाला प्रारंभ करायचे. बाबाही खिलाडूवृत्तीने अभ्यासपूर्ण माहिती सांगत आपले मत ठाशीवपणे मांडायचे. यातून आम्हाला दिसायचे बाबूजींचे चौफेर वाचन, चालू घडमोडींवर असणारी बारीक नजर आणि स्वतःचे विचार मांडण्याचा ठामपणा.

**वार्ताहरांचे समर्थन करणारा संपादक**

मी जवळपास दोन वर्षे प्रादेशिक विभागाचा इन-चार्ज होतो. मराठवाड्यातील वार्ताहरांच्या एकेकट्याने समोरासमोर अशा बैठका व्हायच्या. त्या गावाचा एजंट आणि वार्ताहर एका बाजूला आणि बाबूजी, मी आणि वितरणप्रमुख दुसऱ्या बाजूला अशी ती रचना असे. अशा बैठकीत एजंट विरुद्ध वार्ताहर अशी सूक्ष्म तेढ दृष्टीस पडणे स्वाभाविक होते. कोणत्याही वृत्तपत्राचा मालक अशा बैठकांमध्ये साहजिकच एजंटाची बाजू घेणार. पण बाबूजी मात्र वार्ताहरांचे समर्थन करायचे. प्रत्येक गावात 'लोकमत' रविवारी किती जातो, गुरुवार पुरवणीच्या दिवशी किती जातो आणि एरवी किती जातो याची आकडेवारी जशी त्यांना पाठ असायची तशीच त्या गावच्या वार्ताहराच्या

बातम्यांचे विषय, त्याची लेखनशैली, बातम्या पाठविण्याचे प्रमाण हे सगळे माझ्यापेक्षा जास्त सखोल माहीत असायचे.

आपल्या वृत्तपत्राने लोकप्रियतेचा उच्चांक गाठूनही आणि कोणतीही स्पर्धा दृष्टिक्षेपात नसतानासुद्धा यशस्वी वृत्तपत्राचा यशस्वी मालक बातम्यांवरचे-लिखाणावरचे-पेज लेआऊटवरचे आपले प्रेम अबाधित ठेवू शकतो हे माझ्यासाठी आश्चर्यकारकच होते. 'लोकमत'चा विस्तार आणि राजेंद्रबाबूंचा व्याप वाढत गेला. तसतसे नंतर दैनंदिन कामकाजात लक्ष घालता येणे त्यांना शक्य नव्हतेच. पण जेव्हा ते 'लोकमत'चे चोवीस तास संपादक होते, तेव्हा संपादकीय कामकाजाची खडान्‌खडा माहिती आणि कौशल्य असलेल्या अंतर्बाह्य संपादकाच्या नेतृत्वाखाली आम्हाला काम करता आले, याचा आम्हाला अभिमान वाटतो.

**अजय अंबेकर**
मुंबई

# आमचा ऊर्जास्त्रोत

■ सुधीर महाजन

*(संपादक, लोकमत, औरंगाबाद)*

तो १९८२ चा काळ होता. शिक्षण संपले आणि नोकरीच्या शोधात होतो. शिकत असतानाच प्रकाश सिरसट, शांताराम पंदेरे, मंगल खिंवसरा, सुभाष लोमटे, प्रवीण वाघ यांच्या सहवासात असल्याने सामाजिक भान आले होते. औरंगाबाद शहरात त्या वेळी डाव्या-उजव्या चळवळींना उधाण आलेले होते. मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन जोरात होते. संपूर्ण मराठवाडाभर एक सामाजिक घुसळण सुरू होती. त्याच वेळी औरंगाबादेत 'लोकमत'चे आगमन झाले.

नामांतराची जाहीर भूमिका घेणारे बाबा दळवी हे संपादक होते. जाहीर यासाठी की, त्या वेळी भलीभली पुरोगामी मंडळी 'नरो वा कुंजरो वा' भूमिका घेत होती. अशा वेळी 'लोकमत'मध्ये प्रवेश झाला. पत्रकारितेची नीटशी कल्पना नव्हती, पण याद्वारे सामाजिक काम करता येते हे निश्चित माहीत होते. पत्रकारिता त्या वेळी 'मीडिया' बनली नव्हती आणि या व्यवसायाला ग्लॅमर नव्हे तर बांधीलकी होती. प्रशिक्षणार्थी पत्रकार म्हणून काम करीत होतो. सकाळी बाबांचा क्लास आणि दुपारपासून रात्री उशिरापर्यंत प्रत्यक्ष काम असा

हा वेगळ्या धुंदीचा काळ होता. 'लोकमत'मध्ये काम करणारा प्रत्येक जण हा एक 'मिशन' म्हणून काम करीत होता. त्याला वेळेचे बंधन मान्य नव्हते की, श्रेय उपटण्याचा उपद्व्यापही नव्हता. पत्रकारितेत प्रवेशच राजेंद्रबाबूंच्या मार्गदर्शनाने झाला.

**अद्ययावत यंत्रसामुग्रीचे अप्रूप**

प्रारंभीच्या दहा वर्षांच्या काळात राजेंद्रबाबूंच्या कामाचा झपाटा असा काही होता की, एवढी ऊर्जा या माणसामध्ये कशी आली, असा प्रश्न पडायचा. सकाळी १० वाजता कार्यालयात आल्यानंतर वर्तमानपत्राच्या क्षेत्रातील व्यवस्थापन, जनसंपर्क, अर्थकारण, संपादन या सर्व आघाड्यांवर ते लढताना दिसायचे. एवढेच नव्हे तर रात्री अंकाची पाने लावून दीड-दोन वाजता घरी निघत आणि पुन्हा भल्या पहाटे अंक वेळेवर स्टॉलवर पोहोचला की नाही याची खात्री करण्यासाठी शहरात फेरी मारत. 'लोकमत'ची अद्ययावत यंत्रसामुग्री, संगणकाचा वापर हे सर्वांसाठीच अप्रूप होते.

आमच्यासाठी तर पत्रकारिता आणि तंत्रज्ञान हे दोन्ही नवीनच. त्यामुळे कधी कधी उत्साहाचा अतिरेक व्हायचा. अशा वेळी त्याला आवर घालण्याचे काम ते करत. रात्री आमच्याबरोबर पाने लावून राजेंद्रबाबू निघत. बऱ्याच वेळा आपल्या गाडीतून आम्हाला घरापर्यंत सोडत. ही त्यांची एक प्रकारे नगर प्रदक्षिणाच असायची. तो काळ म्हणजे आमच्यासाठी सायकलसुद्धा चैन ठरावी असा होता. आपले सहकारी रात्री दीड-दोन वाजता घरी कसे जातील, याचा विचार करून त्यांना घरापर्यंत सोडणारा हा कुटुंबप्रमुख होता. महिन्यातून आठ-दहा वेळा तरी ते अशी नगर प्रदक्षिणा करीत.

मराठवाड्यासाठी हा काळ सामाजिक चळवळींचा होता तसाच तो सामाजिक तणावाचाही होता. औरंगाबाद शहर हे यासाठी त्या वेळी प्रसिद्ध होते. शहरात दंगल झाली नाही असे वर्ष नव्हते. तणाव निर्माण होण्यासाठी क्षुल्लक कारण पुरेसे होते. महिन्यातून एखादी घटना घडायची व पंधरा-वीस मिनिटांत बाजारपेठा बंद व्हायच्या. अशा वातावरणातही लोकांचा 'लोकमत'वरील विश्वास टिकवून ठेवण्यातील त्यांचे कसब म्हणजे संपादकीय कौशल्यच. त्यामुळेच आज ३२ वर्षांनंतर 'लोकमत'ची प्रतिमा धर्मनिरपेक्ष आहे आणि ती ओढून-ताणून आणलेली नाही तर लोकांचे प्रश्न मांडत, चळवळींच्या सोबत राहत ही प्रतिमा 'लोकमत'ने कष्टाने मिळवली आहे. त्याच्यामागे राजेंद्रबाबूंची दृष्टी महत्त्वाची ठरलेली आहे. 'लोकमत' हे सर्वमान्य वृत्तपत्र राहिले ते या

भूमिकेमुळेच. आज हे लिहिताना सोपे वाटते, पण त्या वेळी अशा परिस्थितीत मार्ग काढणे कठीण होते.

**नामांतराच्या पाठीशी 'लोकमत'**

नामांतराचा प्रश्न पाहिला तर त्यावरून संपूर्ण मराठवाड्यात दलित-सवर्ण अशी दरी पडली होती. गावागावात दलितांवर अत्याचार झाले होते. अशा वेळी नामांतरवादी भूमिका घेऊन ती संयतपणे मांडणे ही गोष्ट अवघड होती. वर्तमानपत्राच्या जनाधाराचा प्रश्न होता आणि 'लोकमत' तर नवीन होता. पण त्या वेळी नफा-तोट्याचा विचार करणारी व्यक्ती असती तर कदाचित वेगळी भूमिका घेतली असती. पण पुरोगामी महाराष्ट्रात नामांतर किती आवश्यक आहे, नव्हे काळाची गरज आहे हे त्यांनी 'लोकमत'च्या माध्यमातून संयमाने पण प्रभावीपणे मांडले. त्यामुळे या प्रश्नावर एक प्रकारे लोकशिक्षण झाले आणि विरोधाची धार बोथट बनली. हे त्यांचे संपादकीय कौशल्यच.

**आकर्षक मांडणीचे अप्रूप**

त्यांच्याबरोबर काम करताना बातमी कशी लिहावी येथून ते पानांची आकर्षक मांडणी कशी करावी येथपर्यंत शिकायला मिळायचे. ते बातम्यांची आकर्षक मांडणी करण्याचा आग्रह धरायचे. मात्र त्याच वेळी त्या मांडणीत बातमी मरून जाणार नाही याकडे त्यांचा कायम कटाक्ष होता आणि आहे... त्यांच्यासोबत काम करणे म्हणजे ऊर्जासंचय करण्यासारखे आहे. आमच्या कामावर आजही त्यांचे बारीक लक्ष असते. कधी तरी सकाळी सकाळी मोबाइल वाजतो. ''सुधीर, त्या बातमीमधील ते वाक्य वापरायला नको होते.'' आपली चूक लगेच लक्षात येते. थोड्याशा भेटीतही ते वेगळीच आपल्या ज्ञानात भर टाकणारी गोष्ट सांगतात. त्यांची ही भेट प्रचंड ऊर्जा देऊन जाते. म्हणूनच ते आमच्यासाठी ऊर्जास्त्रोत आहेत.

**सुधीर महाजन**
औरंगाबाद

# मशीनपासून लेखणीपर्यंत...

■ श्रद्धा बेलसरे

*(माजी माहिती संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई)*

औरंगाबादला १९८१ साली 'लोकमत' नावाचे वृत्तपत्र सुरू झाले आणि मराठवाड्याच्या वृत्तपत्र क्षेत्रात फारच खळबळ उडाली. ३३ वर्षांपूर्वीचा काळ डोळ्यांपुढे उभा करा म्हणजे मी काय म्हणते ते लक्षात येईल. त्या वेळी रंगीत छपाई, फोटो कंपोजिंग, डीटीपी युनिट, संगणकीय पेजमेकिंग असे नवे शब्द कानावर पडू लागले. राजेंद्र दर्डा हे 'लोकमत'चे संपादक असून, ते विदर्भातील काँग्रेसचे मातब्बर नेते जवाहरलाल दर्डा यांचे सुपुत्र आहेत, हेही आम्हाला समजले. 'लोकमत'च्या प्रकाशनाचा सोहळा फार थाटात झाला. आतापर्यंत औरंगाबादकरांनी एवढा मोठा सोहळा कधी पाहिलेला नव्हता. त्या वेळचे मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांच्यासह अनेक मान्यवर त्यासाठी हजर होते. आम्हा औरंगाबादकरांसाठी हे सगळे अकल्पित होते.

आपल्याच वयोगटात असणाऱ्या या तरुण संपादकाला भेटण्याची उत्सुकता सर्वच तरुण पत्रकारांत त्या वेळी होती. तेव्हा मी विद्यापीठात वृत्तपत्रविद्येचा अभ्यास करीत होते. 'लोकमत'ची भव्य इमारत बघून

आम्हाला दचकायला व्हायचे.

### ... आणि मशीनखालून माणूस बाहेर आला

आमच्या मराठवाडा विद्यापीठाच्या (त्या वेळचे नाव) वृत्तपत्र विभागाने 'लोकमत' भेटीचा कार्यक्रम ठरवला. २०-२५ विद्यार्थी आणि दोन प्राध्यापकांसह आम्ही तेव्हा जवळजवळ गावाबाहेर भासणाऱ्या 'लोकमत'च्या भव्य परिसरात पोहोचलो. 'लोकमत'चे कार्यकारी संपादक बाबा दळवी म्हणजे आम्हाला कायम आधार वाटायचे. प्रथम बाबांनी 'लोकमत'ची माहिती सांगितली. मग प्रेस दाखवायला नेले. अत्याधुनिक मशिनरी, त्यावरचे प्रिंटिंग आम्ही उत्सुकतेने पाहत होतो. एक उपसंपादक संतोष महाजन माहिती देत होते. इतक्यात एका मोठ्या मशीनच्या खालून सगळ्या अंगाला काळे आणि तेल लागलेला माणूस बाहेर आला. कोणी तरी मेकॅनिक असेल असे मला वाटले. तेवढ्यात बाबा दळवींनी आमची ओळख करून दिली, हे आहेत 'लोकमत'चे संपादक राजेंद्र दर्डा!

छानपैकी हसून ते बाबांना म्हणाले, यांना आपल्या केबिनमध्ये घेऊन या... सगळी प्रेस पाहून आम्ही त्यांच्या खोलीत गेलो. मघाच्या मशीनखालून आलेल्या मळकट माणसाच्या जागी आता त्या खुर्चीवर एक देखणा राजस-हसतमुख पोरगेलसा युवक बसलेला होता. माझ्या मनातल्या या दोन प्रतिमा काही केल्या मेळ खात नव्हत्या. अत्यंत आत्मविश्वासाने राजनबाबू आम्हाला माहिती देऊ लागले. 'लोकमत'च्या उभारणीची रंजक कहाणी ते अगदी निगर्वी पद्धतीने सांगत होते. असा संपादक याआधी आम्हाला कधी माहितीच नव्हता...

### मराठवाड्यातील पत्रकारांनी परदेशी पेपर पाहिले

मी मराठवाड्यातल्या तरुण पत्रकारांचे एक प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते. त्यासाठी किर्लोस्कर मासिकाचे संपादक मुकुंदराव किर्लोस्कर, तत्कालीन माहिती राज्यमंत्री विलासराव देशमुख, मराठवाडा दैनिकाचे संपादक अनंतराव भालेराव व राजेंद्र दर्डा यांना बोलावण्यात आले होते. त्या वेळी मला राजनबाबूंनी सुचवले की देश-विदेशातील वृत्तपत्रांचा संग्रह त्यांच्याकडे आहे. त्याचे प्रदर्शन लावा, म्हणजे मराठवाड्यातील मुलांना जगातली वृत्तपत्रे पाहायला मिळतील.

त्यांनी मोठ्या मेहनतीने गोळा केलेल्या परदेशी वृत्तपत्रांचे गठ्ठे आम्हाला दिले. तेव्हा आम्हाला पहिल्यांदा 'वॉशिंग्टन पोस्ट'सारखे दैनिक पाहायला मिळाले. नव्याने पत्रकार होणाऱ्यांना या गोष्टी

कळायला हव्यात, त्यांना या गोष्टी पाहायला मिळाव्यात यासाठी त्यांचा कायम आग्रह असायचा आणि तो आजही कायम आहे...

पुढे अनेक वेळा भेटी होत गेल्या. संपादक राजेंद्र दर्डा राजनबाबू कधी झाले ते समजलेच नाही. राजीव गांधी प्रधानमंत्री असताना त्यांच्याबरोबरच्या एका पत्रकारांच्या शिष्टमंडळात राजनबाबू अमेरिकेला गेले होते. त्या वेळी अमेरिकेत राष्ट्राध्यक्षांची निवडणूक सुरू होती. ती पूर्ण निवडणूक प्रक्रिया कव्हर करणारी त्यांची वार्तापत्रे फार गाजली. नुसते करार, भेटी असा रूक्ष मजकूर न देता ते अनेक बाबींवर लिहीत असत. बार्सिलोना कुठे आहे, तिथे काय मिळते, तिथले लोक कसे आहेत, असा बारीकसारीक तपशील ते असा देत असत की वाचकाला जणू आपण त्या शहराला भेट देऊनच आलो आहोत असे वाटू लागे. खूप चांगला व वाचनीय मजकूर ते देत असत. त्या वेळी पहिल्यांदा त्यांच्यातला पत्रकार मी पाहिला होता.

गर्भश्रीमंत असणाऱ्या राजनबाबूंनी कधीही श्रीमंतीचा तोरा दाखवला नाही किंवा त्याचा गर्वही बाळगला नाही. ते कायम जमिनीवर राहिले. पत्रकारिता, व्यावसायिकता आणि चांगला जनसंपर्क हेच त्यांच्या यशामागचे रहस्य असावे असे मला नेहमी वाटते. अनेक वर्षांच्या कालावधीनंतर त्यांनी पुन्हा एकदा ‘लोकमत’चे ‘एडिटर इन चीफ’ हे पद स्वीकारले आहे. त्यामुळे त्यांच्या काळातला तोच ‘लोकमत’, बातम्या, लेख, विचारांचा पुरस्कार करणारा पेपर आम्हाला मिळेल याचा विश्वास वाटतो.

**श्रद्धा बेलसरे**
मुंबई

■●

# मॅन ऑफ न्यूज

■ विजय बाविस्कर

*(संपादक, लोकमत, पुणे)*

मी 'लोकमत स्कूल ऑफ जर्नालिझम'चा विद्यार्थी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. जीवनातील या अविस्मरणीय कालावधीत माझ्यातील पत्रकार घडविण्यात श्रद्धेय बाबा दळवी आणि आदरणीय राजेंद्रबाबू यांचा प्रेरक आणि मार्गदर्शक सहवास मोलाचा ठरला. राजेंद्रबाबू म्हणजे एक चैतन्याचे झाड. या 'विद्यापीठाने' आम्हाला अनेक गोष्टी शिकविल्या. राजेंद्रबाबू हे खरे तर मालक. परंतु ते मालक कमी आणि पत्रकार अधिक आहेत. पत्रकारितेशी त्यांची नाळ घट्ट आहे. बातमीशी असणाऱ्या प्रामाणिक नात्यामुळे अचूक आणि ताजेपणासाठी त्यांना रात्र रात्र जागताना आम्ही पाहिले आहे. एखादा आघात वा अपघात झाला की त्या घटनेचे सर्व कंगोरे टिपावेत, वाचकांना परिपूर्ण बातमी 'लोकमत'मधून वाचायला मिळावी, यासाठी राजेंद्रबाबू काटेकोर नियोजन करतात. संबंधित सहकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना देतात. दहावी-बारावीच्या निकालाच्या वेळी सर्व गुणवंतांची छायाचित्रे आणि प्रतिक्रिया येतील याकडे ते स्वतः लक्ष देतात. राजेंद्रबाबू आम्हाला सांगायचे की, वर्तमानपत्रात छायाचित्र येणे ही या

विद्यार्थ्यांसाठी मोरपंखी आठवण असते. जगात कोठेही गेले तरी पहिल्यांदा आपले छायाचित्र ज्या वर्तमानपत्रात छापून येते त्याला ते विशेष लक्षात ठेवतात. राजेंद्रबाबूंविषयी बोलताना बाबा दळवी आवर्जून म्हणायचे की, 'राजन इज अ मॅन ऑफ न्यूज'. हे अक्षरशः खरे आहे. आमच्या पिढीने ते ठायी ठायी अनुभवले आहे.

**गृहपाठाचा असाही वस्तुपाठ**

मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना खास 'लोकमत'साठी त्यांची मुलाखत घ्यायची होती. राजेंद्रबाबू स्वतः आमच्यासोबत मुलाखतीसाठी येणार होते. मनोहर जोशी हे एक चतुर, धोरणी व हजरजबाबी म्हणून प्रसिद्ध. त्यामुळे ही मुलाखत अभ्यासपूर्ण, विविधांगी असावी, केवळ शब्दांचे फुलोरे असणारी ठरू नये यासाठी राजेंद्रबाबू दक्ष होते. मुख्यमंत्र्यांना विचारण्याच्या प्रश्नांसाठी दोन दिवसांपासून त्यांची तयारी सुरू होती. राज्यातील विविध प्रश्नांचा आढावा ते घेत होते. आपल्या संपादकीय सहकाऱ्यांशी चर्चा, संवाद करून प्रश्नावली तयार करीत होते. मुलाखतीसाठी मुख्यमंत्री जोशी यांनी आम्हाला केवळ अर्ध्या तासाची वेळ दिली होती. परंतु, प्रत्यक्ष मुलाखत सुरू झाल्यावर राजेंद्रबाबूंच्या विविध प्रश्नांतून नवनवीन माहिती मिळते आहे, असा अनुभव मुख्यमंत्र्यांनाही आला. मुलाखत उत्तरोत्तर रंगतदार होऊ लागली. मनोहरपंतांनाच प्रश्नांमुळे रस निर्माण झाला. त्यामुळे तब्बल दोन तास ही मुलाखत रंगली. आम्हाला निरोप देताना मनोहर जोशी राजेंद्रबाबूंना म्हणाले की आज खरोखर मुलाखत दिल्याचे समाधान प्रथमच मला मिळाले. यातून पत्रकारितेमध्ये अभ्यासाला महत्त्व किती असते हे दिसून आले. वास्तविक राजेंद्रबाबू हे वर्तमानपत्राचे मालक, 'लोकमत'चे संस्थापक-संपादक जवाहरलाल दर्डा यांच्यासारख्या अनेक वर्षे मंत्रिपद भूषविलेल्या ज्येष्ठ व अनुभवी राजकारण्याचे चिरंजीव, परंतु पत्रकारिता अभ्यासूपणेच केली पाहिजे; बातमी असो किंवा मुलाखत त्यासाठी गृहपाठ किती आवश्यक आहे, याचा आदर्श वस्तुपाठच राजेंद्रबाबूंनी आम्हाला वेळोवेळी दिला.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीच्या वेळी राजेंद्रबाबूंनी पुण्यामध्ये काही सभा घेतल्या. पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडली. पुण्यातील प्रचाराचा दौरा आटोपल्यानंतर राजेंद्रबाबूंना भेटण्यास आम्ही काही सहकारी गेलो. या वेळी त्यांनी मला स्पष्टपणे सांगितले की, तुमच्या धोरणांमध्ये बसत असेल त्याप्रमाणे या सभांची बातमी द्या. धोरणात बसत नसेल तर दिली नाही तरी चालेल. परंतु केवळ मी आहे म्हणून आपली धोरणे सोडू नका. मी माझी जबाबदारी पार पाडली आहे. तुम्ही

तुमची पत्रकारितेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडा. राजेंद्रबाबू दोन भूमिकांची कधी सरमिसळ व गल्लत करीत नाहीत, हे या व अशा अनेक प्रसंगांतून दिसले आहे. संपादकीय विभागाचे स्वातंत्र्य, संपादकाचे महत्त्व आणि पत्रकारितेतील मूल्ये पाळण्याकडे राजेंद्रबाबूंचा कटाक्ष असतो. याचे कारण म्हणजे त्यांच्या इतर सगळ्या भूमिकांपेक्षाही त्यांच्यातील हाडाचा पत्रकार हा जास्त शक्तिशाली आहे.

राजेंद्रबाबूंच्या तटस्थतेमागे एक हळवा माणूस दडला आहे. कोणताही कार्यक्रम किंवा बैठकीच्या निमित्ताने औपचारिक आणि अनौपचारिक चर्चेत त्याची कल्पना येते. पुण्यामध्ये 'लोकमत' समूहाचा वार्षिक सोहळा झाला. या सोहळ्यात कार्यकारी संचालक करणबाबू प्रास्तविकासाठी व्यासपीठावर आले. ते अत्यंत शैलीदारपणे बोलू लागले. त्यांची देहबोली आणि आत्मविश्वासपूर्वक वावर पाहून राजेंद्रबाबूंचे डोळे भरून आले. करणबाबूंनी अनेक विषयांना स्पर्श करताना 'लोकमत'च्या समृद्ध परंपरेचा उल्लेख केला. या वेळी राजेंद्रबाबूंचा ऊर अभिमानाने भरून आला आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रू पाझरू लागले. आयुष्यभर उराशी बाळगलेल्या मूल्य आणि संकल्पना घेऊनच दुसरी पिढी कार्यरत होऊ लागल्याचे आणि 'लोकमत'चा गौरवशाली वारसा पुढे नेत असल्याचे ते आनंदाश्रू होते. केवळ कौटुंबिक नातेसंबंधातच नाही तर 'लोकमत परिवारा'तील सहकाऱ्यांशी व्यक्तिगत सुख-दुःखातही ते पाठीशी असल्याचा अनुभव अनेकांना आला आहे. त्यांची सहृदयता आणि हळवेपणा व्यक्त झाला आहे.

**विजय बाविस्कर**
पुणे

# माझ्यासाठी व्यासपीठ आणि विद्यापीठही !

■ लखीचंद जैन

*( आर्टिस्ट आणि अक्षरलेखनकार, मुंबई )*

गरगरा फिरणाऱ्या चाकावर ओली माती थापून तिला आकार देणं हे कुंभाराचं काम. माती जेव्हा गोलाकार फिरता फिरता आकार घ्यायला लागते तेव्हा तिला स्वतःला कुठे ठाऊक असतं, की तिला घडविणाऱ्या बोटांनी कुंभारकीची ए बी सी डी तरी गिरवलीय की नाही... तिला घडविणारा कुंभार अन् त्याची नजर आपल्यात नेमकं काय शोधत आहे? माती ही जसजशी आकार घेत जाते... एक कलाकृतीच्या रूपात साकारते, उन्हं झेलून शेवटी धगधगत्या भट्टीत भाजून पक्की होते, तेव्हा ती माती... कलाकृती, घडविणाऱ्या कुंभाराच्या बोटांच्या कसब आणि कुवतीविषयी मूकपणे आपल्याशी संवाद करीत असते. ८०-९०च्या काळात मराठवाड्यातील, विशेषतः औरंगाबादेतील नवपत्रकारिता, चित्र, नाट्य, नृत्य, गीत-संगीत आणि साहित्य या क्षेत्रांची स्थिती ही भिजवलेल्या मातीच्या गोळ्यासारखीच होती. तेव्हाची इथली नवी तरुणाई धडपडत होती. मुंबई-पुण्याप्रमाणं नवं काही तरी करू पाहात होती. नव्या वाटा धुंडाळत होती, स्वतःच आकार घेत होती, स्वतःला आकार देत होती.

**...आणि व्यासपीठ खुले झाले !**

मला आजही आठवतं. तेव्हा मी औरंगाबादेत शासकीय कला महाविद्यालयात उपयोजित कलेचं पदवी शिक्षण घेत होतो. त्या वेळी स्थानीय वर्तमानपत्रांमध्ये नव्या पिढीचं, त्यांच्याशी निगडित विषयांचं प्रतिबिंब फारसं नसायचं. नव्या पिढीला, त्याच्या प्रतिभेला खऱ्या अर्थाने वाव मिळाला तो औरंगाबादेत १९८२ साली लोकमत सुरू झाल्यानंतरच. त्या वेळी संपादक राजेंद्र दर्डा यांनी कार्यकारी संपादक आणि ज्येष्ठ पत्रकार बाबा दळवींच्या मार्गदर्शनाखाली लिखाणाची आवड असलेल्या, विविध विषयांतल्या पदवीधर तरुणांना सोबतीला घेतलं नि त्यांना लिहितं करण्यासाठी 'लोकमत'चं व्यासपीठ खुलं करून दिलं. साप्ताहिक पुरवण्यांच्या माध्यमातून नव्या प्रतिभेला वाव मिळू लागला. या पुरवण्यांचं विविधांगी, रंगी-बेरंगी आणि वेधक स्वरूप पाहून स्थानीय वर्तमानपत्रांच्या पुरवण्यातही बदल होत गेले. लेटरप्रेस छपाईऐवजी वेब ऑफसेट छपाई तंत्राचा अवलंब झाला नि वर्तमानपत्रांच्या मांडणीत नावीन्यतेची भर पडली.

**माझ्या अक्षरलेखनाला व्यासपीठ मिळाले**

मला कॅलिग्राफीची आवड होती. राजेंद्रबाबूंना हे कळले तेव्हा मला ते पुरवण्यांचे मथळे लिहून आणायला सांगू लागले. मी अनेक मथळ्यांची कॅलिग्राफी केली. आजपासून २० वर्षे आधी मी मथळे लिहून आणायचो तेव्हा ते त्या मथळ्यांचा आशय कॅलिग्राफीत कसा यायला हवा हे सांगायचे. त्यासाठी आधी लेख वाचत जा असे सांगायचे. आधी महावीर जोंधळे 'अक्षररंग' पुरवणी पाहत होते. तेव्हा आणि नंतर अतुल कुलकर्णी 'अक्षररंग' आणि 'चित्रगंधा' या दोन पुरवण्या पाहत होता, तेव्हा मी 'लोकमत'मध्ये जाऊन सगळे लेख वाचत बसायचो. त्या लेखाचा आशय कॅलिग्राफीत आणण्याचा प्रयत्न करायचो. 'लोकमत'मध्ये, राजेंद्रबाबूंकडून मी जे शिकलो ते कायम माझ्यासोबत राहिले. 'लोकमत'ने मला वाव दिला आणि नावदेखील मिळवून दिले. त्या वेळी मराठवाड्यात माझ्यासारख्या तरुण, अनोळखी चेहऱ्याला असे कोणी व्यासपीठ देणारे नव्हते. जे मला राजेंद्रबाबूंमुळे मिळाले. त्यांच्यात असणाऱ्या कलात्मक दृष्टीने मला खूप समृद्ध केले.

मी चित्रकलेचं शिक्षण घेत होतो खरं, पण मला लिखाणाची आवड अधिक होती. १९८५च्या आसपास मी 'लोकमत'साठी नि आकाशवाणीच्या 'युवावाणी' कार्यक्रमांसाठी लिहायला

लागलो. उपयोजित कलेच्या (ॲप्लाइड आर्ट) अंतिम वर्षात शिकत असताना मी 'लोकमत'साठी रेखाचित्रे काढायला सुरुवात केली. त्यांनी अनेकदा माझ्यावर कला-सांस्कृतिक उपक्रम आणि युवा महोत्सवांच्या वार्तांकनाची जबाबदारी सोपविली होती. शिवाय त्यांनी वेळोवेळी मला लेखनासाठी प्रवृत्तही केले.

औरंगाबादेत असताना मी रेखांकन, अक्षरांकन आणि लेखनात वेगवेगळे प्रयोग करीत असे, ते लोकमतच्या माध्यमातूनच. इतरांप्रमाणं माझ्यापाशीही पत्रकारितेचं कुठलंही औपचारिक शिक्षण नि त्याविषयाची समज नव्हती, तरीही शब्द नि रेषांशी खेळण्याची, शब्दांना शब्दात गुंफायची, शब्दांना भरारी घेण्याची ऊर्मी मला 'लोकमत'मध्ये मिळत गेली. 'लोकमत'मध्ये प्रकाशित झालेल्या माझ्या एका लेखास मुंबई मराठी पत्रकार संघाचा 'डहाणूकर पत्रकारिता पुरस्कार', वर्ष १९९२-९३ चा ललित लेखनासाठी पुरस्कार मिळाल्यानं माझ्या लेखणीत एक नवा श्वास फुंकला गेला. आज मी अनेक प्रकाशनांसाठी लेखन, संग्रहालय प्रकल्पांसाठी कण्टेण्ट आणि भाषा अनुवाद करीत असतो. वेगवेगळ्या वाटांवर केलेल्या लेखनाविषयी नि लेखनप्रवासाविषयी मी स्वतःशी जेव्हा संवाद करतो, तेव्हा जाणवतं की उमेदीच्या वयात 'लोकमत'चं खुलं आकाश मिळाल्यानं माझ्या लेखनाला पतंगासारखं झेपावण्याची सवय लागली. १९९६ मध्ये मी औरंगाबाद सोडून मुंबईत आल्यावर इंडियन एक्स्प्रेस, टाइम्स ऑफ इंडिया अशा वृत्तपत्र समूहांच्या वेगवेगळ्या प्रकाशनांशी फ्रीलान्स इलस्ट्रेटर आणि लेखक म्हणून जुळलो गेलो ते औरंगाबादेतील वृत्तपत्रांसाठी केलेल्या चित्र-लेखन कामाच्या अनुभवामुळेच. मोजून दशकभर मी 'लोकमत'शी कुठल्या ना कुठल्या निमित्तानं जुळलेला होतो. एवढं मात्र खरं की, माझ्यासाठी हे व्यासपीठ अन् विद्यापीठही होतं. इथं मला पदवीचं भेंडोळं नाही, पण कागदावर विचार मांडण्यासाठी नि विषयांच्या खोलात जाण्यासाठी करावी लागणारी मनाची तयारी मिळाली. कुठल्याही विषयाला वेगवेगळ्या कोनातून बघण्यासाठी लागणारी दृष्टी अशी मोठी शिदोरी मला मिळाली.

**लखीचंद जैन**
मुंबई

# आज मी जो काही आहे तो...

■ इम्तियाज जलील

*(आमदार, औरंगाबाद मध्य, माजी विशेष प्रतिनिधी, एनडीटीव्ही, पुणे)*

जर राजेंद्र दर्डा यांनी मला त्या दिवशी बोलावले नसते तर आज मी जो काही आहे तो नसतो..! 'लोकमत टाइम्स'ने अगदी सुरुवातीच्या काळात इंग्रजी भाषेतील वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. मी माझ्या मौलाना आझाद कॉलेजतर्फे स्पर्धेत उतरलो होतो. काहीही करून मला ती स्पर्धा जिंकायचीच होती. त्या वेळी मी कॉमर्सला होतो. संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक स्पर्धकांनी त्यात भाग घेतला होता. खूप कठीण स्पर्धा होती. मी देखील तयारीनिशी उतरलो होतो... आणि मला त्या स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळाले. १९९० चे ते वर्ष होते.

मला पुरस्कार मिळाला याच आनंदात होतो. त्या वेळी 'लोकमत टाइम्स'चे कार्यकारी संपादक होते आलोक वर्मा. राजेंद्रबाबूंनी त्यांना सांगून मला 'लोकमत टाइम्स'मध्ये पत्रकार म्हणून काम करण्यासाठी तयार केले. आधी तर मी चक्क नकार दिला; कारण पत्रकारिता करण्याचा माझा कोणताही इरादा नव्हता. मात्र माझ्या सुझुकी मोटारसायकलला 'प्रेस' असे स्टिकर लावता येणार, ही गोष्ट मला खूप आकर्षित करीत होती. वर्माजींनी मला

दुसऱ्यांदा विचारले आणि मी तत्काळ ती ऑफर स्वीकारली. 'लोकमत टाइम्स'मध्ये मी ट्रेनी सब एडिटर म्हणून जॉइन झालो. माझ्या मोटारसायकलच्या पेट्रोल खर्चासाठी त्या वेळी मिळणारे १,५०० रुपये स्टायपेंड मला खूप वाटत होते!

नंतरच्या काळात मी राजनबाबूंकडून खूप काही शिकलो. आमच्यापैकी किती तरी लोक विविध वर्तमानपत्रांत काम करीत असताना 'लोकमत टाइम्स'मध्ये आले होते. मात्र बाबूजींची कार्यपद्धती मला कायम आकर्षित करीत आली. 'कम्प्लिट नो नॉन्सेन ॲटिट्यूड', टोकाची ऊर्जा आणि बातम्यांसाठी असणारे धारदार नाक! या गोष्टी मला त्यांच्याकडे नेहमीच खेचत होत्या. मला राजेंद्रबाबू कायम त्यांचा माणूस समजून वागवत होते. 'लोकमत टाइम्स' ही त्यांची नवी बेबी होती. त्याला लोकांपर्यंत पोचवण्यासाठी त्यांनी मला पूर्ण फ्री हॅण्ड दिला होता.

दरवर्षी ३१ मार्चला 'लोकमत टाइम्स'च्या वर्धापन दिनी 'पेहनावा' इव्हेंट आयोजित करायचो. या कार्यक्रमासाठी बाबूजींइतकीच किंबहुना कणभर जास्तच मेहनत आशूभाभी घेत होत्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, त्यांनी केलेल्या दिग्दर्शनामुळे 'पेहनावा' दरवर्षी एकदम हिट व्हायचा.

२००३ पर्यंत 'लोकमत ग्रुप'मध्ये मी मराठी, हिंदी, इंग्रजी या तीनही भाषांच्या रिपोर्टर स्टोरीजची जबाबदारी सांभाळत मी ब्युरो चीफ झालो. त्या दरम्यान मला एनडीटीव्हीची ऑफर आली. तिथे मला पुण्यात जाऊन काम करायचे होते. मी राजेंद्रबाबूजींना हे सांगितले, तेव्हा ते माझ्या निर्णयावर फारसे खूश नव्हते. मी त्यांना सोडून जाणार यामुळे ते नाराजही होते. पण मला इलेक्ट्रॉनिक मीडिया खुणावत होता म्हणून मी 'लोकमत टाइम्स' सोडले आणि 'एनडीटीव्ही' जॉइन केले. याला आता जवळपास ११ वर्षे होत आली. या संस्थेकडून आणि राजेंद्रबाबूंकडून मी खूप काही शिकलो. आज त्यांच्यापासून दूर जरी असलो तरी आजही माझे-त्यांचे संबंध दृढ आहेत. आजही मला बाबूजींबद्दल तेवढाच आदर आहे आणि त्यांनी माझ्यावर मनापासून केलेल्या प्रेमाचा मी आजही तेवढाच सन्मान करीत आलोय. त्यांच्यामुळेच मी पत्रकार झालो, माझ्या आयुष्याला नवा अर्थ मिळाला. राजेंद्र दर्डा या छान माणसाला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

**इम्तियाज जलील**
औरंगाबाद

अनुवाद : दीपा कुलकर्णी, मुंबई

# टू सर, विथ लव्ह...!

■ **विलास तोकले**

*(चीफ ऑफ जनरल ब्युरो, पीटीआय, मुंबई)*

**मा**झ्या आयुष्यात पत्रकार म्हणून ज्या काही गोष्टी सुरू झाल्या त्याची मुळं 'लोकमत टाइम्स' या वृत्तपत्रात आहेत. मी १९८८ मध्ये 'लोकमत टाइम्स'मध्ये ट्रेनी म्हणून जॉइन झालो. माझ्या पत्रकारितेच्या करिअरला ही इथे सुरुवात झाली आणि इथे असणाऱ्या सगळ्या लोकांमुळे मला छानसा रंग मिळाला. आजही त्या सगळ्या आठवणी माझ्या चेहऱ्यावर कायम हसू फुलवतात. त्या सगळ्यात माझे पहिले संपादक राजेंद्र दर्डा; ज्यांना आम्ही प्रेमाने, आदराने बाबूजी म्हणतो, त्यांचा मोलाचा वाटा आहे.

गेल्या २६ वर्षांपासून मीडियाच्या या स्पर्धात्मक जगात बाबूजी माझे गुरू, माझी प्रेरणा आहेत. मला तर वाटतं प्रत्येकाला त्यांच्यासारखा 'बॉस' मिळावा. त्यांच्याकडे काहीही विचारण्यासाठी गेल्यावर आम्ही रिकाम्या हाताने परत आलोय, असा एकही प्रसंग मला आठवत नाही; मग ते ऑफिसचं काम असो की व्यक्तिगत.

लंडन कॉलेज ऑफ प्रिंटिंगमधून ग्राफिक आर्ट्सचे शिक्षण घेऊन आल्यामुळे की काय, बातमीत काय आहे किंवा काय हवं इथपासून ते

आजच्या अल्ट्रा मॉडर्न प्रिंटिंग टेक्नॉलॉजीपर्यंत सगळीकडे त्यांचे बारीक लक्ष असते. बाबूजींच्या मार्गदर्शनाखाली नवशिका पत्रकार ते सगळे बिट्स कव्हर करणारा उपसंपादक अशी माझी घोडदौड सुरू झाली. काही अवधीतच मी स्वतंत्रपणे शिफ्टदेखील सांभाळू लागलो.

'लोकमत टाइम्स'चं पहिलं पान मी सांभाळू लागलो. रात्री उशिरा आलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बातम्या शहर आवृत्तीला घेण्याचा माझा अट्टहास होता. ते पाहून बाबूजी मराठी 'लोकमत'च्या सहकाऱ्यांना म्हणाले होते, की 'लोकमत टाइम्स'प्रमाणे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बातम्या घेत चला. तेव्हा माझ्या उत्साहाचे चीज झाल्याचे समाधान मला मिळाले. आज जेव्हा हे आठवतो तेव्हा मला माझ्या त्या वेळच्या उत्साहाचे हसू येते.

बाबूजी जेव्हा ऑफिसमध्ये डे टू डे असायचे तेव्हा 'लोकमत ग्रुप' व्यावसायिक क्षेत्रापेक्षाही एक परिवार वाटायचा आणि बाबूजी त्या परिवाराचे मुख्य! प्रत्येकाशी ते सारख्याच प्रेमाने वागायचे. 'लोकमत'मधली ती सात वर्षे, त्या आठवणी आजही माझ्या मनाला आनंद देतात. आजही मी स्वतःला भाग्यवान समजतो. कारण बाबूजी माझे पहिले संपादक होते. मंत्री झाल्यावरदेखील ते नेहमीच एका फोनच्या अंतरावर असायचे.

आता ते पुन्हा वृत्तपत्राच्या दैनिक कामकाजात लक्ष घालत आहेत. 'लोकमत ग्रुप'ला याचा नक्कीच फायदा होईल. 'लोकमत' परिवार हे आजही माझं आणि माझ्या सहकाऱ्यांचं दुसरं घर आहे, हे मला माहिती आहे. आजही बाबूजींचे आशीर्वाद आमच्या पाठीशी आहेत. 'टू सर, विथ लव्ह' नावाच्या चित्रपटात एक खूप सुंदर वाक्य आहे...

"What, what can I give you in return? If you wanted the moon I would try to make a start, But I, would rather you let me give my heart, To Sir, with Love."

**विलास तोकले**
मुंबई

शब्दांकन : दीपा कुलकर्णी, मुंबई

# त्यांनी जगण्याला अर्थ बहाल केला!

■ राजा माने

*(संपादक, लोकमत, सोलापूर)*

खरं तर आमच्या मागील कित्येक पिढ्यांचा आणि पत्रकारितेचा काडीचा संबंध नाही. तरीही माझ्या पिढीत मी मात्र पत्रकारितेची कुठलीही डिग्री नसताना पत्रकार म्हणून नावारूपास आलो! वृत्तपत्रसृष्टीनं सुखासमाधानाची रोजी-रोटी दिली; सन्मानानं जगण्याबरोबरच सामाजिक जबाबदारीचं भान दिलं. जगणं तसं सोपं असतं. माणूस सहज जगून जातो! जीवन संपतं पण जगण्याचा अर्थ मात्र समजतच नाही. जगण्याला अर्थ नाही, ना चेहराही नाही! याच दुनियादारीशी माझ्यासारख्यांच्या कुटुंबाचं नातं असतं. नेमक्या याच नात्याशी बंड करण्याची शक्ती आणि प्रेरणा दिली ती राजनबाबूजींनीच! केवळ तेवढ्यावर न थांबता शिल्पकार चिखलाच्या गोळ्याला ज्या पद्धतीने सुंदर आकार देतो, त्याच पद्धतीने त्यांनी माझ्या जीवनाला आकार, अर्थ आणि चेहरा दिला. वडील गिरणी कामगार, आई मोलमजुरी करणारी, अशा कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या माझ्यासारख्या अनेकांना त्यांनी सन्मानाने जगायला शिकविले.

शब्द, कृती, चारित्र्य आणि प्रारब्धाचा खरा अर्थ त्यांच्या सहवासात

येणाऱ्या प्रत्येकाला आपसूकच समजून जातो. १९८५ पासून मला त्याची पदोपदी प्रचिती आली.

१९८६ साली मी प्रशिक्षणार्थी म्हणून औरंगाबादमध्ये कार्यरत होतो. त्याच कालावधीत काही माथेफिरूंनी 'लोकमत' पार्सल गाडी पेटवून देण्याचा प्रयत्न केला. ते समजताच मी बार्शीचा असल्याने बाबूजींनी मला तिकडे जाण्यास सांगितले. मी बार्शीला गेलो. त्या घटनेची आणि माथेफिरूंची माहिती घेतली. गैरसमजातून हे कृत्य घडल्याचे त्या माथेफिरू मुलांनी मला सांगितले, माफीही मागितली. आमची पोलीस केस करण्याची तयारी सुरू झाली होती. बाबूजींनी मात्र 'तरुण मुले आहेत, या वयात चुका घडतात. त्यांना त्यांची चूक कळली आहे. आता पोलीस केस वगैरे करू नका' असा निरोप धाडला. आम्ही धडा शिकविण्याच्या मानसिकतेत असताना बाबूजींनी मात्र आम्हाला संयम आणि समजूतदारपणाचा धडा त्या घटनेतून शिकविला. घटना कोणतीही असो त्या घटनेच्या समारोपाचा आधार हा बाबूजींचे संवेदनशील मनच असायचे !

**ठाम भूमिकेमुळे बळ मिळाले !**

मी परभणी जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत होतो. त्याच कालावधीत एका अधिकाऱ्याची बदली झाली आणि लगेचच जिल्ह्यात अवैध धंदे फोफावले. तो संदर्भ घेऊन अवैध धंद्यांच्या विरोधात 'प्रसाद गेले, मधाळ आले, मटके जुगारवाल्यांचे चांगभले !' या शीषर्काने मी बातमी दिली. ती बातमी गाजली, पण पोलीस अधिकारी मात्र संतापले. त्या संतापातून त्यांनी माझ्या विरोधात जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल केले. या घटनेने मी थोडा घाबरलो. कारण बातमीच्या केसेस या संपादक, प्रकाशक आणि बातमीदाराच्या विरोधात होत असतात. इथे मात्र एकट्या माझ्याच विरोधात केसेस दाखल झाल्या होत्या. बाबूजींनी माहिती घेतली आणि मला बोलावून धीर दिला. पोलिसांच्या विरोधात लढण्यास स्वतः सज्ज झाले. पोलिसांनी दाखल केलेल्या केसेसच्या विरोधात 'लोकमत'नेच उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. बाबूजींनी घेतलेल्या भूमिकेचे समर्थन करीत पत्रकारांच्या संघटनांनी पोलिसांच्या विरोधात आंदोलने सुरू केली. अखेर बाबूजींच्या भूमिकेमुळे पोलिसांना माघार घ्यावी लागली. पत्रकारितेचे कर्तव्य पालन करताना एखाद्या कनिष्ठ सहकाऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्याच्या संरक्षणासाठी ते किती तळमळीने आणि आक्रमकतेने पुढे येतात याचा अनुभव महाराष्ट्राने त्या वेळी घेतला.

कोणत्याही विषयाच्या मुळाशी पोहोचणे, स्वतःच्या मनाची खात्री होईपर्यंत तो विषय न सोडणे

ही त्यांची खासियत! मी अहमदनगर येथे कार्यरत असताना सहकार आणि साखर कारखानदारीच्या समस्या जाणून घेण्यासाठी त्यांनी जिल्ह्यातील सर्वच साखर कारखान्यांना भेटी दिल्या होत्या. भाऊसाहेब थोरात, मारुतराव घुले-पाटील, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, बाळासाहेब विखे-पाटील, यशवंतराव गडाख यांच्यासारखी दिग्गज मंडळी जिल्ह्यातील सहकार आणि साखर कारखान्याचा संसार पाहत होती. बाबूजींनी जिल्हा पिंजून काढला. प्रत्येक साखर कारखान्याला भेटी दिल्या. त्यातून नव्या- नव्या विषयांना चालना दिली. केवळ सहकार क्षेत्रापुरता आपला अभ्यास दौरा सीमित न ठेवता शिर्डी देवस्थान, शनिशिंगणापूर देवस्थान विकासासाठी काय करता येईल, याविषयीची त्यांची निरीक्षणे सांगितली आणि 'लोकमत'ने त्याचा सदैव पाठपुरावा केला.

खूप खूप प्रसंग सांगता येतील, ज्यात बाबूजींकडून मला शिकायला मिळाले. जोडलेल्या माणसावर निःस्पृह प्रेम करणे, त्याला चुकांसह स्वीकारून मोठे करणे त्यांच्या या गुणाचा प्रत्यय प्रत्येकाला येतो. आपला सहकारी अडचणीत दिसला की अस्वस्थ होणे आणि त्याला त्यातून बाहेर काढण्यासाठी जीव लावून प्रयत्न करणारे बाबूजी मी गेल्या ३० वर्षांत अनेकवार अनुभवले आहेत. माणुसकी, संवेदनशीलता आणि आदर्श पत्रकारितेचा संगम त्यांच्या ठायी घडलेला आहे. त्याच कारणाने माझ्यासारख्या अनेकांच्या जीवनाला अर्थ बहाल करण्याचे काम त्यांच्या हातून घडले.

**ज्ञानशक्तिसमारूढः तत्त्वमालाविभूषितः।**
**भुक्तिमुक्तिप्रदाता च तस्मै श्रीगुरवे नमः।।**

त्यांनी माझ्यासारख्या असंख्य लोकांचे जीवन घडविले आहे.

**राजा माने**
सोलापूर

■●

# तांड्यावरच्या मुलाला पत्रकार केले !

■ मोहन राठोड

*(संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, नागपूर)*

अतुल कुलकर्णींचा फोन आला. राजेंद्रबाबूंवर पुस्तक काढणार आहोत. तुझाही लेख हवाय... आणि एका क्षणात २५-३० वर्षांपूर्वीचे दिवस डोळ्यांसमोर उभे राहिले. सर्व आठवणी ताज्या झाल्या. एक एक क्षण आठवू लागलो. काय ते दिवस... 'लोकमत'चा प्रवेश... त्यामुळे मिळालेली प्रतिष्ठा, सारेच अचंबित करणारे!

खरंतर मी पत्रकार होईन, हे स्वप्नातही पाहिले नव्हते. १९८२ साली औरंगाबादच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात शिक्षणासाठी गेलो. बारावीत प्रवेश घेतला. आमच्या महाविद्यालयाच्या जवळच 'लोकमत भवन' होते. ९ जानेवारी १९८२ ला प्रथम अंकाचे प्रकाशन तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या हस्ते झाले. त्याचा साक्षीदार होण्याचे भाग्य मला लाभले. १९८४ ची घटना असावी. पार्सल विभागात काम करणारे सतीश बंब आमच्या होस्टेलवर आले. पार्सल विभागात काम करण्यासाठी मुले पाहिजेत. कोणी इच्छुक आहे का? आम्ही सर्व तांड्यावरची मुले... कामाची व पैशांची गरज होतीच. लगेच रात्री 'लोकमत'च्या पार्सल विभागात १५-२० मुले

आम्ही गेलो. वृत्तपत्राचे गठ्ठे जलदगतीने मोजणाऱ्या चार-पाच मुलांची त्यांनी निवड केली. मी निराश झालो. माझी निवड झाली नाही. प्रत्येकी १५-२० रुपये त्यांना रोजंदारी मिळायची. जणू काही पत्रकार झालो, या आविर्भावात ते राहायचे. मला त्यांचा हेवा वाटायचा.

**तांड्यावरच्या मुलाला संधी मिळाली**

१९८६ ला पदवीधर झालो. वाचनाची व भाषणे ऐकण्याची खूप आवड होती. आर्थिक परिस्थिती फारच बिकट होती. चिकलठाणा ते गुलमंडी हा १० किलोमीटरचा प्रवास रोज पायी करायचो. नोकरीची नितांत गरज होती, पण नोकरी मिळत नव्हती. शासनातर्फे महिन्याला ७० रुपये मिळणाऱ्या शिष्यवृत्तीतून माझे शिक्षण सुरू होते. तो काळ फारच खडतर होता. शिक्षण सोडून गावाकडे जावे तर सर्व अंधार दिसायचा. एम.कॉम. आणि बी.जे.ला एकाच वेळी ॲडमिशन घेतले. दोन्हीकडची शिष्यवृत्ती मिळावी, हा त्यामागचा उद्देश होता. १९८७ मध्ये नोव्हेंबर महिन्यात दैनिक 'लोकमत'च्या मुलाखतीसाठी बोलावणे आले. पत्रमहर्षी बाबा दळवी कार्यकारी संपादक होते. आदरणीय राजेंद्रबाबू संपादक होते. त्यांनी माझी आस्थेने चौकशी केली. पूर्वी एवढी मोठी केबिन मी कधीच पाहिली नव्हती. लाजरा-बुजरा आणि प्रचंड दडपणाखाली. माझी अवस्था बघून राजेंद्रबाबूंनी घाबरू नकोस; व्यवस्थित बस, असा वडीलकीचा सल्ला दिल्याने माझ्या मनातील भीती निघून गेली. 'बाबा, या मुलाला संधी दिली पाहिजे. तांड्यावरचा आहे. किनवट या आदिवासी तालुक्यातला आहे. ग्रामीण भागातील आणि वंचित घटकांचे प्रश्न याला निश्चित माहीत असावेत. याचा आपल्याला उपयोग होईल. त्याच्या अंगी काही तरी करण्याची ऊर्मी दिसते.' राजेंद्रबाबू म्हणत असताना, माझे डोळे पाणावले. ठीक आहे; उद्यापासून तुम्ही या. तासाभरात नियुक्तीचे आदेश मिळाले. दहाव्या दिवशी बायलाइनने 'लोकमत'ला बातमी आली; त्यामुळे खूप मित्रमंडळी भेटायला आली. सर्वत्र कौतुक झाले. कुलगुरूंनी बोलावून घेतले. त्यामुळे मला प्रतिष्ठा मिळाली. माझे नाव झाले. आकाशवाणीचेही कार्यक्रम मिळू लागले.

या नोकरीच्या निमित्ताने माझे आर्थिक प्रश्न काही अंशी सुटले. वाचन वाढले. १९८९ मध्ये सोलापूर येथे भटक्या विमुक्तांचे राष्ट्रीय अधिवेशन होते. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी त्या अधिवेशनासाठी येणार होते. राजेंद्रबाबू व बाबा दळवींनी त्या अधिवेशनासाठी मला मोठ्या विश्वासाने कव्हरेजसाठी पाठविले. दुसऱ्या दिवशी 'लोकमत'ची हेडलाइन माझ्या नावाची होती; माझ्यासाठी तो दिवस अविस्मरणीय होता.

राजेंद्रबाबूंचा सहवास माझ्या दृष्टीने माझ्या जीवनाला कलाटणी देणारा ठरला. रोज आम्ही त्यांच्याशी बोलू शकत नव्हतो किंवा त्यांच्यासमोर जातही नव्हतो. ते खरोखरच आम्हाला ओळखतात किंवा नाही त्याबाबतही मी साशंक होतो. परंतु एप्रिल १९९४ चा काळ असेल. माझ्या नावाने परभणीचा 'जिल्हा प्रतिनिधी' म्हणून आदेश निघाले. 'जिल्हा प्रतिनिधी' म्हणजे जबाबदारीचे आणि त्याचबरोबर प्रतिष्ठेचे ते पद होते. आनंदाबरोबर माझ्यावर दडपणही होते. ओळखतात की नाही, या साशंकतेत असताना माझ्या नावाची ऑर्डर पाहून आनंद गगनात मावेनासा झाला. दुसऱ्या दिवशी परभणीला निघालो. शहर नवीन, माणसे अनोळखी. जाण्यापूर्वी राजेंद्रबाबूंची भेट घेतली. 'जा तुला सर्व काही जमेल,' असा विश्वास दिला. त्यानंतर तीन वर्षे परभणी. नंतरची दोन वर्षे जालन्यात 'जिल्हा प्रतिनिधी' म्हणून काम करण्याची संधी राजेंद्रबाबूंमुळे मिळाली. राजेंद्रबाबूंचे व्यक्तिमत्त्वच एवढे प्रभावी होते की, त्यांच्याकडून शिकण्यासारखे खूप होते. आणि शिकताही आले! त्यांना माणसांची पारख जबरदस्त होती. कोणत्या व्यक्तीकडून कोणते काम आणि कशा पद्धतीने करून घ्यावे, हे खरेतर राजेंद्रबाबूंकडून शिकले पाहिजे. त्यांची काम करण्याची हातोटी, मेहनत आणि जिद्द वाखाणण्यासारखी होती.

### ...आणि मशीन सुरु झाले

एकदा काय झाले, मी जालन्याला जिल्हा प्रतिनिधी होतो. कुठलीही कल्पना न देता ते पहाटे ४.३० वाजता जालन्याच्या बसस्थानकावर आले. टॅक्सी किती वाजता आली. आलेले पार्सल कोणत्या बसने, कोणत्या गावाला पाठविले, याची स्वतः माहिती घेऊ लागले. त्यानंतर लगेच भल्या पहाटे शहरातील सर्व सब एजंटच्या भेटी घेतल्या. राजनबाबूंची ही कामाची पद्धत होती. रात्री १ वाजता गाडी काढून कोणत्याही जिल्ह्याच्या ठिकाणी पोहोचायचे व आपल्या पेपरचे वाटप कसे होते, हे पाहायचे. दुसरी आठवण अशी सांगता येईल, एकदा रात्री एक वाजेच्या सुमारास वृत्तपत्र छापता छापता मशीनमध्ये बिघाड झाला. मशीन बंद पडली. आता काय होणार! सर्वच जण आम्ही चिंतेत होतो. राजेंद्रबाबूंना एवढ्या रात्री उठविण्याचे धाडस पार्सल विभागाच्या एका कर्मचाऱ्याने केले. काही मिनिटांतच ते मशीन विभागात आले. कपडे बदलले आणि काही क्षणांतच मशीनमधील बिघाड शोधून काढला. अन् मशीन सुरू झाले. ते सकाळी ९.३० वाजता ऑफिसमध्ये आले की, रात्री दीड-दोन वाजेपर्यंत बसायचे. कामाप्रति असलेली निष्ठा आणि सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचे कौशल्य राजेंद्रबाबूंमध्ये अफलातूनच होते.

'लोकमत' हा परिवार आहे. सर्वांच्या मेहनतीमुळे 'लोकमत'ला चांगले दिवस पाहायला मिळत आहेत, असे ते म्हणायचे. बातमीच्या मूल्यांबद्दल ते नेहमी सतर्क राहायचे. एकदा लातूरचा मुलगा राज्यात पहिला आला होता. त्याचे रंगीत छायाचित्र 'लोकमत'च्या पहिल्या पानावर द्यायचे होते. त्या वेळी स्कॅनिंगची सोय फक्त पुण्यात होती. त्या मुलाची जळगाव टी पॉइंटवर रात्री उशिरापर्यंत आपल्या सर्व सहकाऱ्यांसह ते वाट पाहात थांबले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्वच अष्टपैलू होते.

**५0 हजारांचे आज पाच लाख झाले आहेत !**

परभणीहून जालन्याला माझी बदली झाली. थोडे वाईटही वाटले. परंतु राजेंद्रबाबू म्हणाले, 'मोहन, तुझ्यामध्ये खूप पोटेन्शियल आहे. जालना हे व्यापारी केंद्र आहे. तू निश्चितच इथेही प्रभाव पाडशील,' असा विश्वास दिला. त्या वेळी त्यांनी माझे काम पाहून प्रोत्साहन म्हणून ५१ हजार रुपये रोख बक्षीस दिले. १९९७ मध्ये ती रक्कम फारच मोठी होती. मी व माझी पत्नी भारावून गेलो. त्यांनी प्रोत्साहन म्हणून दिलेली रक्कम फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवली आणि या पैशाला हात लावायचा नाही, असा आम्ही निर्णय घेतला. त्या ५० हजारांचे आज ५ लाख झाले आहेत. परंतु त्यांची आठवण म्हणून आजही फिक्स डिपॉझिटमध्ये ते पैसे ठेवले आहेत. 'लोकमत'मुळे दलित, शोषित, भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नांना आम्हाला खऱ्या अर्थाने वाचा फोडता आली. त्यांनी भटक्या-विमुक्तांच्या कार्यकर्त्यांना लिहायला लावले. त्यांच्या प्रश्नांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. वंचित घटकांचे काही प्रश्न घेऊन गेलो तर ते मदत करायचे. लिहिण्यासाठी त्यांनी मोकळीक दिली. असे का लिहिले म्हणून त्यांनी कधी आडकाठी आणली नाही. मी परभणीत असताना एका शिक्षण अधिकाऱ्याच्या भावाने राजेंद्रबाबूंकडे माझी तक्रार केली. तुमच्या जिल्हा प्रतिनिधीने लिहिलेल्या बातमीमुळे माझ्या भावाला हृदयाचा झटका आला. त्यावर शांतपणे राजेंद्रबाबू त्यांना म्हणाले, 'बातमी खोटी आहे काय? तुमचे तुमच्या भावावर जेवढे प्रेम आहे, तेवढाच विश्वास माझ्या प्रतिनिधीवर माझा आहे!'

बहुजन समाजाला खऱ्या अर्थाने व्यासपीठ मिळवून दिले ते 'लोकमत'ने! माझ्यासारखे असंख्य तरुण राजेंद्रबाबूंनी घडविले. किनवट हा आदिवासी तालुका. त्यात मी एका छोट्याशा तांड्यावरचा; पण पत्रकारितेत आलो, शिकलो आणि नावलौकिक मिळविला ते केवळ राजेंद्रबाबूंच्या मार्गदर्शनामुळे!

**चांगली माणसं जोडता आली पाहिजेत**

'लोकमत'ने योग्य वेळी संधी दिली नसती तर मी आज ज्या ठिकाणी आहे, त्या ठिकाणीही दिसलो नसतो. घरची अत्यंत गरिबी होती. त्यावेळी 'लोकमत'मध्ये संधी मिळाली नसती तर पुढची वाटचाल अंधःकारमय झाली असती. मोठे बाबूजी श्रद्धेय जवाहरलालजी दर्डा म्हणायचे, 'चांगली माणसे मिळणे फार कठीण असते. माणसे जोडता आली पाहिजे. जिद्द आणि कष्टाला पर्याय नाही.' राजेंद्रबाबूंच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळाली. जून १९९९ मध्ये मी जिल्हा माहिती अधिकारी झालो. त्यानंतर जून २०१२ मध्ये माहिती उपसंचालक झालो. विविध ठिकाणी काम करण्याची संधी मिळाली, नाव मिळाले ते केवळ 'लोकमत' आणि राजेंद्रबाबूंमुळे! विद्यार्थिदशेत 'लोकमत'च्या पार्सल विभागात काम मिळाले नाही म्हणून निराश झालो होतो; परंतु त्यानंतर 'लोकमत'मध्येच उपसंपादक झालो. जिल्हा प्रतिनिधी झालो. नंतर मुख्य उपसंपादक झालो. हे सर्व अविस्मरणीयच म्हणावे लागेल. खरे म्हणजे मित्रवर्य अतुल कुलकर्णी यांचा फोन माझ्यासाठी ऊर्जा देऊन गेला. राजेंद्रबाबूंवर लिहिण्याची संधी प्राप्त करून दिली. यानिमित्ताने कृतज्ञता व्यक्त करता आली, बस एवढेच!

**मोहन राठोड**
नागपूर

# मिनीटकाटाही महत्त्वाचा असतो !

■ विवेक रानडे

*(प्रख्यात डिझायनर, फोटोग्राफर, नागपूर)*

जिथे प्रोत्साहन मिळत असेल, नवनवीन शिकायला मिळत असेल, तिथे माणसे सरावतात आणि स्थिरावतातही. 'लोकमत'मध्ये नोकरी न करताही गेली दीड दशके 'लोकमत'शी जुळलेला मी एकटा नव्हे, अशी अनेक माणसं मी जवळून ओळखतो. जरीचे विणकाम करताना जरीचा एक एक धागा त्यात अशा पद्धतीने विणला जातो की तो वेगळा तर दिसत नाहीच; पण तो अख्खं जरीचं डिझाइन बनवतो. सिल्कमधलं हे जरीकाम करताना मी दोन भावांना गेली १५ वर्षे बघत आलो आहे.

डिझाइनर म्हणून 'लोकमत'शी माझा संबंध आला तो १९९७ मध्ये 'रक्तांजली' या पुस्तकाच्या कव्हर डिझाइनच्या निमित्ताने. ज्या काळात वृतपत्र म्हणून 'लोकमत'चा पसारा झपाट्यानं वाढत होता. डिझाइनिंग आणि वृत्तपत्र लेआऊटच्या प्रायोगिकतेमध्ये 'लोकमत'ची परंपरा मोठी आहे. सुभाष अवचट, वसंत चव्हाण, भरत चव्हाण, संजय धोतरकर यांच्यासारखे वरिष्ठ आर्टिस्ट्स त्या काळात 'लोकमत'साठी काम करीत होते. अज्ञानात सुख असते. 'लोकमत' आणि या वरिष्ठ कलाकारांच्या संबंधांबाबत मी पूर्णपणे

अनभिज्ञ होतो आणि त्यामुळेच माझ्या कामात माझ्यावर कोणतेच प्रेशर नव्हते. विजयबाबूंच्या प्रत्येक भेटीत ते माझ्या कामाचे कौतुक करायचे व मला प्रोत्साहन द्यायचे. मी पण मोकळेपणाने माझे विचार त्यांना सांगायचो. आज मागे वळून बघताना असे वाटते, की खरेतर आपण किती बालिश होतो; पण रोपाला पाणी घालताना जी काळजी घ्यायला हवी कदाचित तीच काळजी विजयबाबू घेत असतील. या काळात मी 'लोकमत'साठी बरीच कामे केली, त्याच दरम्यान विजयबाबूंनी माझी राजेंद्रबाबूंशी भेट करून दिली.

**घड्याळाला मिनीटकाटा असतो !**

२००५ मध्ये मला अचानक 'लोकमत' औरंगाबादच्या ऑफिसमधून फोन आला. राजेंद्रबाबूंनी मला 'लोकमत' पत्रकार आणि फोटोग्राफर्सशी वार्तालाप करण्याची संधी दिली होती. मी स्वतःच्या कारने औरंगाबादमध्ये दाखल झालो. मला पहिला धक्का औरंगाबादच्या वेशीवर बसला. माझी सोय व्हावी म्हणून राजेंद्रबाबूंनी दोन जणांना औरंगाबादच्या वेशीवर माझ्या स्वागतासाठी पाठवले होते. कार्यक्रम दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता होता. मी हॉटेलमधून १५ मिनिटे अगोदर 'लोकमत'च्या ऑफिसमध्ये दाखल झालो. राजेंद्रबाबूंनी माझे स्वागत केले व आस्थेने चौकशी केली. मला म्हणाले, 'कार्यक्रमाला अजून आठ मिनिटे आहेत. आपण चहा घेऊ शकतो!' 'आठ मिनिटे?' मी विचार करीत होतो. मुंबई सोडल्यापासून घड्याळात मिनीटकाटा कामाचा असतो, हे जणू मी विसरूनच गेलो होतो. कार्यक्रम वेळेवर व अतिशय चांगला झाला. आपली सगळी कामे बाजूला सारून राजेंद्रबाबू पूर्णवेळ कार्यक्रमाला हजर होते. कार्यक्रम संपता संपता 'आता शेवटची पाचच मिनिटे मी आपल्याशी बोलेन' असं म्हणून राजेंद्रबाबू चार मिनिटे पंचेचाळीस सेकंद बोलले होते.

**माझ्यातला फोटोग्राफर शोधून दिला**

'लोकमत'चे काम करताना वृत्तपत्र मांडणी आणि डिझाइनचा माझा चांगलाच सराव झाला होता. 'सखी' तसेच 'ऑक्सिजन'सारख्या पुरवण्या डिझाइन करताना फोटोग्राफ, इलुस्ट्रेशन, कॅलिग्राफी आणि मॅटर यांना दिलेल्या जागेत बसविण्यात मी चांगलाच पटाईत झालो. खरेतर ज्या ठिकाणी पूर्वी इलुस्ट्रेशनचा वापर केला जात होता, ती जागा क्रिएटिव्ह फोटोग्राफीने भरून काढण्याचा माझा प्रयोग इथेच सफल होत होता. कदाचित याच काळात लोकांनी माझ्यातील

फोटोग्राफर शोधून काढला होता.

सहज आठवलं. कॉलेजमध्ये प्रसिद्ध कार्टूनिस्ट इरफानबरोबर मीही कार्टून्स काढीत असे. कॉलेज इलेक्शनच्या वेळेस विरोधी पार्टीची मुलं माझ्याकडे आली आणि मी त्यांच्यासाठी कार्टून पोस्टर्स काढावीत अशी मागणी केली. मी नाही म्हणालो. इरफानने मला हटकले. तो म्हणाला, 'अरे आपलं काम लोकांसमोर ठेवण्याची ही संधी आहे, नाही म्हणू नकोस. इलेक्शनमध्ये कोणीही जिंकले तरी तुझी पोस्टर्स लोक लक्षात ठेवतील!!' मी ती संधी सोडली नाही. खरेतर त्यानंतर मी कोणतीच संधी सोडली नाही. काम पैशासाठी नाही तर अनुभवासाठी करायचं असते. प्रत्येक कामात प्रयोगशीलता ठेवली तर नवीन काही सापडण्याचे अनेक मार्ग निर्माण होतात. 'लोकमत'ने मला रोज नवनवीन प्रयोग करण्याची केवळ संधीच दिली नाही, तर त्याकरिता प्रोत्साहन व कौतुक दिले. सगळ्याच दर्डांची सौंदर्यदृष्टी अतिशय चांगली आहे. कलेची ज्यांना जाण आहे अशांसाठी काम करताना मनावर थोडा ताणही पडतो; पण व्यायाम करताना ताणले गेलेले मसल्स वेदनेपेक्षा सुदृढ शरीरही देतात.

**मोजूनमापून काम करण्याचा दुर्मीळ गुण**

सन २००७ हे दैनिक 'लोकमत'चे रौप्य महोत्सवी वर्ष. रौप्य महोत्सवानिमित्त एक विशेष स्मरणिका काढण्याचे ठरले आणि त्याच्या डिझाइनचे काम माझ्याकडे आले. अर्थात, काम पूर्ण करण्यासाठी वेळ फारच थोडा होता. राजेंद्रबाबूंशी माझे फोनवरच बोलणे झाले. दोन दिवसांत रूपरेषा ठरवून पुन्हा बोलू असे ठरले.

स्मरणिका डिझाइन करताना एक गोष्ट फार महत्त्वाची असते, ती म्हणजे त्या विषयावर जमा केलेले मॅटर. साधारणपणे ज्याचा अंदाज जमा करता येत नाही, त्यामुळे एक तर पाने जास्ती होतात किंवा अतिशय कमी होतात.

दोन दिवसांनी ठरल्याप्रमाणे राजेंद्रबाबूंचा फोन आला. ते म्हणाले, विवेक, मॅटर व्हिज्युअलचा रेशो काय ठेवायचा? मी म्हणालो, ६० टक्के आणि ४० टक्के. म्हणजे ४० टक्के व्हिज्युअल, ६० टक्के मॅटर. पुढील दोन दिवसांत सुभाषचंद्र वाघोलीकर व त्यांची टीम नागपूरला माझ्या ऑफिसमध्ये हजर झाली. येताना ते टाइप केलेले व प्रूफ रीड केलेले मॅटर घेऊन आले होते. आम्ही कामाला सुरुवात केली. कॉम्प्युटरवर मॅटर ओपन केले आणि मी उडालोच. संपूर्ण मॅटरचा रेशो ६० टक्केच होता. अख्ख्या स्मरणिकेची विभागणी सहा भागांत करण्यात आली

होती.( पडघम, झुंबर, नवरत्न, घडलं बिघडलं, लोकमत युग आणि वेध उद्याचे ) प्रत्येकाची पाने ठरलेली. संपादकीय व जाहिरातींचीही पाने ठरलेली. ( २४८ पानांचा संपूर्ण दाखला तयार होता. ) मी वाघोलीकरांना म्हणालो, की तुमची टीम फारच स्मार्ट आहे. ते म्हणाले, डोंबलं'. हे काम राजेंद्रबाबूंचे आहे. प्रत्येक लेखासाठी त्यांनी शब्दांची मर्यादा दिली होती. ६० टक्के तर काम झालेच होते. उरलेले ४० टक्के मला त्यात ओतायचे होते.

वेळेचे गणित ज्याला जमते, त्याला शब्दांचेही गणित जमते आणि ज्याला दोन्हीचे गणित जमते, त्याला आयुष्याचेही गणित जमते आणि त्यात माणसाची पारख, त्यांना वागविण्याची रीत, त्यांना सांभाळण्याची हुशारी अंगात असेल तरच दर्डांसारखे जरीकाम जमते !

**विवेक रानडे**
नागपूर

■●

# डिझाइनिंग म्हणजे सर्व काही !

■ **सुजाता आनंदन्**

*(राजकीय संपादक, हिंदुस्थान टाइम्स, मुंबई)*

उद्योगपती वा राजकारणी यापेक्षाही राजेंद्र दर्डा हे अस्सल जातिवंत पत्रकार आहेत. पत्रकारिता त्यांच्या नसानसात इतकी भिनली आहे, की इतर कोणत्याही व्यवधानामुळे त्यांचे या पेशावरून लक्ष विचलित होत नाही.

ही तशी बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. पण मला आजही लख्ख आठवतेय. तेव्हा 'इंडियन एक्स्प्रेस' सोडून मला 'आउटलूक'साठी काम करायची ऊर्मी होती. मला बदल हवा होता. पण मी 'एक्स्प्रेस' सोडू नये यासाठी माझे संपादक कमालीचे आग्रही होते. त्यांच्या आग्रहाचा माझ्यावर दबावच होता म्हणा ना ! त्या वेळी राजनबाबूंनी घेतलेली भूमिका विलक्षण होती. मी वृत्तपत्र सोडू नये, या त्यांच्या मतावर ते ठाम होते आणि बदल हवा या भूमिकेवर मीही ठाम होते. मी कोणत्या तरी अन्य विशिष्ट कारणाने वर्तमानपत्र सोडत नाहीये, हे सांगितल्यावर त्यावर त्यांनी काढलेला तोडगा अनपेक्षित होता. ते म्हणाले, तुला 'इंडियन एक्स्प्रेस'चा कंटाळा आला असेल तर मी तुला 'लोकमत टाइम्स'मध्ये नोकरी देतो. वर्तमानपत्रासाठी काम करण्यातल्या निखळ आनंदाची मासिकाच्या वा अन्य नियतकालिकातील पत्रकारितेशी तुलनाच

होऊ शकत नाही. म्हणून तू तुझा विचार बदल, असे ते आग्रहाने सांगत होते. अर्थात, मी काही माझा विचार बदलला नाही आणि 'आउटलूक'मध्ये रुजू झाले. मग याच जातिवंत पत्रकार असलेल्या राजनबाबूंनी माझी नियतकालिकातील पत्रकारिता यशस्वी होण्यासाठी 'लोकमत' समूहाची सगळी पायाभूत रसद माझ्यासाठी खुली करून दिली. मी करीत असलेल्या कामाला अधिक सकस आयाम मिळावेत, यासाठी त्यांनी हरतऱ्हेने मदत केली.

**शिकवलेली सुलभ मांडणी लक्षात राहिली**

तसे पाहिले तर माझी आणि राजनबाबूंची पहिली भेट जवळपास ३७ वर्षांपूर्वीची. नागपूर विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागात झालेली. ते तेथे ग्राफिक आर्ट्स विषयातले माझे प्राध्यापक. नुकतेच लंडनहून ग्राफिक आर्ट्सचे शिक्षण घेऊन आलेले. मला आठवतेय, मी त्यांच्या विषयात अव्वल विद्यार्थिनी ठरले. मला खात्री आहे की ग्राफिक डिझाइनिंग समजावून सांगण्याची त्यांची सोपी आणि सहज शैलीच माझ्या अव्वल ठरण्याला कारणीभूत होती. संगणक आणि तंत्रज्ञान या दोहोंच्या बाबतीत काळाच्या पुढे जाऊन वेध घेणाऱ्या राजनबाबूंमुळेच माझ्यासारखीला बदलत्या काळाशी जुळवून घेणे शक्य झाले. अर्थात, मी डिझायनर होण्यापेक्षा वार्ताहर होणे पसंत केले, हा भाग अलाहिदा. पण शब्द, डिझाइन यांची विद्यार्थ्यांसाठी राजनबाबूंनी केलेली सुलभ मांडणी पुढेही माझ्या कायम स्मरणात राहिली.

सर्वस्वी वेगळ्या प्रांतातील निराळा विषय हाताळून त्यातून एखाद्या अफलातून मुद्द्याला तोंड फोडण्याची आगळी हातोटी राजनबाबूंकडे आहे, म्हणूनच मी त्यांचा उल्लेख 'जातिवंत पत्रकार' असा करते. १९८० च्या दशकात नागपूर येथे 'लोकमत' समूहाचे मुख्यालय होते. त्यापूर्वी एकच वर्तमानपत्र असलेले शहर अशी नागपूरची ओळख होती. अशा शहरात राजनबाबू 'लोकमत'चे बस्तान बसवू पाहत होते. त्याच वेळी आणखीही एक वृत्तपत्र जम बसवू पाहत होते. ज्येष्ठ बंधू विजय दर्डा यांच्या साथीने राजनबाबू यांनी 'लोकमत'ची वीण इतकी कसोशीने घट्ट बांधली, की बाकीची वर्तमानपत्रे काही वर्षांतच 'लोकमत'च्या पासंगालाही उरली नाहीत.

माझ्या समजुतीप्रमाणे राजनबाबूंना नवे विस्तीर्ण क्षितिज खुणावत होते. म्हणूनच त्यांनी व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने औरंगाबादलाही 'लोकमत' सुरू करण्याची कल्पना मुदलात तसा विचार न केलेल्या स्व. जवाहरलालजी दर्डा यांच्या गळी उतरवली. खरेतर दुष्काळग्रस्त, विकासाचा वाराही न लागलेल्या मराठवाड्याच्या राजधानीत 'लोकमत' सुरू करण्यात नागपूरपेक्षाही अधिक धोका

होता. पण अवघ्या काही वर्षांतच औरंगाबाद आवृत्तीही ‘लोकमत’ समूहाच्या आघाडीच्या आवृत्त्यांपैकी एक बनली. त्यानंतर ना ‘लोकमत’ने मागे वळून पाहिले; ना औरंगाबाद शहराने अन्य कोणत्या वृत्तपत्राला असा लोकाश्रय दिला. औरंगाबाद शहराच्या केवळ पायाभूत सुविधांच्या उभारणीवर, विकासावर लक्ष केंद्रित करून ‘लोकमत’ थांबला नाही. तेथील विमानतळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे बनविण्यासाठी प्रयत्न करतानाच राजनबाबूंच्या नेतृत्वाखाली ‘लोकमत’ने समाजाच्या वंचित वर्गाचे प्रश्न नेमकेपणाने हेरले. दलित आणि मुस्लिमांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करीत असतानाच या वर्गांमधील फारसे ज्ञात नसलेल्या लेखकांना व त्यांच्या वैचारिक हुंकाराला त्यांनी विशाल व्यासपीठ मिळवून दिले. त्यापूर्वी बहुतांश अन्य उच्चभ्रू वर्तमानपत्रांनी या वंचित वर्गाला तसे उपेक्षितच ठेवले होते.

राजकारणी आणि पत्रकार अशा दोन भिन्न पेशांमध्ये सारख्याच आवडीने केलेली यशस्वी वाटचाल हे राजनबाबूंचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य. विशेष म्हणजे अनेक वर्षे या दोन्ही पेशांमध्ये वाटचाल करीत असताना त्यांनी दोहोंना सारखाच बावनकशी न्याय दिला. पत्रकारितेतील इतक्या वर्षांच्या प्रवासात ‘लोकमत’मध्ये काम करीत असलेल्या समकालीन पत्रकारांशी असलेल्या साहचर्य आणि संवादातून मला नेहमीच निष्पक्ष आणि उदारमतवादी पत्रकारितेची दृष्टी मिळाली. भाषिक वृत्तपत्राची विभागनिहाय स्वतंत्र आवृत्त्यांमधून साखळी निर्माण करणे हे किती मोठे पाऊल आहे, याची जाणीव राजनबाबूंच्या नेतृत्वाखाली बहरलेल्या ‘लोकमत’ने सर्वप्रथम दिली. मराठीसह इतर भाषिक वृत्तपत्रांनी अनेक आवृत्त्या काढून साखळी वृत्तपत्राचे फायदे उचलण्याची वहिवाट राजनबाबूंनी चोखाळलेल्या अनवट वाटेवरूनच काहीशा विलंबाने स्वीकारली. नंतर झालेल्या भाऊगर्दीतही ‘लोकमत’ने महाराष्ट्रातील दैनिकांमधील अव्वल स्थान अबाधित ठेवले आहे. या यशातील राजनबाबूंचा वाटा मोलाचा आहे. एका कवीने म्हटलेच आहे -

May you walk with sunlight shining and a bluebird in every tree, may there be a silver lining back of every cloud you see – forever!

**सुजाता आनंदन्**
मुंबई

स्वैर अनुवाद : चंद्रशेखर कुलकर्णी

# राजेंद्रबाबू असे जवळून पाहिलेले !

■ मधुकर भावे

*(मुख्य संपादक, प्रहार, माजी संपादक, लोकमत)*

आज दैनिक 'लोकमत' वृत्तपत्र शिखरावर आहे. या यशामागे ४५ वर्षांची दीर्घ अशी अथक तपश्चर्या आहे, मेहनत आहे, जिद्द आहे, नियोजन आहे. स्व. जवाहरलालजी दर्डा म्हणजे आमचे बाबूजी यांनी अतिशय विपरीत परिस्थितीत नागपूर शहरात 'लोकमत'ची पहिली आवृत्ती सुरू केली. त्या वेळी पुढच्या चाळीस वर्षांत सगळा महाराष्ट्र व्यापून चार दशांगुळे 'लोकमत' गोव्यात जाईल, असे कुणाला खरे वाटले नसते. बाबूजींनी नागपूर 'लोकमत' सुरू करण्याच्या निर्णयावर त्यावेळी अनेकांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले. तेव्हा भाऊसाहेब माडखोलकरांचा दैनिक 'तरुण भारत' नागपुरात अव्वल होता. नागपुरात संघाचे वातावरण होते. अशा स्थितीत 'लोकमत'चा टिकाव कसा लागेल, असा प्रश्न बाबूजींना विचारला जाई. पण कोणाशीही प्रतिवाद न करता किंवा कुणाबद्दल एकही अपशब्द न उच्चारता आपले काम चोख करण्याच्या वृत्तीमुळे १५ डिसेंबर १९७१ साली बाबूजींनी नागपुरात 'लोकमत' सुरू केला आणि पाहता पाहता 'लोकमत'चा हा वेलू गगनावर गेला.

## राम-लक्ष्मणाची जोडी

त्याच्या यशाचे श्रेय जसे बाबूजींचे, तसेच 'लोकमत'ला पाठिंबा देणाऱ्या वाचकांचेही होते. त्याचप्रमाणे या यशात आणखी अनेक वाटेकरी आहेत. त्यात विजयबाबू आणि राजनबाबू ही राम-लक्ष्मणाची जोडी यांचा वाटा फारच मोठा. आता त्या गोष्टीला ४० वर्षे होऊन गेली. माझा 'लोकमत'शी संबंध १९७४ ते २००३ हा प्रत्यक्ष कामाचा. पण मी 'लोकमत' परिवार आणि बाबूजी परिवार यांचा अजूनही कायम सदस्य आहे. त्यामुळे विजयबाबू आणि राजनबाबू ही अतिशय उत्साही जोडी मी गेली ४० वर्षे पाहात आहे. हे दोघे बंधू तेव्हा सायकलवरून नागपूरच्या 'लोकमत'ला येत. दोघांचे सायकल स्टॅण्ड वेगळे, दोघांची छोटी छोटी चेंबर शेजारी. विजयबाबू जाहिरात विषयात पहिल्या दिवसापासून निष्णात. 'लोकमत'ला आर्थिक आघाडीवर मजबूत करण्यात विजयबाबूंचे कष्ट अफाट. शंभर रुपयांची जाहिरात मिळवण्याकरिता ते आणि मी किती ठिकाणी गेलो आहे याचा हिशेब नाही. राजनबाबूंचे सगळे लक्ष आपले वृत्तपत्र कसे दर्जेदार होईल यावर. प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचे विशेष ज्ञान मिळवून ते लंडनहून परत आले. त्या काळात वृत्तपत्रे आजच्यासारखी आधुनिक नव्हती. रंगीत नव्हती. छपाईचा कागदही परदेशी क्वचितच असे. त्याही स्थितीत छपाई क्षेत्रातल्या तंत्रज्ञानामुळे राजनबाबूंनी चाळीस वर्षांपूर्वीचा 'लोकमत' मुंबईच्या वृत्तपत्राच्या तोडीचा प्रसिद्ध होईल, याची काळजी घेतली. वार्ताहरांचे जाळे ज्याला म्हणतात, ते विदर्भात त्यांनीच उभे केले. गावन्‌गाव पालथे घातले. माणसे जोडली. या सगळ्या पसाऱ्यात बातमी किती अचूक आहे, कमीत कमी शब्दांची आहे यावर त्यांचा कटाक्ष राहिला. 'जितक्या बातम्या जास्त, तितका वाचक जास्त' हे त्यांचे सूत्र होते आणि वृत्तपत्र यशस्वी करण्याचेही तेच सूत्र आहे. कष्ट करण्याची त्यांची तयारी, रात्री दोन वाजेपर्यंत जागण्याची तत्परता अशा अपार कष्टातून विजयबाबू आणि राजनबाबूंनी नागपूर 'लोकमत'ला मोठे केले. आणि नागपूरचा 'लोकमत' जेव्हा मजबुतीने उभा राहिला, तेव्हा या दोन्ही बंधूंचे लक्ष गेले खान्देशात जळगावकडे (१५ डिसेंबर १९७७) आणि मग औरंगाबादकडे (९ जानेवारी १९८२).

जळगावची जबाबदारी बाबूजींनी विजयबाबू, राजनबाबू आणि माझ्यावर सोपवली. विजयबाबू जळगावचे जावई. पण जळगावची काळजी घ्यायला धावत आले राजनबाबू. जळगावचा पहिला अंक निघाला त्या दिवशी ते नव्हते. कारण त्याच दिवशी त्यांचा विवाह झाला होता. त्यानंतर खान्देशातल्या वार्ताहरांची घट्ट वीण गावागावात जाऊन त्यांनी विणून दिली. निर्णय घेण्यात त्यांना

वेळ लागत नाही. चूक असो वा बरोबर असो, निर्णय लगेच. ते सांगायचे की, अंक असा काढा की वाचकाला आपल्या अंकाची सवय व्हायला पाहिजे. जळगावला अंकाची जबाबदारी माझ्यावर होती. '२२२, नवी पेठ' हे नाव असले तरी 'लोकमत'चे कार्यालय जुन्याच घरात होते. भिंतीला टेकून ट्रेडल मशीन होते. मशीन सुरूझाले की त्याचा आवाज होई. मशीनची ट्रायल सुरू झाली त्याच्या पहिल्या दिवशी शेजारी राहणारे अॅड. कुळकर्णी पहिल्याच दिवशी रात्री (१ डिसेंबर १९७७ - पहाटे) अक्षरशः सोटा घेऊन आले. मशीनच्या आवाजामुळे झोप उडाल्याचे त्यांनी सांगितले. तुम्हाला कोर्टात खेचतो, असे म्हणाले. मी समजावले, काही दिवसांतच आम्ही दुसऱ्या जागेत जाऊ. वेगवेगळी कारणे दिली. ते थोडे शांत झाले. २६ जानेवारी १९७८ ला 'लोकमत'ला सुटी होती. मी, बडगे आणि गुरव आम्ही रात्री कार्यालयात बसून गप्पा मारत होतो. कुळकर्णी एक वाजता आले. मोरेश्वर बडगेंना मी म्हटले, की अहो, कुळकर्णी आले. ते आले आणि त्यांनी विचारले, ''मशीन सुरू होणार नाही का?'' सुटी असल्यामुळे आज मशीन सुरू होणार नाही, असे आम्ही सांगितले. ते म्हणाले, ''अहो, झोप लागत नाही!'' कुळकर्णींना मशीनच्या आवाजाची सवय झाली होती. राजनबाबू सांगायचे त्याप्रमाणे महाराष्ट्रालाही 'लोकमत'ची सवय झाली. त्यामुळे नागपूरचा 'लोकमत' खान्देश, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, पुणे अशा सर्व ठिकाणी यशस्वी झाला.

**२० तास काम करणारा तरुण**

या यशात विजयबाबू, राजनबाबूंचा वाटा होता. जेव्हा मराठवाड्यात 'लोकमत' सुरू करण्याचे ठरले, तेव्हाही अनंत भालेरावांचे 'मराठवाडा' प्रभावी आणि प्रतिष्ठित वृत्तपत्र होते. त्या वृत्तपत्राचा मुकाबला करीत औरंगाबाद 'लोकमत' यशस्वी करण्याची जबाबदारी बाबूजींनी राजनबाबूंवर सोपवली. हे आव्हान स्वीकारून नागपूरचा निरोप घेऊन राजनबाबू औरंगाबादवासी झाले. विजयबाबूंपासून अलग होणे सोपे नव्हते. हे दोन्ही बंधूंना कोणी अलग करू शकणार नाहीत. पण 'राजेंद्र'शिवाय विजयबाबूंचे पान हलत नाही. आणि 'विजयभैयां'शिवाय राजनबाबूंना चैन पडत नाही. अशा या भावनात्मक गुंतवणुकीतून बाहेर पडून राजनबाबू मराठवाड्यात आले. त्यांनी सर्वार्थाने औरंगाबाद, मराठवाडा जिंकले; 'लोकमत'च्या दृष्टीने आणि राजकीय दृष्टीनेही. ९ जानेवारी १९८२ चा पहिला अंक निघाला, त्या दिवशी सकाळी सात वाजल्यापासून मी त्यांच्यासोबत होतो. हा तरुण संपादक २० तास काम करीत होता. औरंगाबादच्या यशात बाबा

दळवी यांचाही वाटा आहे. विद्याभाऊ सदावर्ते यांनाही राजनबाबू विसरू शकत नाहीत. अशा अनेक जिवाभावाच्या सहकाऱ्यांनी औरंगाबाद 'लोकमत' यशस्वी केले. पण त्याचे कॅप्टन राजनबाबूच होते. औरंगाबादनंतर नगर, सोलापूर इथेही राजनबाबूंनी झेप घेतली. पण बाबूजींच्या मनात होते मुंबईत 'लोकमत' सुरू करण्याचे. बाबूजींचा तो शेवटचा दिवस होता. त्यांना भेटायला राजनबाबू आणि मी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये जेव्हा त्यांच्या खोलीत शिरलो तेव्हा बाबूजींच्या तोंडून एकच शब्द बाहेर आला, 'मुंबई का क्या?' तो दिवस होता २४ नोव्हेंबर १९९७. दुसऱ्या दिवशी बाबूजी गेले. आणि मग बाबूजींना सगळ्यात मोठी श्रद्धांजली म्हणजे मुंबईत 'लोकमत' सुरू करणे, या जिद्दीने राजनबाबू कामाला लागले. नवी मुंबईत शिरवणे येथे बाबूजींनी जागासुद्धा घेऊन ठेवली होती. इमारतसुद्धा होती. राजनबाबू तेव्हा सत्तेत नव्हते. युतीचे राज्य होते. तो सगळा वेळ राजनबाबूंनी मुंबई 'लोकमत'च्या उभारणीसाठी खर्ची घातला. शिरवण्याच्या त्या कार्यालयात सोफ्यावर चादर टाकून ते अनेक रात्री झोपले. विजयबाबू आणि राजनबाबूंनी बघता बघता मुंबई जिंकली. ते यश बघायला बाबूजी नव्हते, ही सगळ्यात मोठी खंत होती. विजयबाबू खासदार झाले, हे बघायलाही बाबूजी नव्हते. २५ नोव्हेंबरच्या बाबूजींच्या स्मृतिदिनी आम्ही सगळे परिवारातले लोक दरवर्षी यवतमाळला जमतो. तेव्हा बरोबर समाधीसमोरच्या पायरीवर बसलेले असतात राजनबाबू. सतरा वर्षांपासून त्यांची ती जागा ठरलेली आहे. सतरा वर्षे मी पाहतो आहे, समाधीसमोर बसल्यावर त्यांचे डोळे पाण्याने डबडबून गेलेले नाहीत, असे एकही वर्ष गेले नाही. ते जास्त बोलत नाहीत. वेळ फुकट घालवत नाहीत. पण त्यांचे मन खूप हळवे आहे आणि आता तर 'लोकमत' समूहाची जबाबदारी त्यांनी उचलली आहे. ते सत्तेत होते तेव्हा कागदोपत्री जबाबदारी त्यांच्यावर नव्हती, तरी 'लोकमत'च्या सगळ्या आवृत्त्यांकडे त्यांचे बारीक लक्ष होतेच आणि आता तर ते मांडी ठोकून बसलेलेच आहेत. त्यांचे पुढचे लक्ष्य दिल्लीतून 'लोकमत' सुरू करण्याचे असले, तर त्यात फार आश्चर्य वाटायला नको.

**मधुकर भावे**
मुंबई

■●

# लिखित अलिखित; सगळे पायंडे मोडले !

## राजेंद्र दर्डा यांची विशेष मुलाखत

■ **अतुल कुलकर्णी**

*(वरिष्ठ सहाय्यक संपादक, लोकमत, मुंबई)*

'मराठवाडा लोकमत' या नावाने औरंगाबाद आवृत्ती सुरू करण्याचे ठरले होते. शेवटच्या टप्प्यात ते 'दैनिक लोकमत' केले गेले इथपासून ते सुरुवातीचे दिवस किती आणि कसे कठीण होते इथपर्यंत राजेंद्र दर्डा यांनी अनेक विषयांवर मोकळेपणाने उत्तरं दिली. ९ जानेवारी २०१५ रोजी 'आमचं विद्यापीठ' या पुस्तकाच्या कव्हरची फोटोकॉपी त्यांना दिली. या पुस्तकात 'लोकमत'च्या सुरुवातीच्या प्रवासाबद्दल काही प्रश्न मी त्यांना विचारले.

**मराठवाड्यात 'लोकमत' सुरू करताना आपल्या मनात काय होते? सुरुवातीचा प्रवास कसा होता?**

**राजेंद्र दर्डा :** काही तरी वेगळे करण्याच्या भावनेने मी नागपूरमधून बाहेर पडलो. नागपूरला सगळे काही होते आणि औरंगाबादला एकही नातेवाईक नव्हता. मी, आशू आणि छोटा ऋषी येथे आलो. काय करायचे हे निश्चित नव्हते. कोणतेही काम सुरू करताना खोलात जाऊन रिसर्च करण्याचा माझा स्वभाव आहे. त्यानुसार मी सुरुवातीस काम केले. तेव्हा लक्षात आले, की

येथे टेक्नॉलॉजीचा अभाव होता. दैनिक 'मराठवाडा' चांगला निघत होता. त्याला एक विचारही होता. पण त्यात येणाऱ्या बातम्या फक्त ठरावीक शहरातल्या असायच्या. छोट्या गावातसुद्धा अनेक गोष्टी घडतात. त्या बातम्या जर आपण देऊ शकलो तर आपल्याला खप मिळेल, हा मुद्दा मला त्यातून मिळाला होता. या ठिकाणी चांगल्या फोटोग्राफरचा अभाव होता. सगळी वर्तमानपत्रे मोहंमदभाईकडून फोटो घेत. त्यात स्वतःचा चेहरा कधीच कोणाला ओळखता येत नसे. छपाई वाईट होती. तेव्हा ऑफसेट टेक्नॉलॉजी आणि फोटो कंपोजिंगचा वापर केला तर निश्चितपणे एक चांगला वाचनीय अंक देऊ शकू, याची खात्री पटली. दैनिक 'मराठवाडा' आठ पानांचा होता. त्यात अर्ध्या कॉलमपेक्षाही कमी क्रीडाविषयक बातम्या असायच्या. खेळाची मलाच आवड असल्यामुळे मी छोट्या छोट्या गावांतल्या क्रीडाविषयक बातम्यांना महत्त्व देण्याचे ठरवले.

लेखकांच्या बाबतीत त्या वेळी संपादकाची सेन्सॉरशिप खूप होती. बाबा दळवी मला नेहमी सांगायचे, येथे अनेक लेखकांच्या मुसक्या बांधण्यात आल्या आहेत. त्यांना वर येऊच दिले जात नाही. माणूस वैयक्तिक कितीही मोठा असेल, पण तो इतरांना मोठा होऊ देत नसेल तर त्याचा काही उपयोग होत नाही. आपल्याबरोबर आपल्याजवळची माणसे वाढली पाहिजेत, हे चांगल्या माणसाचे लक्षण असले पाहिजे. बाबांचा हा सल्ला आम्ही मानला आणि 'लोकमत'ने ग्रामीण भागातील साहित्यिकांना लिहिते केले.

लोकांना ताज्या बातम्या पाहिजेत, असेही चर्चेतून समोर आले. रात्री उशिरापर्यंतच्या बातम्या कशा मिळतील, याची आखणी केली आणि शहरात किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी उशिरा घडणाऱ्या बातम्या रात्री १२ वाजेपर्यंत कव्हर करणे सुरू झाले. ताज्या बातम्या देणे 'लोकमत'ने सुरू केले आणि त्याचा फायदादेखील झाला.

**सर्व पातळीवर 'लोकमत' रुजावा म्हणून कोणते प्रयत्न केले ?**

**राजेंद्र दर्डा :** अंकाला उठाव आला होता. पण बाबूजी म्हणायचे 'लोकमत'ने फक्त वृत्तपत्र काढण्यापेक्षा त्याला चळवळीचे स्वरूप दिले पाहिजे. त्या दृष्टिकोनातून समाजातील वेगवेगळ्या थरांतील लोकांसाठी 'लोकमत' कसा निर्माण होईल, या दृष्टिकोनातून आम्ही प्रयत्न सुरू केला. नामांतर चळवळीला दिलेला पाठिंबा, हा त्याचाच एक भाग होता. दलित समाजाला वृत्तपत्रातून स्थान मिळायचे नाही, ते त्यातूनच मिळाले. मुस्लीम समाज मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात आहे.

पण त्यांच्या बातम्या फारशा येत नव्हत्या. 'लोकमत'ने मराठी लिहिणारा उर्दू जर्नालिझममधून पहिला मुस्लीम रिपोर्टर बासित मोहसीनच्या रूपाने आणला. त्याला त्यांची भाषा कळेल, त्यांचे प्रश्न तो मांडू शकेल, हा त्यामागे हेतू होता. बासित दहा वर्षे उर्दू पेपरमध्ये काम करीत होता. तेथून त्याला आणले. या शहरामध्ये त्यांची लोकसंख्या त्या काळी ४५ टक्क्यांपेक्षा जास्त होती. ४५ टक्के लोकांना बाजूला ठेवून किंवा मराठवाड्याची दलित चळवळ बाजूला ठेवून तुम्ही अंक कसा काढू शकता, हा प्रश्न माझ्यासमोर होता. नेमके त्या वेळेला या भागात निघणाऱ्या वर्तमानपत्रांतून हे दोन्ही वर्ग दिसायचेच नाहीत. स्वाभाविकच 'लोकमत'ने ठाम भूमिका घेतली आणि लोकांना हक्काचे व्यासपीठ मिळाले.

अग्रलेखातून तुम्ही कितीही लिहिले, पण त्या लोकांच्या सुखदुःखात जर तुम्ही सामील होऊ शकला नाही तर ते योग्य नाही. ही काही भालेरावजींवर टीका नाही. मी त्यांच्या लिखाणाचा फॅन होतो. परंतु आपल्या वाचकांना विश्वासात घेण्याचे काम 'लोकमत'ने केले.

**कशा पद्धतीचे प्रयत्न होते? त्यातून साध्य काय झाले?**

**राजेंद्र दर्डा :** १९८४ ला नांदेड-परभणी येथे प्रचंड पूर आला. अनेक शाळांचे वर्ग वाहून गेले, कोसळले. आम्ही लोकांसोबत भर पावसामध्ये फिरलो. दीड-एक लाख रुपये जमा केले. त्यातून नांदेड, परभणी येथे १३ वर्ग बांधले. लोकांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. १९८८ मध्ये बीडमध्ये दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या बिंदूसरेला पूर आला. त्या वेळी बीड जिल्ह्यात प्रचंड हानी झाली. 'लोकमत'ने परत वाचकांची मदत घेऊन कपडे, धान्य, पैसे जमा करून पोहोचवले. उस्मानाबाद-लातूरला भूकंप झाला तेव्हाही 'लोकमत'ने असेच काम केले. हे फक्त महाराष्ट्रासाठीच केले असे नाही, तर २००० साली गुजरातमध्ये भूकंप आला त्याही वेळी 'लोकमत' ग्रुपने पुढाकार घेतला. त्यातून बाबूजींना अपेक्षित असलेली लोकसहभागाची चळवळ उभी राहू शकली.

**त्या काळात आपण खपाचे आकडे छापत होता. त्यावर खूप टीका झाली. हे सगळे काय होते?**

**राजेंद्र दर्डा :** मी जेव्हा येथे आलो तेव्हा हे दैनिक काही दिवसांसाठी आले आहे, उपऱ्यांनी हे दैनिक आणलेले आहे, याला लोकांचा कधीही सपोर्ट मिळणार नाही, आमच्यातल्याच बंडखोर

व्यक्तीला त्यांनी हाताशी धरले आहे, यांना लोकांची नाडी कळणार नाही, यांना इतिहास माहीत नाही, लवकरच हे पळून जाणार, अशा टीकेला आम्हाला सामोरे जावे लागले. त्याही परिस्थितीत 'लोकमत'ने खपाचा एक लाखाचा आकडा पार केला. लोकांचा एवढा रिस्पॉन्स मिळत असतानाही 'लोकमत' खपत नाही अशी चर्चा मुद्दाम पसरवली जात होती. त्यामुळेच अपप्रचार करणाऱ्यांना उत्तर दिलेच पाहिजे, असे ठरविले. त्या वेळी खपाचे आकडे छापणे सरकारकडून बंधनकारक करण्यात आले होते. तसा आदेशही होता. पण कोणीही तसे वागत नव्हते. आपण आदेशाचे पालन केले. खपाचे आकडे छापल्यामुळे व्हायचा तो परिणाम झाला. 'लोकमत' पहिल्या अडीच वर्षांत नंबर एकचे दैनिक झाले होते. वर्षानुवर्षे जी दैनिके सुरू होती, त्यांना नॅचरली हे मान्य होणे शक्य नव्हते. त्यामुळे आम्ही खपाचे खोटे आकडे छापतो, असे सांगण्यास त्यांनी सुरुवात केली. मात्र आमच्या या कृतीचे स्वागत होऊ लागले. 'लोकमत'ने 'ऑडिट ब्युरो सर्क्युलेशन'मध्ये स्वतःचे नाव नोंदवले. आणि जे त्यात होते त्यांनी तेथे आपल्या खपाचे आकडे देणे बंद केले. त्या काळी लोक हातात पेपर आल्यानंतर हेडलाइनच्या आधी आजचा आकडा काय, असे म्हणत पेपर पाहायचे.

**'लोकमत'ने मुद्दाम नटनट्यांचे फोटो छापून खप मिळविला आहे, असे आक्षेप आपल्यावर घेतले गेले...**

**राजेंद्र दर्डा :** ज्या काळात 'लोकमत'ने हे सगळे केले तो काळ डोळ्यांपुढे आणा. १९८२ ते १९८५ चा तो काळ होता. मराठी वाचक हा मुळामध्ये फार श्रीमंत नव्हता. त्यामुळे तो एकच दैनिक विकत घेऊ शकत होता. त्याला ताज्या बातम्या, देश-विदेशच्या बातम्या, राज्य आणि स्थानिक बातम्या हव्या होत्या. शिवाय संपादकीय पानावर वैचारिक भूमिका असणारे लेखही हवे होते. जास्त किमतीमुळे वेगवेगळ्या विषयांवरील महागडी मासिके घेणे त्यांना शक्य होत नसे. लोकांच्या कथा, कविता छापणे, चित्रपट, खेळ, कृषी, आरोग्य याविषयी मजकूर त्यांना हवा होता. प्रत्येकाच्या आयुष्याचा तो भाग होत्या. दिवसभर काम करणाऱ्यास करमणूक आवश्यक असते. अशा वेळी चित्रपटाचे छायाचित्र, बातम्यादेखील त्याला हव्या होत्या. या सगळ्यातून वाचकांना एक परिपूर्ण पॅकेज देण्याची भूमिका 'लोकमत'ने घेतली. त्यातून नटनट्यांचे फोटो छापले गेले तर टीका झाली. पण लोकांना परिपूर्ण पॅकेज मिळाले. त्या काळात टेलिव्हिजन नव्हते किंवा होते तेदेखील आदिम काळातील ब्लॅक ॲण्ड व्हाइट. सीरिअल्स फारशा नव्हत्या. मग चित्रपटाच्या

बातम्या का द्यायच्या नाहीत?

एकच उदाहरणच देतो. अमिताभ बच्चनला 'कुली' चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात झाला. 'लोकमत'ने त्या बातम्या दिल्या. त्यामुळे खप ७-८ हजारांनी एका महिन्यात वाढला. त्या वेळी रात्री ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलच्या बाहेरून मी लिहीत आहे, अशाच पद्धतीने लाइव्ह रिपोर्टिंग दणक्यात केले. दोन घटनांमुळे अंक जोरात वाढले. 'कुली'नंतर खप वाढला १९८३ मध्ये 'स्कायलॅब पडणार' या बातमीमुळे. 'या देशावर स्कायलॅब पडणार' अशा अफवा पसरवल्या जात होत्या. त्यामागचे विज्ञान, वास्तव आणि लोकभावना या सगळ्या गोष्टी 'लोकमत'ने दररोज छापल्या. त्यामुळे झपाट्याने खप वाढला. दुसरीकडे लोकांमध्ये पेपर वाचण्याची आवड निर्माण झाली. पॅकेज म्हणून गुरुवारी 'हाय राणी' कॉलम सुरू केला. 'हाय राणी' सुरू केल्यानंतर 'हे काय धंदे लावलेले आहेत?' असे विचारले गेले. लोक प्रश्न विचारायचे आणि त्यांना विरंगुळा म्हणून खमंग उत्तरे देण्याचा प्रयोग 'लोकमत'ने सुरू केला. अ.भा. साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष फ. मुं. शिंदे त्या वेळी या प्रश्नांना उत्तरे देत होते.

**त्या काळात वर्तमानपत्रातले जे काही लिखित किंवा अलिखित पायंडे होते, ते सगळे तुम्ही जाणीवपूर्वक मोडले की त्यामागे हेतू होता?**

**राजेंद्र दर्डा :** जाणीवपूर्वक केले. मला वृत्तपत्र पूर्ण पॅकेज म्हणून द्यावयाचे होते. त्या काळात 'सखी' कॉलम सुरू केला. दररोज पाव पान दिले. महिलांसाठी पाककृतीपासून दैनंदिन जगण्यात येणारे प्रश्न सोडविणारे हे सदर होते. त्यात काय चूक होती? 'लोकमत'ने कोणतीही गोष्ट उगाच सुरू केली नाही, अभ्यास न करता काहीही केले नाही. अनेक उदाहरणे आहेत. आपण म्हणतो ५० टक्के महिला आहेत. मग त्यांच्यासाठी काहीच नको का द्यायला? महिला काय वाचतात याचा मी सर्व्हे केला. कोणी म्हणाल्या, आम्ही वृत्तपत्र वाचत नाही. कोणी म्हणाल्या, आम्ही वृत्तपत्र चाळतो पण त्यात आमच्यासाठी काहीच नसते. त्यातून या कॉलमचा जन्म झाला. 'आजीबाईचा बटवा' सुरू केला. घरी आणलेल्या सामानाची काळजी घेण्यापासून शिवणकाम, रांगोळी अशा अनेक गोष्टी 'सखी'च्या माध्यमातून सुरू केल्या. ५० टक्के दुर्लक्षित असलेल्या महिलांना 'लोकमत'ने 'सखी'च्या माध्यमातून वृत्तपत्रात आणले. शिवाय मुस्लीम तर १०० टक्के दुर्लक्षित होते आणि दलितही फार नव्हते. त्या सगळ्यांना वृत्तपत्राच्या मेन स्ट्रीममध्ये आणण्याचे काम 'लोकमत'ने केले.

**खप वाढला पाहिजे, त्यातून सामाजिक भान जपले पाहिजे आणि त्याला चळवळीचे रूप आले पाहिजे, ही तीन टोके आहेत. आपण त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला...**

**राजेंद्र दर्डा :** उदाहरणच देतो. लातूर, उस्मानाबादला भूकंप झाला. त्या भूकंपाच्या काळामध्ये Live Coverage म्हणजे 'आँखो देखा हाल' पद्धतीचे रिपोर्टिंग सतत दिले. फक्त भूकंप आला त्या दिवशी किंवा त्याच्यानंतर दोन दिवस बातम्या दिल्या आणि बंद केल्या असे नाही. भूकंपात दगावलेल्यांच्या मुलांचे पुढे काय झाले, त्यांचे प्रश्न काय, पुनर्वसन कधी होणार, अशा छोट्या छोट्या गोष्टी लावून धरल्या. कोलमडलेल्या शाळांच्या बातम्या दिल्या. त्यामुळे लोकांमध्ये जागृती निर्माण झाली, प्रश्न सुटण्यास मदत झाली. आपल्या प्रश्नांची जाणीव असलेले हे वृत्तपत्र आहे, ही भावना त्यातून वाढीस लागली. 'लोकमत'चा खप वाढत गेला. असे अनेक विषय 'लोकमत'ने हाती घेतले व त्याला चळवळीचे रूप आले. 'लोकमत'ची टीम केवळ बातम्या देऊन थांबली नाही, तर कुठे काय कमी पडत आहे, कुठे शाळांची आवश्यकता आहे, कुठे अंगणवाडीची गरज आहे, याचा अभ्यास करून 'लोकमत'ने लोकांकडून पैसा जमवला. त्यातून अनेक लोकोपयोगी कामे उभी केली.

**चळवळीशी माणसे जोडली गेल्याने काय फायदा झाला?**

**राजेंद्र दर्डा :** माणसे का जुळवून ठेवली पाहिजेत? आज मला अनंत कोकीळ यांची आठवण आली. ते जालन्याचे जिल्हा प्रतिनिधी होते. छोटेखानी घरात राहणारा, कम्युनिस्ट कार्डहोल्डर असलेला माणूस पत्रकारितेत आला. त्या माणसाकडून जालन्याची छोट्यातली छोटी बातमी सुटल्याचे मला कधीही आठवत नाही. आज १० माणसे असताना बातमी सुटते. ऑफकोर्स, त्या वेळी स्पर्धाही इतकी नव्हती. कोकीळ चळवळीशी जोडला गेलेला माणूस होता. त्याच्यामुळे 'लोकमत' चळवळीशी जोडला गेला. मग ती नामांतर चळवळ असू द्या किंवा अन्य कोणतीही. लोकांचे प्रश्न तुम्ही तुमचे म्हणून मांडता, त्या वेळी लोकांनाही तुम्ही आपले वाटू लागता.

नामांतरापासून नाट्यगृहापर्यंत लोकांची चळवळ उभी राहिली. 'लोकमत'ने टाइम टू टाइम बातम्या छापल्या. चळवळीचा रिझल्ट मिळेपर्यंत 'लोकमत' त्यांच्या बाजूने उभा राहिला. गारखेडा स्टेडियमची जागा राजकीय व्यक्ती आणि बिल्डरच्या घशात गेलेली. २७ एकर जमीन 'लोकमत'ने

बातम्या देऊनच थांबवली. आज त्या ठिकाणी भव्य स्टेडियम उभारले गेले आहे. सिडको नाट्यगृहाची बातमी तूच दिली होतीस. बातमीनंतर आंदोलन उभे राहिले. स्वतः आदरणीय गोविंदभाई श्रॉफ यांनी त्याचे नेतृत्व केले. आज त्याच जागेवर सुसज्ज नाट्यगृह उभे आहे. चळवळीचा फायदा समाजाला जसा झाला, तसा 'लोकमत'ही घराघरात गेला.

**त्या वेळी अग्रलेखासाठी 'मराठवाडा'चे नाव घेतले जात असे. आपण अग्रलेख लिहीत नाही, असे बोलले जात होते?**

**राजेंद्र दर्डा :** हो, पण अग्रलेख कोणी लिहिला हे जाहीरपणे सांगण्याचे काम छातीठोकपणे 'लोकमत'नेच केले! 'लोकमत'ला पहिले 'डहाणूकर ॲवार्ड' ८२-८३ साली 'एका स्वातंत्र्यसैनिकाची आत्महत्या' या महावीर जोंधळे यांनी लिहिलेल्या अग्रलेखासाठी मिळाले. आमच्याकडे अमुक व्यक्तीने अग्रलेख लिहिला आहे, असे जाहीरपणे अन्य वृत्तपत्रांत सांगितले जात असल्याचे माझ्या तरी वाचनात नाही. पण आम्ही ते जाहीरपणे केले. 'मानवतेचा आविष्कार' हा अग्रलेख बाबा दळवींनी लिहिला होता. त्यालादेखील पुरस्कार मिळाला होता. जळगावहून एक लग्नाचे वऱ्हाड इंदोरला जात होते. वाटेत अपघात झाला. नवऱ्या मुलाचा मृत्यू झाला. तेव्हा त्याच मंडपात नवऱ्या मुलाच्या भावाने नवरी मुलीशी लग्न केले. त्यावर बाबांनी अग्रलेख लिहिला होता. त्याला नागपुरात असताना पुरस्कार मिळाला होता.

**त्या काळात 'लोकमत'विषयीचे भ्रम कोणते तयार केले गेले होते आणि ते तुम्ही कसे तोडले?**

**राजेंद्र दर्डा :** 'लोकमत'बद्दलचे भ्रम अनेक होते. हा भांडवलदारांचा पेपर आहे, मारवाड्यांचा पेपर आहे, हे विदर्भातून आलेले आहेत, पैसे जमा करायला आले आहेत, यांना मराठवाड्याची नाळ नाही, यांना इतिहास माहीत नाही, मराठवाड्याच्या चळवळीशी हे एकरूप होऊ शकणार नाहीत, यांना येथील लोक कळणार नाहीत असे बोलले जात होते. या पार्श्वभूमीवर 'लोकमत'ने सुरुवात केली. आपण हे सगळे आक्षेप खोडून काढले. 'लोकमत' इथल्या चळवळीचा अविभाज्य भाग बनला. उत्कृष्ट वर्तमानपत्र काढल्यामुळे खप नंबर १ झाला. हे सर्व झाल्यानंतर हे आमची पार्सले पळवतात म्हणून आरोप सुरू झाले. पुढे आमचे पार्सल जाळून टाकतात म्हणू लागले... आता तो सगळा इतिहास झाला.

**पळतानाचे घोडे वापरून तुम्ही जाहिरात केली होती. 'लोकमत'ची ती जाहिरात खूप गाजली?**

**राजेंद्र दर्डा :** तीन घोडे दाखवले होते. त्याच्यातील मोठा घोडा आपला होता. संतोष महाजन यांनी ती जाहिरात केली होती. त्या काळी स्पर्धक दैनिकाने कासव आणि सशाची जाहिरात केली होती. आपल्याला ससा म्हटले होते आणि स्वतःला कासवाची उपमा दिली होती. त्याला उत्तर म्हणून संतोष महाजन यांनी घोड्यांची जाहिरात केली. खूप गाजली ती. त्यानंतर पुन्हा कोणी आपल्याला चिडवणारी जाहिरात कधी केली नाही.

संतोष महाजन पेपर सुरू होण्याच्या आधी एक वर्ष जॉइन झाले होते. एस. एल. देशमुख होते. खूप मेहनत घेतली होती सगळ्यांनी. छोट्या छोट्या गावांना हे लोक बसने जात होते. तेथून रिपोर्ट पाठवायचे. डिसेंबर १९८१ मध्ये आपण पहिली एजन्सी दिली. सिल्लोडला प्रसाद नावाचा एजंट होता. त्यांनी फार काही रिस्पॉन्स दिला नाही. तो म्हणाला, फार तर २० अंक घेऊ. तेथून आम्ही जाफ्राबादला गेलो. तो दुष्काळी भाग होता. फिरायला जाण्याचा त्रास होऊ लागला. मी विदर्भातून कोणत्या भागात आलो, काय होईल पुढे आपले या चिंतेने डोळ्यांत पाणी यायचे. जालन्याला आम्ही गेलो होतो. विजय भक्कड यांनी तेथे आमचा सत्कार केला. रात्री जेवण ठेवले. अनेकांना बोलावले. तेव्हा वाटले लोक आपल्यासोबत येतायत. I will never forget that period. परतूरमध्ये भंडारी नावाचा एजंट आपल्याला मिळाला आणि मराठवाड्यातला 'लोकमत'च्या नावाने त्यांनी पहिला पाच हजार रुपयांचा चेक एजन्सीपोटी दिला. शंभर प्रती घेतो असे त्यांनी सांगितले होते. That was the place where you got the response. त्यानंतर त्यांनी २०० प्रती घेतल्या.

**आपण आताच पहिला चेक मिळाला म्हणालात. कोणतीही गोष्ट असो, पहिल्यांदा ती आपल्याकडे आली पाहिजे, असा आपला आग्रह असायचा. मग तो प्रिंटर असेल, फॅक्स असेल, असे काय काय होते या नवेपणात?**

**राजेंद्र दर्डा :** चेकचा उल्लेख एवढ्यासाठी केला, की ती या भागातील आपली पहिली कमाई होती. खूप कष्टातून दिवस काढले होते तेव्हा... अनेकदा पगार देण्यासही पैसे नसायचे. मात्र तांत्रिकदृष्ट्या कोठेही कमी पडायचे नाही, असे ठरवले होते. आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांना

वेळेवर पगार मिळालाच पाहिजे, असा दंडक मी पहिल्या दिवसापासून पाळला. पहिलेपणाची सवय गरजेतून निर्माण झाली. 'लोकमत' बातम्यांच्या बाबतीत पुढे राहायचे, तर बातम्या वेळेवर येणे अपेक्षित होते. लातूरहून बातमी दुपारी १२ वाजता बसमध्ये टाकायची, ती रात्री ७ ते ८ वाजता यायची. यामुळे बातम्यांना उशीर होत असे. म्हणून आपण मराठवाड्यातला पहिला टेलिप्रिंटर घेतला. आधी दोन-दोन तासांची टेलिप्रिंटरची सर्व्हिस घेतली. कारण ती खूप महागडी होती. लातूर, नांदेड, जालना अशा ठिकाणांहून ही सेवा सुरू केली. त्यातून फटाफट बातम्या येऊ लागल्या आणि कामदेखील वेगाने होत असे.

'लोकमत'मध्ये पहिला टेलिफोन आला, तेव्हा आपण पेढे वाटले होते! 'लोकमत'सुरू व्हायला १०-१५ दिवस बाकी होते. खूप प्रयत्न करीत होतो. शिवराज पाटील-चाकूरकर प्लॅनिंग मिनिस्टर होते. त्यांच्याकडे गेलो. ते म्हणाले, तुम्हाला फोन देता येणार नाही, पण मी एक्स्चेंज मोठे करण्यासाठी प्रयत्न करीन. विठ्ठलराव गाडगीळ नभोवाणीमंत्री होते. त्या वेळी फोनसाठी दिल्लीची परवानगी लागत होती. गाडगीळसाहेबांनी आपल्याला पहिला फोन दिला. त्यानंतर दीड महिन्यातच त्यांनी अजून एक फोन चिखलठाणा एक्स्चेंजचा दिला. असे दोन फोन आपल्याला मिळाले.

एका फोनच्या साहाय्याने आपण वृत्तपत्र सुरू केले. नंतर दोन तासांसाठी टेलिप्रिंटर आले. ते पुढे पूर्ण वेळ सुरू झाले. त्यानंतर डीटीपीच्या माध्यमातून आपण मजकूर ट्रान्सफर करण्याची सिस्टीम सुरू केली. मोडेम सिस्टीमने बातम्या तातडीने आणण्याचे काम सुरू केले. औरंगाबादमध्ये we are the first in bringing offset printing. न्यूजपेपरमध्ये पहिले ऑफसेट आपण आणले. औरंगाबादमध्ये पहिले फोटो कंपोजिंग आपण आणले. First was linoterm and second was linotron-202. त्या काळातील पहिली टॅब्लॉइड 'रविवार साहित्य जत्रा' आपण सुरू केली.

पहिले फोर कलर प्रिंटिंग आणले. प्रत्येक जिल्ह्याला पूर्णवेळ जिल्हा प्रतिनिधी नेमण्याची पद्धत आपण सुरू केली. जिल्हा कार्यालये टेलिप्रिंटरने आणि मोडेमने सगळ्यात पहिल्यांदा आपण जोडली. पहिला पूर्णवेळ फोटोग्राफर नरेंद्र लोंढे हा आपण नेमला. त्याआधी कोणत्याही दैनिकात पूर्णवेळ फोटोग्राफर नव्हता. प्रत्येक जिल्ह्याला टॅक्सी सुरू करण्याचे काम आपण केले. पहिली परदेशी बनावटीची छपाईची 'हॅरिस व्ही १५ डी' ही मशीन आपण आणली. त्या वेळी ती ८५ लाखांना घेतली होती. त्याच्या आधी सोल्ना टू कलर मशीन होती, जी जॉबवर्कसाठी वापरली जात असे. त्या वेळी फोर कलर स्कॅनिंगसाठी मुंबईला जावे लागत होते. पहिलं फोर कलर ड्रम स्कॅनर आपण औरंगाबादेत आणले. पहिले (सीटीपी) कॉम्प्युटर टू प्लेट आपण आणले. हे केवळ

पहिलेपणाच्या अट्टहासापोटी केले नाही, तर या भागाची ती गरज होती.

**‘लोकमत’ सुरू होताना आपण अनंत भालेरावजींना भेटला होतात...**

**राजेंद्र दर्डा :** हो, मी त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी त्यांच्याकडे गेलो. माझी ओळख करून दिली. मी तरुण आहे, मला काही तरी करून दाखवायचे आहे. आपला आशीर्वाद हवा, असे म्हणालो. तेव्हा ते म्हणाले, मी आशीर्वाद देणार नाही. तुम्ही व्यापारी आहात, लुटायला आलात, ‘मराठवाडा लोकमत’ असे नाव तुम्ही घेतले आहे. तुम्हाला यश मिळविण्यासाठी तुम्ही आमच्या नावाचा वापर तुमच्या नावासोबत केला आहे. तेव्हा मी त्यांना म्हणालो, माझी सगळी तयारी झाली आहे. त्या काळात म्हणजे १९८१-८२ मध्ये जवळपास २५ हजार रुपयांची स्टेशनरी छापून घेतली होती. एवढा खर्च केलाय. तेव्हा ते म्हणाले, तुम्हाला ‘मराठवाडा’या नावाचा फायदा करून घ्यायचा आहे, बाकी काही नाही. मी काहीसा नाराज होऊन घरी आलो. बाबूजींना फोन केला. त्यांना सगळे बोलणे सांगितले. विजयभय्यांना फोन केला. दोघांनाही म्हणालो, की मी ‘लोकमत’च्या नावामागे मराठवाडा शब्द न लावता यश मिळवून दाखवीन. मला ‘लोकमत’च्या आधी दैनिक शब्द लावण्याची परवानगी द्या. दोघांनीही मान्यता दिली. मी लगेच दिल्लीत जाऊन बसलो. वृत्तपत्राचे टायटल देणारी संस्था तेथे आहे. तेथे बसून ‘दैनिक लोकमत’ हे नाव घेतले. डिक्लरेशन बदलले. ऑक्टोबर १९८१ रोजी ‘लोकमत’ सुरू होणार होता. त्याचे प्रकाशन पुढे ढकलले. छापलेली सगळी स्टेशनरी रद्द केली. ‘दैनिक लोकमत’ नावाची स्टेशनरी तयार केली. पहिले सहा दिवस डमी पेपर काढून पाहिला आणि नव्या नावाने पेपर सुरू केला.

**प्रकाशनाच्या कार्यक्रमातच आपण अंक छापून दिला होता. आताच्या काळात ते सोपे वाटते, पण १९८२च्या काळात हे कसे शक्य झाले?**

**राजेंद्र दर्डा :** त्या दिवसाची कधीही न विसरता येणारी आठवण आहे. ज्या दिवशी पेपरचे प्रकाशन होते, त्या दिवशी काही तरी वेगळे केले पाहिजे अशी चर्चा सुरू झाली. तेव्हा ठरले की अंकाचे विमोचन झालेला फोटो छापून पेपर तयार करायचा आणि भाषणे संपायच्या आत तो सगळ्यांना द्यायचा. आम्ही सगळी जय्यत तयारी केली. माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले, शंकराराव चव्हाण आदी नेतेमंडळी आली. त्यांचे फोटो काढून घेतले गेले. ऑफिसमध्येच इन्स्टंट फोटो काढण्याचा कॅमेरा आणला होता. मशीन तयार करून ठेवली होती. फोटो तयार केला. त्याची

निगेटिव्ह केली, नंतर पॉझिटिव्ह. ती पानावर लावून पानाची पॉझिटिव्ह केली गेली. पान प्लेट बनवण्यासाठी पाठवले गेले. शेवटचे भाषण सुरू होण्याच्या आत अंकाचे प्रकाशन करतानाचा, मशीनची पाहणी करतानाचा फोटो छापलेला 'दैनिक लोकमत'चा पहिला अंक तेथे आणला गेला आणि सगळ्यांना दिला. त्या वेळी झालेला आनंद कोणत्या शब्दात सांगणार? त्याच्या आदल्या रात्रीची गोष्ट होती. मशीनची ट्रायल घेताना रात्री १२.३० वाजता एक्सेल तुटला. रात्री दीड वाजता बग्गा इंजिनीअरिंगमध्ये गेलो. त्यांनी रात्रीच दुरुस्ती करून दिली.

आज मी खूप समाधानी आहे. विजयभैयांच्या नेतृत्वाखाली 'लोकमत'ची धुरा सांभाळण्यासाठी देवेंद्र, ऋषी, करण आणि खूप मोठा 'लोकमत' परिवार समर्थपणे अथक परिश्रम करतो आहे. परिवाराचे नाते 'लोकमत'ने निर्माण केले. कोणत्याही संस्थेत २० ते ३० वर्षे काम करणारे लोक शोधूनही सापडणार नाहीत, मात्र 'लोकमत'मध्ये अशांची संख्या किती तरी आहे.

**अतुल कुलकर्णी**
मुंबई

# हातच्या काकणाला आरसा कशाला?

■ **अतुल कुलकर्णी**

*(वरिष्ठ सहाय्यक संपादक, लोकमत, मुंबई)*

पत्रकार घडवणारे वर्कशॉप म्हणूनही 'लोकमत'ची ओळख आहे. प्रिंट असो की इलेक्ट्रॉनिक मीडिया, 'लोकमत'ने अनेक पत्रकार तयार केले. पत्रकारितेची कोणतीही पार्श्वभूमी नसताना, पदव्या नसताना जात, धर्म, पंथ यांच्या पलीकडे जाऊन 'चांगले काम करणारा तरुण आहे' एवढा एकच निकष लावून राजेंद्रबाबूंनी अनेकांना संधी दिली. अनेक हात पेरते केले. हिंगोलीतून वकील होण्यासाठी आलेला चक्रधर दळवी जाहिरात पाहून ट्रेनी उपसंपादकासाठी मुलाखत देण्यास आला, तो आज संपादक झाला. तांड्यावरून कॉलेज शिकण्यासाठी आलेला मोहन राठोड पार्सल विभागात पेपर मोजण्याच्या कामासाठी गेला; आज तो राज्याच्या माहिती खात्यात संचालक आहे. अकाउंट विभागात प्रशिक्षणार्थी क्लर्क म्हणून नोकरी मागण्यासाठी आलेले वसंत आवारे आज 'लोकमत'मध्ये वितरणाचे साहाय्यक उपाध्यक्ष आहेत. कमवा-शिका योजनेतून स्वतःचा आणि आईचा खर्च भागविणारा संतोष कराळे आज वरिष्ठ मॅनेजर झालाय. बार्शीत एस काँग्रेसचे काम करणारा कार्यकर्ता राजा माने आज सोलापूर 'लोकमत'चे

संपादक झाले आहेत. डॉक्टरकडे कम्पाउंडर म्हणून काम करणारा नरेंद्र अंकुश नांदेड 'लोकमत'मधे सहाय्यक व्यवस्थापक झाला. पांगरीला शिक्षक असणारे जयप्रकाश दगडे उत्तम कॉपी लिहिणारे पत्रकार म्हणून ओळखले गेले. अंबाजोगाईत शेती करणारे जगदीश पिंगळेदेखील जिल्हा प्रतिनिधी झाले आणि उत्तम लेखक देखील. हिंदुस्तान लिव्हर कंपनीची नोकरी सोडून जळगाव जामोदहून छोटा संसार घेऊन आलेले ओमप्रकाश केला आज वरिष्ठ उपाध्यक्ष झाले. 'लोकमत'मध्ये प्रशासन विभागात अधिकारी म्हणून जागा निघाल्या आहेत, मी येऊ का? इथले वातावरण कसे आहे, अशी विचारणा माझ्याकडेच केली होती बालाजी मुळे यांनी. आज ते 'लोकमत' समूहाचे मानव संसाधन विभागात वरिष्ठ सहाय्यक व्यवस्थापक झाले आहेत. किती नावे सांगायची आणि किती उदाहरणं द्यायची. म्हणून आम्ही गमतीने राजनबाबूंना म्हणायचो, की सगळ्यांना कंदील लावून शोधून आणलंय... तरुण वयात आलेल्या माझ्यासह अशा अनेकांचे संसार 'लोकमत'सोबत बहरले, फुलले... एक माणूस द्रष्टा असला तर काय चित्र बदलू शकते याचे यापेक्षा वेगळे उदाहरण कोणते असेल? 'लोकमत'मध्येच रिपोर्टिंग करीत करीत अनेक जण 'लोकमत'च्या विविध आवृत्त्यांमध्ये संपादक, कार्यकारी संपादक, साहाय्यक संपादक झाले. चक्रधर दळवी, सुधीर महाजन, विजय बाविस्कर, राजा माने, दिलीप तिखिले, नंदकिशोर पाटील, अतुल कुलकर्णी अशी अनेक नावे घेता येतील.

मराठी पत्रकारितेमध्ये असे एकही मोठे नाव आज शिल्लक नाही, ज्यांनी 'लोकमत'साठी काम केले नसेल. अगदी दिवंगत पत्रपंडित पां. वा. गाडगीळ, बाबा दळवी, अशोक पडबिद्री, सुभाष कोरे, वि. गं. देशपांडे यांच्यापासून ते आजही पत्रकारितेत स्वतःची छाप उमटविणाऱ्या दिनकर रायकर, सुरेश द्वादशीवार, मधुकर भावे, अरुण टिकेकर, कुमार केतकर, भारतकुमार राऊत, विजय कुवळेकर, अनंत दीक्षित, दत्ता कविश्वर, कमलाकर धारप, दशरथ पारेकर, संतोष महाजन, आलोक वर्मा, महावीर जोंधळे, विवेक गिरधारी, धों. जो. गुरव, मनोहर कुलकर्णी, रत्नाकर पंडित, दत्ता सराफ, अरुण खोरे, संजीव लाटकर, राही भिडे, सुकृत खांडेकर, प्रवीण बर्दापूरकर यांच्यापर्यंत... ही यादी एवढीच नाही, त्यापेक्षाही अधिक आहे.

| **नाव** | **सध्या कार्यरत असलेले पद** |
|---|---|
| के. थॉमस चाको | डेप्युटी मॅनेजिंग एडिटर, गल्फ टाइम्स, कतार |

| | |
|---|---|
| इम्तियाज जलील | आमदार, औरंगाबाद मध्य, माजी प्रतिनिधी एनडीटीव्ही, पुणे |
| मणिकांत सोनी | कार्यकारी संपादक, दै. भास्कर, नागपूर |
| अनिल सोनी | संपादक, दिव्य हिमाचल |
| अजय अंबेकर | संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय |
| प्रशांत दळवी | ज्येष्ठ नाट्यलेखक, मुंबई |
| चंद्रकांत कुलकर्णी | ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक, मुंबई |
| योगेंद्र लाल | समाचार संपादक, नई दुनिया |
| दीपक पचौरी | फिल्म निर्माता |
| नरेंद्र कौर छाबडा | हिंदी साहित्यिका |
| रमेश जायभाय | वृत्तसंपादक, आकाशवाणी, औरंगाबाद |
| शिवाजी दिवेकर | उपजिल्हाधिकारी |
| सुनील खरात | उच्च तंत्रशिक्षण विभाग |
| राजेंद्र वर्मा | आरटीओ, परिवहन अधिकारी |
| मोहन राठोड | संचालक, माहिती व जनसंपर्क, नागपूर |
| अंजली धानोरकर | उपजिल्हाधिकारी |
| सुरेश वांदिले | उपसंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग |
| ज्योती अंबेकर | वृत्तसंपादक, सह्याद्री दूरदर्शन |
| विलास तोकले | चीफ ऑफ जनरल ब्युरो, पीटीआय, मुंबई |
| सिराज वहाब | एडिटर, अरब न्यूज, जेद्दाह |
| सय्यद रिझवानउल्लाह | स्पेशल करस्पॉण्डण्ट, टाइम्स ऑफ इंडिया, औरंगाबाद |
| सुभाष आबूज | माजी न्यूज एडिटर, इंडियन एक्स्प्रेस, पुणे |
| के. एस. मनोजकुमार | डायरेक्टर, इंटरनॅशनल अॅकॅडमी ऑफ इंग्लिश लँग्वेज, पुणे |
| रणजित सहाय | डेप्युटी एडिटर, इंडिया टुडे |
| डॉ. रवींद्र चिंचोलकर | विभागप्रमुख, वृत्तपत्र विद्या विभाग, सोलापूर |
| यशवंत भंडारे | उपसंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग |
| डॉ. संजय शिंदे | जनसंपर्क अधिकारी, विद्यापीठ |
| दिनकर माने | प्राध्यापक, वृत्तपत्र विद्या विभाग, विद्यापीठ, औरंगाबाद |
| प्रशांत दैठणकर | जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा |
| डॉ. राजू पाटोदकर | जिल्हा माहिती अधिकारी, अलिबाग |

# मला तर डॅशिंग हीरोच दिसतोय..!

## ■ शोभा डे

*साहित्यिका, 'व्हायब्रंट विग्नेट' या पुस्तकाच्या ब्लर्कवरून*

प्रेमातच आहे मी या आयुष्य नामक प्रवासाच्या. बहुधा म्हणूनच राजेंद्र दर्डांनी लिहिलेल्या 'व्हायब्रंट विग्नेट' या छोटेखानी पुस्तकाच्याही... सामाजिक, राजकीय क्षेत्रात राजनबाबू सुपरिचित आहेत. त्यांच्या सोबतीला त्यांचा स्वतःचा वृत्तपत्र समूह आहेच की! राजनबाबूंनी आयुष्यभर काही महत्त्वाच्या भूमिका निभावल्या. भविष्यातही ते अशा अनेकानेक महत्त्वाच्या भूमिका निरंतर निभावतील. पण या पुस्तकातून पानोपानी भेटणारे राजनबाबू कमालीचे अपरिचित आणि कल्पनातीत आहेत. युरोप आणि अमेरिकेच्या गावकुसापासून चकाचक शहरांपर्यंतचं जग जिंकायला निघालेला हा चटपटीत रुबाबदार युवक आपल्याला भावतो. खांद्यापर्यंत रुळणारे त्यांचे लांब केस (काय दिवस होते ते!) स्वप्नांनी काठोकाठ भरलेले डोळे आणि जरासा फाटकाच खिसा. वजनी आणि चलनी पौंडांची तशी वानवाच. (श्री. जवाहरलालजी दर्डा यांना त्यासाठी धन्यवाद म्हणायला हवे)आणि हो, देखण्या छान मुलीही आहेत हं या रंगीबेरंगी शब्दचित्रात! मायभूमीपासून हजारो कोसो दूर, परदेशी जाऊन आपल्या आयुष्याला आकार देऊ पाहणारा, कष्टात स्वतःच्या पायावर उभा राहू पाहणारा, रोजीसाठी रोटी शोधणारा असा एक उमदा भारतीय तरुण नक्की भेटेल तुम्हाला या प्रवासात..! मला तर 'दर्डा; द डॅशिंग हीरो' असा चित्रपट दिसतोय...!!

**राजेंद्र दर्डा यांनी परदेशी शिक्षण घेताना आलेल्या अनुभवांवर आधारित 'झुंबर' हे प्रवासवर्णन लिहिले होते. त्या पुस्तकात प्रख्यात चित्रकार दिवंगत भाऊ समर्थ आणि लघुनिबंधकार म्हणून ख्याती असणारे साहित्यिक कै. अनंत काणेकर यांनी मनोगत दिले होते. ते या पुस्तकाच्या निमित्ताने येथे पुन: उद्‌धृत केले आहे.**

# राजेंद्रला पैसा उधळता आला असता !

## कै. अनंत काणेकर

*(लघुनिबंधकार आणि साहित्यिक)*

राजेंद्र दर्डा यांचे 'झुंबर' वाचले. साधी, सरळ, चटकदार भाषा पाहून खूप समाधान आणि प्रसन्न वाटले. त्यांच्या प्रवासातल्या या शब्दचित्रांना मी चार शब्द लिहावे अशी त्यांची इच्छा. हे चार शब्द मी लिहायचे ठरवले आणि 'झुंबर' वाचून काढल्यावर ते आंतर्बाह्य इतके काही सुंदर व लोभस आहे, की त्याबद्दल चार शब्द लिहिल्याशिवाय राहावलेच नाही.

प्रवास सगळेच करतात, पण प्रवासाची जी दृष्टी असते ती सगळ्यांनाच असते असे नाही आणि कुणाला ती असली तरी शब्दांतून व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते. राजेंद्र दर्डा यांना प्रवासाची दृष्टी आहे आणि शब्दांतून ती व्यक्त करण्याची त्यांच्या लेखणीत शक्ती आहे, हे त्यांचे 'झुंबर' वाचताना क्षणोक्षणी अनुभवास येते.

'झुंबर' वाचताना एक गोष्ट लक्षात आली आणि आमचे मित्र श्रीपाद डोंगरे यांनीही त्याला पुष्टी दिली. परदेशी शिक्षण घेताना राजेंद्रने तिथे श्रम करून पैसे मिळविले व आपले शिक्षण पूर्ण केले. अत्यंत समाधान वाटले. तसे

म्हटले तर दर्डा कुटुंब हे गर्भश्रीमंत. वाटेल तितका पैसा राजेंद्रला तिथे उधळता आला असता; पण स्वतःच्या पायावर उभे राहण्याची त्याने हिंमत दाखवली आणि शिक्षण पूर्ण केले. श्रीमंत मुलांत ही वृत्ती येऊ लागली आहे, हे आमच्या समाजाचे फार चांगले लक्षण आहे. श्रमाचे हे महत्त्व आणि मोठेपण आध्यात्मिक झालेल्या जगाला लवकर पटावे. अखेरीस एवढेच म्हणतो की, 'झुंबर'च्या या तरुण लेखकात साहित्यविषयक दृष्टी आहे आणि ती शब्दांतून प्रकट करण्याचे कसबही त्याच्या लेखणीत आहे. प्रवासवर्णने आम्हीही लिहिली. 'झुंबर' त्याहीपेक्षा सरस आहे, असे मी म्हणतो. राजेंद्रची भाषा सुंदर, प्रसन्न आणि खेळकर आहे. कलाकृतीबरोबर अधिभौतिक ज्ञानाचे झिरपे सहजासहजी सोडण्याची कला या तरुण, उमद्या लेखकाला उत्तम साधली आहे. त्याच्याकडून अशाच आणखी उत्तमोत्तम कलाकृतींची अपेक्षा केल्यास ते वावगे ठरू नये.

**कै. अनंत काणेकर**
मुंबई

■●

## जणू आपले मनच आपल्याशी बोलते !

राजेंद्र दर्डा... एक युवा मन... जागरूक तरुण... संकटक्षणी भारतीय संस्काराची मलमली शाल झळाळून जातं. आपलंच मन आपल्याशी बोलतं अशी सहज आणि सोपी लेखनशैली फाजील कल्पनेचा विलास नाही. भावांकनासाठी सहजच धावलेले शब्द ! मध्येच हिंदी गंधाचा मराठी शब्द डोकावून जातो हेही वैशिष्ट्यच ! वास्तववादी, पण आदर्शाचा स्पर्श स्वीकारलेलं त्याचं मन मोहाच्या क्षणात गुंततंय, गांगरतंय आणि लगेच सावरतंय. शिक्षित मनाची आंदोलनं आणि स्पंदनं... विदेश यात्रेच्या दोनच वर्षांच्या रंगीत स्मृती... बिंबांनी प्रकाशलेलं हे 'झुंबर' आकर्षक ! वाचनीय !

**कै. भाऊ समर्थ**
मुंबई

# तांत्रिक तपशील

## लेआऊट :

| | | |
|---|---|---|
| फॉन्ट | : | 4 C Gandhi |
| फॉन्ट साईज | : | 14 साईज 95% कन्डेन्स |
| ड्रॉप लेटर | : | 50% ब्लॅक |
| मथळे | : | फॉन्ट कन्डेन्स केलेला नाही. सेम साईज. |
| ■ | : | 15 साईज 100% ब्लॅक |
| ● | : | 15 साईज 50% ब्लॅक |
| ornament | : | 16 साईज 50% ब्लॅक |
| वि | : | 70% ब्लॅक |

## पेपर डिटेल्स :

Hi-bulk paper, 60 gsm. Produced by STORAENSO,
Europe’s leading paper manufacturer.
Cover will be SBS board, 270 / 300 gsm.